

बावीस साली जो जन्मला तो बहात्तर साली पन्नास वर्षांचा होणारच
पण बावीस साली जन्मलेल्या लाखो-लाखो माणसांतून फक्त एक
वसंत कानेटकर तेवढेच मराठी रंगभूमीला यशाचे दिवस दाखवीत
आहेत. इतरांना ते जमलं नाही. म्हणून कानेटकरांचं कौतुक


# माणूस

शनिवार
२५ मार्च १९७२
पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| ाणूस | शनिवार | २५ मार्च १९७२ | पन्नास पैसे |
| र्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| करा | चव्वेचाळीस४३ | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


**सप्रेम नमस्कार....**

□ कालच ११ मार्च ७२ चा अंक वाचला व वाचून अत्यंत राग आला, त्याचबरोबर खेदपण वाटला. कारण त्यामध्ये कोण्या 'प्रतिनिधी' नामक व्यक्तीने मंबई ४ मार्च हा लेख लिहिला आहे. त्यामध्ये त्यांनी गिरगावातील दोन नगरसेवक श्री .गोखले व श्री. मंत्री यांच्याबद्दल जी विधाने केली आहेत त्यामागे त्यांची हीन व शिवसेनेबद्दल असलेली सूड भावना दिसून येते. कारण श्री. मंत्री व श्री. गोखले हे नवलकरांच्या प्रत्येक मीटिंगला जातीने हजर असत व त्यांनी अत्यंत हिरिरीने त्यांचा प्रचार रात्रंदिवस केला. तसेच काही शिवसैनिक गिरगाव, खेतवाडी येथे नवकाँग्रेसचा प्रचार करत असताना दिसून येतात असे त्यांनी म्हटले आहे. हे सर्व तुमचे प्रतिनिधी कोणत्या आधारावर लिहितात हेच समजत नाही.

आपण आपल्या साप्ताहिकाचे एक चांगले स्टँडर्ड ठेवले आहे. त्यात असली बेजबाबदार व कोण्या चांगल्या कार्यकर्त्यांच्याबद्दल विनाकारण लोकक्षोभ निर्माण करू शकणारी विधाने छापून आपण त्या स्टँडर्डला गालबोट लावले आहे.

कळावे लोभ असावा

आपला नम्र
१० मार्च, १९७२
**डी. एच्. विजयन्,**
गिरगाव, शिवसेना शाखा क्र. १४
ठाकुरद्वार रोड, मुंबई ४.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

चिंतन

बाबा आमटे

# वळणावरचे तीन दगड

## उत्थान यात्रेतले आव्हान

भुकेने कुरतडलेले आतडे स्वातंत्र्याची चव घेऊ शकत नाही, हे समाजातल्या तळथरांनी दिलेल्या धडकांनी नेहमीच दाखवून दिले आहे. पिळवणूक, अन्याय, विषमता यांनी ठसठसलेली वस्तुस्थिती फार काळ सायीसारखी शांत राहू शकत नसते. समाजातले सारेच थर हादरवून सोडणारी स्फोटकता, दाहकता आपोआपच उसळण घेत असते. त्या लाटा कधी लुप्त होतात, कधी उफाळतात.

धुळे जिल्ह्यातील शहाद्याच्या आदिवासींच्या समस्यांबाबत सांगायचं तर अशाच स्फुल्लिंग भरलेल्या वास्तवाच्या काठावर समाज वावरत आहे असं म्हणावं लागेल.

हे स्फुल्लिंग, ही दाहकता केवळ शब्दांत नाही तर त्या आदिवासींच्या खपाटीस गेलेल्या आतड्यांत, पिचलेल्या हाडांत आणि असहाय पापण्यांत आहे. अनेक वर्षांपासून विषमतेचे आसूड सोसूनही ते जगले; पण आपले जिणे ओसाड करीत, दुसऱ्यांचे हास्य फुलवत. त्याच्या कोरभर फुटक्या सहानुभूतीवर. त्यांचे जे जे आहे, होते ते ते दुसऱ्यांनी यथेच्छ उपभोगले.

पण त्या एकाकी असहाय पापण्यांतही आता जाग आली आहे...समतेसाठी माणुसकीला जाब विचारण्याची.

केवळ ७।१२ चे उतारे किंवा जमिनी सोडवणे एवढीच त्यांची समस्या नाही, या पहिल्या पावलानंतरचे भुकेचे भवितव्य टप्प्याटप्प्याने सुसह्य करण्यासाठी. त्यांना सहयोग देण्यासाठी : ही सुस्तावलेल्या समाजाची आव्हाने स्वीकारायची आहेत.

त्यासाठी पू. विनोबाजींसारख्या समतेच्या प्रकाशयोग्याने समाजाच्या भलाईच्या आराधनेची दिशाखूण दिलेली आहे !

### सद्भावनेची दियासलाई

बेतळ सहानुभूतीने किंवा गोठलेल्या ध्येयाने ह्या समस्या सुटत नसतात. स्वातंत्र्य हेही तेथे बुजगावणे बनत असते. स्नेहपूर्ण करुणेच्या स्पंदनावर स्वार

होऊन या रोरावल्या काळोखात शिरता येणे शक्य होते. Not escape but Approach – त्या समस्यांच्या अधिक निकट पोचणे, स्नेहतिरीप घेऊन, दिलासा जवळीक घेऊन. तरच सुरुवात करता येणे शक्य होते. भव्यतेऐवजी शुभेच्छांची निवड हवी असते.

स्वत:पुरत्याच असलेल्या आकांक्षा दूर ठेवून, अन्याय, पिळवणूक यांचा पाला-पाचोळा बेचिराख करणारी ही दियासलाई – समिधा – समाजाच्या सद्भावनेतून मिळते. तेव्हा त्या काडीच्या प्रकाशात अंधारलेल्या आदिवासींच्या जीवनात कणव घेऊन पोचणे शक्य होत असते.

## परिसावरचा निर्णय

ही एक उत्थानयात्रा. आदिवासींची भू...भूक आणि भविष्य हे निमित्त. त्यांच्या सहयोगात आपल्याच आत्म्याचे हे उत्थान.

माणसातला अभिजात चांगुलपणा,
त्यांच्या हृदयाला भलाईचे आवाहन,
आणि अटळ संघर्षाची रचनात्मक किनार–
या परिसावर तरुणांनी आपला निर्णय घासून पहायचा आहे.
त्यांच्या उत्साहात तळमळीची आच आहे.

आपल्या ऐहिक प्रलोभनांचा वस्त्रस्तंभ खांद्यावर मिरवत जाताना त्यांच्या सोबतीला आहे जळून राख झालेल्या जीवनांचा जत्था. राखेला आणखी कोण जाळणार असते ?

## वळणावरचे तीन दगड

रचनेच्या ओंजळीत स्नेह वाहून नेतानाही संघर्षाची वळणे त्या कळकळीच्या तरुणांच्या मार्गात नेहमीच येत असतात. तीन दगड त्या वळणांवर ठाकलेले असतात. त्यांच्या इच्छांचीच ती प्रतीकं.

पहिला दगड अतिशय धारदार सुळक्यांचा असतो.
त्या सुळक्यांवर पाऊल ठेवता येते पण बसता येत नसते.

दुसरा दगड वज्रकठीण असतो. छिन्नीची धार बोथट होते. त्याच्यावर कोरायला महाप्रयास पडतात. खंजिरी काठिण्यातून एक रेषाही उमटत नसते.

शिल्प कोरण्याची मनीषा तर अपरंपार असतें.
खुद्द तो दगड हेच एक दारुण शिल्प असतें !

## तिसरा दगड

मग तिसरा दगड. त्यावर घाव घालताना छिन्नीच तुटावी इतका तो कठीणतर असतो. त्याचे स्वरूप मयासुरी स्फटिकासारखें असतें. कधी त्यात आपलेंच प्रतिबिंब दिसू लागतें. त्याच्या कातळगर्भातील अग्निफुलें आव्हान प्रदीप्त करीत असतात.

त्या दगडावर कशाची मात्रा चालवावी, या विचारात तो तरुण दिङ्मूढ होतो.

'मग मीच शिल्प होऊन त्या दगडापुढें उभें ठाकावे का? माझें 'मॉडेल' त्याचे कण हलवतील का?'–तो विचारतो.

## स्वतःचीच जडणघडण

प्रश्नचिन्हांचे छिललेले घाव त्यांच्यासमोर नाचत असतात.
त्या तिसऱ्या दगडापाशीच त्यांची कसोटी असते.
पण तेथे उत्तरे त्यांची त्यांनाच शोधून पुढे जायचे असते.
त्यांच्या प्रतीक्षेत प्रत्येक क्षण व्याकुळ झालेला असतो.
ते आपल्याच प्रियमूल्यांसाठी झगडत असतात.
त्या मूल्यांची मशागत त्या तरुणांच्या आचरणातून झालेली असते.
त्यांची पूर्ती हेच त्यांचे समाधान.

शांततेसाठी धवल कबुतरं महापुरुष उत्सवाच्या दिनी आकाशात उडवत असतात. तशी सत्प्रवृत्तींची, साहसाची, शांती, समाधानाची बंदिस्त पाखरं बरगड्यांचा पिंजरा फोडून आता प्रत्येकाने मोकळी करायला हवीत.

'सारे काही परमेश्वराच्या प्रेरणेवर अवलंबून असेल – ही त्यांची प्रार्थना. तर तरुणांचे कार्य दाखवून देईल की सारे काही त्यांच्यावर, त्यांच्या निष्ठांवरचा अवलंबून आहे. हे त्यांच्या कार्याचे निनाद.

बेदरकार लाटांच्या तुफानातले गलबत, किनाऱ्यावर जखडून असलेल्या नि ठिकऱ्या ठिकऱ्या होणाऱ्या गलबतापेक्षा – नेहमीच अधिक सुरक्षित असतं !

स्वतःचीच जडणघडण करण्याकरिता, आपला आत्मविश्वास अधिक बुलंद करण्याकरिता तरुण झेपावत आहेत. करुणेच्या स्पंदनावर, स्नेहतिरीपीवर...धुवांधार पावसातील युवाशक्तीच्या मोरपिसाऱ्यावरचा तो डोळा समाजाच्या साऱ्या सत्प्रवृत्तींना खुणावत आहे.

– विलेखन, 'गोपुरा'

अरुण गोसावी

मुंबई वार्ता

# एका दगडात चार

मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे सर्वांपेक्षा कुशल राजकारणी ठरले असे म्हणायला हरकत नाही. जाणार जाणार म्हणता म्हणता अधिक सामर्थ्यवान बनून परत आले आणि तेही पाच वर्षांच्या बोलीने. त्यांची माणसे मोक्याच्या जागी घेऊन. श्री. शंकरराव चव्हाण मात्र भोळे ठरले. येणार येणार म्हणता म्हणता गाळात रुतले. इतके, की त्यांच्या हातातील पाटबंधारे व वीज यांसारखे महत्त्वाचे खाते जाऊन शेतकी खात्याचा नांगर मात्र हाती आला. ज्या दिवशी शंकररावांचा भ्रम नाहीसा होऊन त्यांचे डोळे उघडले, त्या दिवशी नक्कीच त्यांना धक्का बसला असणार. महाराष्ट्र संसदीय काँग्रेसच्या बैठकीत श्री. वसंतरावांचे नाव अधिकृत रीत्या सुचविताना तर त्यांच्या आवाजाला करुण कातर आली होती म्हणे.

मुख्यमंत्रीपद स्वत:कडे कायम ठेवण्यात श्री. नाईक यांनी विजय मिळवला हे खरे आहे. प्रधानमंत्र्यांचे विश्वासू श्री. रजनी पटेल आणि केशवदेव मालवीय या दोघांनीही सांगितले आहे, की श्री. नाईक हे पूर्ण पाच वर्षे मुख्यमंत्री राहतील. परंतु नाईकांची नेतेपदी निवड झाली आणि मंत्रिमंडळाची यादी घेऊन ते दिल्लीला गेले त्याचवेळी तिकडून बातम्या आल्या, की नाईकांची पाळी दोनच वर्षे राहणार आहे. या बातम्यांचा इन्कार अद्याप झालेला नाही.

आणखी एक लक्षात ठेवले पाहिजे. मागे तशा अफवा होत्या आणि परवा काँग्रेसच्या विजयोत्सवात मुंबईत शिवाजी पार्कवर नाईकांनी स्वत:च सांगितले होते. नाईक म्हणाले, की त्यांनी अगोदरच प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना कळविले आहे, की माझा तुमच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास असून तुम्ही घालून दिलेली ध्येयधोरणे जशीच्या तशी अंमलात आणण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. नेतेपदाच्या निवडीच्या बैठकीतही नाईकांनी या गोष्टीचा अगदी ओझरता उल्लेख केला. श्री. यशवंतराव चव्हाण तेथे हजर होते. त्यांना वाईट वाटेल आणि बरे दिसणार नाही म्हणून नाईकांनी त्यांचेही नामस्मरण केले. पण त्यावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली, की श्री. नाईकांनी यशवंतरावांचे नेतृत्व झुगारून इंदिरा गांधींचे नेतृत्व

अधिकृतपणे स्वीकारले आहे. अर्थात आतापर्यंत हे उघड गुपित सर्वांनाच माहीत होते. पण परवा ही गोष्ट जाहीर झाली आणि त्यामुळेच त्यांचे मुख्यमंत्रीपद टिकले. त्यामुळेच एरवी 'अमुक झालं पाहिजे आहे—' अशा अधिकारवाणीने बोलणारे यशवंतराव नेतेपदाच्या निवडीच्या बैठकीत म्हणाले, 'तुम्ही मागाल आणि तुम्हाला हवा असेल तेव्हा, मागाल त्या प्रमाणात सल्ला द्यायला मी तयार आहे.'

म्हणजे या निवडणुकीनंतर श्री. यशवंतराव चव्हाणांच्या महाराष्ट्रावरील अबाधित नेतृत्वाला श्रीमती इंदिरा गांधींनी अधिकृतरीत्या धक्का दिला. श्री. नाईक यांच्या नव्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण आपला माणूस म्हणून फक्त शरद पवारलाच घुसवू शकले. त्यांचे निकटचे विश्वासू श्री. दादासाहेब जगताप आणि राजारामबापू पाटील यांना डिच्चू मिळाला.

याचा अर्थ श्री. नाईक खरोखरच अधिक सामर्थ्यवान बनले असाही नव्हे. कारण इंदिरा गांधींच्या सांगण्यामुळेच वसंतदादा पाटलांना मंत्रिमंडळात घेतल्याचे सांगण्यात येते. नाईकांवर शह ठेवण्यासाठीच वसंतदादांची योजना केली आहे असे कुणीही म्हणू शकेल. शिवाय मधुसूदन वैराळे आणि आबासाहेब पारवेकर अशांसारख्या आपल्या माणसांना नाईक मंत्रिमंडळात घेऊ शकले नाहीत. कल्याणराव पाटलांना-देखील प्रमोशन देऊ शकले नाहीत आणि पुन्हा नाईक दोन वर्षांपुरतेच राहणार, अशा दिल्लीच्या बातम्या. म्हणजे यशवंतराव, शंकरराव आणि नाईक या तिघांनाही नामोहरम करण्यात श्रीमती इंदिरा गांधींनी यश मिळविले असे मानण्यास हरकत नाही.

आता राहता राहिले वसंतदादा पाटील. दादांची मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकाची वर्णी लागल्यामुळे काय साधले हा प्रश्नच आहे. 'दोन वर्षां'च्या बातम्या जर खऱ्या असतील तर त्यानंतर कोण हा प्रश्न येतो. दोन वर्षांनंतर शंकररावांना प्रमोशन द्यायचे असते तर त्यांच्या हातचे महत्त्वाचें खाते काढून त्यांची मानहानी केली गेली नसती. दोन वर्षांनंतर आपल्याला संधी मिळण्याची शक्यता आहे या मृगजळाच्या मागे लागून तर वसंतदादा मंत्रिमंडळात आले नाहीत ना? परंतु येताना ते काँग्रेससंघटना आणि सहकारक्षेत्र यांवरील आपली पकड सोडून आले. कारण आता मंत्री झाल्यानंतर त्यांना महाराष्ट्रकाँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही रहाता येणार नाही आणि सहकारी संस्थांमध्येदेखील पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही. सहकारी क्षेत्राशी त्यांचा संबंधही नको म्हणून त्यांना ते खातेही मिळाले नाही. नाही तर सहकारी क्षेत्रातील त्यांचा अनुभव आणि कामगिरी बघता त्यांना ते खाते मिळायला काहीच हरकत नव्हती.

तेव्हा मुख्यमंत्रीपदाच्या आशेला लावून वसंतदादांना सहकार क्षेत्रातून उठविले व काँग्रेस संघटनेतून बाहेर काढले, शंकरराव चव्हाणांना नेतृत्वाच्या झगड्यात वापरून त्यांचे अवमूल्यन केले, तात्पुरते नेतेपदावर बसवून वसंतराव नाईकांच्या

पृष्ठ ६२ वर



दुर्गा भागवत
यांच्या
' पैस 'ला
या वर्षी
साहित्य अकादमीचं
पारितोषिक मिळालं.

# जीवनसंसारी दुर्गा भागवत

देवीदास बागूल

'पैस 'ला जेव्हा साहित्य अकादमीचं पारितोषिक मिळाल तेव्हा दुर्गा भागवतांच्या परिचयाची सगळ्यांनाच ओढ लागली. एवढं मोठं पारितोषिक मिळवणाऱ्या दुर्गा भागवत आहेत तरी कशा ? हजार प्रश्न आणि त्यांची हजारो उत्तरं. कोणी म्हणतात, की चिडखोर आहेत तर कोणी म्हणतात, की त्या फार प्रेमळ आहेत. कोणी म्हणतात, की त्या भांडकुदळ आहेत तर कोणी म्हणतात कुटुंबवत्सल आहेत. कोणी म्हणतात, की त्यांना विनोदाचं अंगच नाही, तर कोणी म्हणतात, की त्यांच्या अवखळ विनोदामुळं मन कसं प्रसन्नप्रसन्न होतं. कोणी हलक्या आवाजात विचारतात, की काहो, त्यांनी लग्न का नाही केलं ? राहतात कुठं ? करतात काय ? वागतात कशा ? बोलतात कशा ?

कोणी विचारतं, की पण काय हो, पैस म्हणजे काय ? म्हणजे एकवेळ दुर्गा भागवत कोण आहेत हे सावकाश बघू. पण ज्या पुस्तकाला बक्षीस मिळालं त्या पुस्तकाच्या नावाचा अर्थ तरी प्रथम कळू दे. नाहीतर त्या हिंदी सिनेमातल्या गाण्यासारख व्हायचं. ती गाणी आकर्षक वाटतात, गोड लागतात, आवडतातही. त्या ओळी नकळत ओठावरही येतात. पण त्या शब्दांचा अर्थ तसाच राहतो.

म्हणून कोणीही म्हणतो, की प्रथम 'पैस'चा अर्थ काय ते तरी सांगा.

पैस म्हणजे अवकाश. गोदावरी आणि प्रवरा या दोन नद्यांमधल्या एका साध्या गावात एक ओबडधोबड लहान खांब आहे. त्या खांबावरचा अदृश्य भाग ज्ञानेश्वरांना भासमान झाला. चारी क्षितिजांना भेदून आरपार जाणारा, आकाशालाही उंच ओढून त्याच्यावर थेट चैतन्याच्या बेंबीला भिडणारा भाग ज्ञानेश्वरांच्या डोळ्यांनी पाहिला आणि त्यांनी त्याला नाव दिले पैस ! आणि दुर्गा भागवतांनी आपल्या पुस्तकालाही तेच नाव दिले.

म्हणजे प्रकरण थोडेसे – नव्हे बरेचसे, भारीच दिसते आहे. म्हणजे या बाई विदुषीबिदुषी आहेत की काय ? नाही, विदुषी असायला हरकत नाही, पण मग त्यांच्या परिचयाचे सावकाश बघू. आताच काय घाई आहे ? आम्हाला वाटलं, की त्या कोणी ललित लेखिका वगैरे असतील तर वाचू त्यांची पुस्तकं. आता ललित म्हणजे अगदी कथाकादंबरीच हवी असं नाही. अवतीभोवतीचंही चालेल. अवतीभोवती सुंदर फुलं आहेत, फुलझाडं आहेत, फुलपाखरं आहेत, तारे आहेत, नक्षत्रं आहेत. खरं म्हणजे "आता आमचे जीवन शहरी झाले आहे. जीवनाचे उदिष्टही बदलू पाहाते आहे. तरी एवढे खरे, की कुठे गवताचे पाते हलू दे, अद्याप ते आमच्या डोळ्यांना रिझवते. सांजसकाळचे पूर्वपश्चिमेचे रंग सुखदायक वाटतात. वाऱ्याची झुळूक अपूर्व स्पर्शसुख देते. पावसाच्या सरी अजूनही कानांत काळाचे अनादी गूढ कवन ओततात."

वा वा ! हे तर तुम्ही सगळ्यांच्याच मनातले बोललात की ! तुम्हाला जर असला नाद असेल तर मग तुम्ही दुर्गा भागवतांच्या परिचयासाठी जीव पाखडायला हवा. एकदा का तुमचा त्यांच्याशी परिचय झाला तर त्याही अगदी तुम्ही वर जे म्हणालात ना तेच बोलून दाखवतील. दाखवतील असा भविष्यकाळ कशाला, त्यांनी असं बोलून दाखवलेलंच आहे. खोटं वाटत असेल तर दुर्गा भागवतांच्याच 'ऋतुचक्र' पुस्तकातील पान २ वरील वाक्ये पहा. तंतोतंत तुमचीच वाक्यं.

वाचा ना. पुढं वाचा. खरं म्हणजे वाचा म्हणून सांगण्याची गरजच नाही. तुम्ही स्वतःच ते पुस्तक अधाश्यासारखं वाचू लागाल. आणखी खरं सांगायचं म्हणजे ते पुस्तक वाचणं हे वाचणं नसेल; तर दुर्गा भागवत ह्या निसर्गवेल्हाळ बाईबरोबरच्या त्या रसाळ गप्पागोष्टी असतील. होय बाईबरोबरच्याच. त्या लेखनात स्वतःच्या स्त्रीत्वाच्या वैशिष्ट्यांचा त्यांनी त्याग करून एखादा लेखनमुखवटा धारण केलेला

नाही. किंवा अकारण संकोच स्वीकारून जीवसृष्टीतील जनन-मरणाच्या क्रियांचे दर्शन घेण्या-देण्याचेही टाळले नाही. कार्तिकातली ही हकीकत वाचा. ' जननाचा देखावा नेहमीच करुण, भयावह आणि विस्मयजनक असतो. पाकोळ्या, पुष्कळ कीटकांच्या माद्या नेहमीच अंडी घातल्याबरोबर मरतात हेही खरे. पण या जखमी पाकोळीचे ते मृत्युपथावर नेटाने जीवनाची पावले रुतवून जाणारे बाळंतपण मी कधी विसरणार नाही...तीन दिवसांचा संसार, की लगेच मृत्यू आणि मृत्यूचा स्पर्श होत असतानाच अपत्यनिर्मितीचा भीषण, दुर्दम्य आणि जणू काही देहातीत असा तो आविष्कार. हेच कीटकसृष्टीचे भव्य रोमहर्षक नाट्य तुम्हाला तृणातृणावर पानापानावर, झाडाझाडावर, धुळीत, खडकावर, अनंत आकृतीत, अनंत रंगात, अनंत सुरूप-कुरूप स्वरूपात, सूक्ष्मातल्या सूक्ष्म जीवजंतूच्या रूपानेही सतत प्रकट होत असल्याचे आढळून येईल. "

वरील ओळींतून आढळणारे दुर्गा भागवतांचे भावनाशील आणि चिंतनप्रवण व्यक्तित्व कोणत्याही जीवनप्रेमी संसारी माणसापेक्षाही अधिक जीवनप्रेमी आणि संसारी आहे. एक लग्न सोडले तर ही बाई पूर्णसंसारी आहे. संसारातल्या रंगाचं, गंधाचे, रूपांचे, रसांचे, स्वरांचे दुर्गा भागवतांना कुतुहल आहे, प्रेम आहे. म्हणूनच तर त्या ' सोनेरी आश्विन ' महिन्याच्या गोष्टी करताना म्हणतात, की " भाताच्या शेतांचा रंग पहा कसा पिवळा पडला आहे तो! आश्विनात एखादी पावसाची झड आली, की दुसऱ्या दिवशी दुपारी उन्हात भाताच्या शेताजवळून जा. भाताचा सुवास वातावरणात कोंदलेला आढळेल. या दिवसात मुंबई ते कल्याण एकदा तरी मी जाते. आणि ठाणे ते मुंब्रा, भातशेते रेल्वेलाईनजवळ पसरलेली असतात, त्यांचा दरवळणारा गंध गाडीत बसूनच हुंगण्याची मजा अनुभवते. वळवाचे पाऊस आले, की मातीचा सुवास जसा उत्तेजक वाटतो तसाच हा शेतातल्या भातांचा गंध. आश्विनात हा पहा, दारातल्या मोहरीच्या झाडांना कसा बहर आला आहे. चार दळी पिवळे धमक लहान फूल, किती नाजूक आणि गोड सुवास आहे त्याचा. जवळ जाऊन हुंगल्याखेरीज काही उमगायचा नाही. मोहरीच्या तिखट झाडाला, निंबाच्या कडू झाडाला इतक्या अवर्णनीय गंधाची देणगी देणाऱ्या सृष्टीची समता व योजकता पाहून मन गुंग होते. "

विदुषी विदुषी म्हणून गाजलेली ही लेखिका किती गंधवेडी आहे हे पहा तरी एकदा. मी तर असे विचारतो. की विद्वान माणसांचे तर सोडाच, पण अत्तरांचा शोकिन असलेला तरी कोणता माणूस भातशेतांचा गंध लुटण्यासाठी रेल्वेचा प्रवास मुद्दामहून करील ?

' ऋतुचक्र ' ह्या पुस्तकात ' समस्त सृष्टीला कवटाळणाऱ्या, हरघटकेला तिला हसवणाऱ्या, रडवणाऱ्या, नटवणाऱ्या आणि तिचा सगळा साजशृंगार हातांनी ओढून काढून तिला उन्हात तापवणाऱ्या, वाऱ्यात सुकवणाऱ्या, भिजवणाऱ्या '

ऋतूंचा जसा हृद्य परिचय होतो तसाच निकट परिचय दुर्गा भागवत ह्या जीवन-सन्मुख व्यक्तीचाही होतो. नव्हे सर्जनशील ऋतुचक्राचे आणि सर्जनशील दुर्गा भागवतांचे जीवनधागे एकत्रच गुंफलेले पहायला मिळतात.

निसर्गदर्शनाने दुर्गा भागवत जशा उमलतात आणि अंतर्मुख होतात तशाच त्या महाभारतातील अद्भुतरम्य जीवनदर्शनानेही मोहित होऊन एका विशाल अनुभूतीचा प्रत्यय घडवून देतात. 'व्यासपर्व' ह्या पुस्तकात दुर्गा भागवतांनी महाभारताचा अन्वयार्थ साधार लावला की निराधार लावला याबद्दलची मतमतांतरे थोडा वेळ बाजूला ठेवा. पण महाभारतातील संगीताने चाळवलेल्या दुर्गा भागवतांचे दर्शन कसे सहजरम्य वाटते ते बघा : "पांडवाघरून निघताना कृष्ण सुभद्रेचा निरोप घेतो असा प्रसंग. ओळी अशा :

सार्थं तथ्यं हितं वाक्यं प्रियं युक्तमनुत्तरम् ।
उवाच भगवान् भद्रां सुभद्रां भद्रभाषिणीम् ॥

यातल्या प्रासापेक्षा ठेक्याने मला चाळवले. त्या ओळी नकळत पाठ झाल्या. मनात घुमू लागल्या आणि मनाला एकच छंद लागला. तो कृष्णमुखातून उमटलेल्या नादपूर्ण शब्दांचा वेध घेण्याचा. अर्थपूर्ण, कल्याणकारक, उचित, प्रिय आणि ज्याच्यावर काही उत्तरच देता येणार नाही असे प्रिय भाषण कृष्ण बोलला. सुभद्रा मंजुभाषिणी होती. तिच्याशी बोलण्यात कृष्णाने भाषणसौष्ठवाची शीग गाठली. मग जेव्हा आणखीच उत्कट प्रसंग असेल, तेव्हा त्याचा आवाज अधिकच श्रवणीय होत असेल. गीता त्याने याच पवित्र्यात सांगितली. आणि मग गीतेच्या त्या प्रवचनात मला तऱ्हतऱ्हेच्या सुश्राव्य नादांची आवर्तने आढळू लागली. गीतेसारखी श्रवणसुभगता क्वचितच कुठे आढळेल. अपवाद फक्त वैदिक ऋचांचाच. इथून व्यासांच्या शैलीचे सौभाग्य प्रतीत होऊ लागले आणि कृष्णवाणीचे झंकार अधिक स्पष्ट झाले."

महाभारताचा आणि त्यातील श्रीकृष्ण आणि गीतेचा तत्त्वज्ञानाच्या आणि धार्मिकतेच्या पातळीशिवाय संगीताच्या पातळीवरून आस्वाद घेण्याचे सामर्थ्य दुर्गा भागवतांशिवाय कोणाला लाभले होते ? भगवत्‌गीता संगीतासाठी जवळ करणारे त्यांच्याशिवाय दुसरे कोणी मला तरी माहीत नव्हते. एकदा रेडिओवर 'मधुबनमे राधिका नाचे रे' हे चित्रपटगीत लागले, तेव्हा त्यातील हमीर रागाच्या सुरावटीने फुललेल्या दुर्गा भागवत ह्या चारचौघा रसिकांसारख्या म्हणता येतील. पण महाभारतातील संगीत ऐकू शकणाऱ्या दुर्गा भागवत ह्या चारचौघांसारख्या नाहीत. आणि तसा त्यांचा परिचयही 'व्यासपर्व'च्या पुस्तकाशिवाय दुसऱ्या कोणी घडवला नसता. दुर्गा भागवतांचा असा सौंदर्यशोधक आत्मा 'व्यासपर्वा'त ठायी-ठायी साद घालताना पाहून कुणाचेही मन सौंदर्यशोधक झाल्याशिवाय कसे राहील ?

त्या 'व्यासपर्वा'त सौंदर्यशोधक आणि सौंदर्यसर्जक दुर्गा भागवतांचा सत्याचा

कठोर स्वीकार करणारा आत्माही तितक्याच अविचलपणे भेटतो. मला स्वतःला तरी त्या पुस्तकातील ' पूर्णपुरुष कृष्ण ' हा लेख चिरस्मरणीय वाटतो. सगळ्यांना मोह घालणारा कृष्ण दुर्गा भागवतांनाही मोहक वाटतो. पण त्याच दुर्गा भागवत पुढची वाक्ये लिहितात तेव्हा सत्याची निर्मळ प्रातःकाळ उगवल्यासारखी वाटते. " पण तरीही कृष्ण आजच्या जगाच्या विशाल अनुभुतीत सामावेल असे म्हणता येणार नाही. कृष्ण फिरून आजच्या जगात फिरताना पाहावा, तो आला तर सुख मिळेल, असे मला वाटत नाही. किंबहुना तो त्या जुन्या वाङ्मयाच्या अवगुंठनात आहे तोवरच त्याचे चिरंतनत्त्व कायम राहील. कारण यंत्रयुग आले आणि कालही सावध झाला. जास्त शहाणा झाला. व्यासाच्या काळी, लोककथांतल्या कधी नव्हेशा कोणा एका कल्पित काळी, कृष्णाचे जीवन विश्वव्यापक झाले, पण आता व्यक्ति-जीवनाच्या समग्र कक्षा वाढल्यामुळे कोणताही एक सर्वांगीण पुरुष आताच्या सुसंस्कृत जीवनाला व्यापून दशांगुळे उरण्याइतका मोठा वाटणार नाही. "

कृष्णाच्या विश्वव्यापक प्रभावातून तुम्हाआम्हाला मुक्त करून स्वतःच्या पायावर चालायला प्रेरणा आणि धैर्य देणाऱ्या या वाक्यांचे मोल आज प्रत्येकाने जाणून घेतले तर सुखी आणि समृद्ध समाजनिर्मितीची वाटचाल सुगम व्हायला कितीसा अवकाश लागेल ?

दुर्गा भागवतांचा परिचय करून घेताना आणखी पुष्कळ गोष्टींचा उल्लेख करावा लागेल—उदा० त्यांनी भरतकामावरील लिहिलेले पुस्तक वगैरे. पण त्यांनी ' पूर्णपुरुष कृष्ण ' या लेखात मानवजातीच्या कल्याणासाठी कृष्णाचे सामर्थ्य आणि मर्यादा सांगण्यात जे अपार प्रगल्भत्व आणि धैर्य दाखविले आहे ते धैर्य आणि प्रगल्भत्व तुम्हा-आम्हाला नित्य जागृत ठेवील. आणि त्यामुळे दुर्गा भागवतांचे कधीही विस्मरण होणार नाही असे मला वाटते. जीवनसंसारावर मनापासून प्रेम करणाऱ्या दुर्गा भागवत आपल्या भावमुद्रा इतक्या ठिकाणी उमटवत चाललेल्या पाहून त्या ह्या नवनवोन्मेषशाली निसर्गाचेच एक रसरशीत फूल आहेत याचा सुखद आणि सर्जक प्रत्यय येऊ लागतो.

रवींद्र पिंगे

शब्दपालखी

# घटकाभर नाटककार कानेटकरांच्या सहवासात-

सुगीचे दिवस दिसावेत म्हणून माणसं शहरांकडे, मुंबई-पुण्याकडे, नागपूरकडे धावतात. कलावंत, लेखक, कवी, नट, नाटककार, चित्रकार – साऱ्यांचा ओघ पेटलेल्या मुंबईकडे असतो. कारण मुंबई–पुण्यात म्हणे माणसाच्या गुणांचं सोनं होतं. मुंबई कलावतांना लख्ख प्रकाशझोतात लोटते. ज्याला भलीबुरी प्रसिद्धी मिळावयाची आहे त्याने पैसा मिळवून देणाऱ्या राक्षसी शहरातच वसती केली पाहिजे असं कलावंत गृहीत धरतात. जे शहरांपासून दूर राहातात, ते आपल्या अप्रसिद्धीचं खापर आपल्या मुंबई-पुण्यापासून दूर असणाऱ्या वास्तव्याच्या माथ्यावर फोडतात. कितीतरी लेखकांना आपण चलती असणाऱ्या शहरांपासून दूर आहोत ह्याची खंत वाटते. आज मी नाशकाबाहेरच्या कोऱ्या करकरीत वस्तीत आलो आहे. नाटककार वसंत कानेटकरांकडे. मराठी रंगभूमीवरचा वस्ताद नाटककार म्हणून जे काही मानसन्मान मिळायचे असतात, ते सारे त्यांच्यापर्यंत आपल्या पायांनी चालत आलेले आहेत. ते काही मुंबई-पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात राहात नाहीत. तरीही प्रसिद्धीचा अतोनात झोत त्यांच्यावर पडलेला आहे. त्यांच्याबरोबर मी एच. पी. टी. कॉलेजच्या बाळबोध परिसरात पाय मोकळे करीत आहे. ते सांगत आहेत, ' हे आमचं कॉलेज. सेहेचाळीस साली मी इथे आलो. ह्या कॉलेजलाच लागून ते घर दिसतंय ना, तिथे मी रहात होतो. मला असं गावातल्या गोंधळापासून दूर, निवांत ठिकाणी रहाणं फार प्रिय आहे. मला घरी दरबार भरवणं आवडत नाही. घर हे घर आहे. चावडी नव्हे. पाच पन्नास माणसांची छावणी पडलेली आहे, माणसं तंबाखू चोळताहेत, चकाट्या पिटताहेत, हा येतोय तो जातोय – मला हे सहन होत नाही. मी आत्मरत माणूस आहे. मी बरा की माझं काम बरं, अशी माझी वृत्ती आहे. मी खेळतो, वाचतो, न्याहाळतो, लिहितो, शिकवतो, silent brooding करतो. तेच माझं जीवन. म्हणून मी गावापासून दूर राहतो. ' शिवाई ' हा माझा केवळ लेखनावर बांधलेला बंगलाही मी

असाच दूर, निवांत परिसरात बांधलेला आहे. रायगडाच्या संदर्भातल्या देवीचं नाव मी माझ्या वास्तूला मुद्दामच दिल आहे. चला, आपण आपल्या घरी जाऊन मोकळेपणाने गप्पा मारू या.'

आम्ही घरी आलो. तोंड चाळवायला हवंच होतं. म्हणून फालतू प्रास्ताविकात वगैरे वेळ न घालवता, मी सरळ विषयालाच हात घातला.

कानेटकर, तुम्ही गिरीश कवींचे चिरंजीव. म्हणजेच, तुमचा जन्म वाङ्मयीन वातावरणात झाला. त्याचा जो काही नफातोटा व्हायचा तो तुमच्या वाट्याला आलेला असणारच. त्या सुरुवातीच्या काळाबद्दल काही सांगाल काय ?

सांगतो. शंकर के. कानेटकर उर्फ गिरीशकवी हे माझे वडील. सौ. माई ही माझी आई. गिरीश-माईंना चार मुलं. माझा थोरला भाऊ मधुकर तुमचा स्नेहीच आहे. आकाशवाणीच्या पाकिस्तान सरहद्दीनजीकच्या भुज ह्या केंद्राचा तो संचालक आहे. ही व्यावसायिक हुद्याची बाब सोडली तरी तो एक तयार गवई आहे. कोल्हापूरला गोविंदराव टेंबे आणि भुर्जिखाँसाहेब यांची तालीम त्याने मनःपूर्वक घेतलेली आहे. त्यांचं रागज्ञान उत्तम आहे. मधुकरनंतर माझा जन्म. माझ्या नंतर एक भाऊ आहे. तो रांचीला इंजिनियर आहे. आम्हा तीन भावांना एक बहीण आहे. ती इथेच नाशिक कॉलेजातल्या विज्ञानशाखेतले प्राध्यापक कुर्लेकरांकडे दिलेली आहे. माझा जन्म सातारा जिल्ह्यातल्या रहिमतपूर ह्या गावी वीस मार्च एकोणीसशे बावीसला झाला. आम्ही कानेटकर मंडळी रहिमतपूरची. आमचं मूळ घराणं सावकाराचं. गडगंज संपत्ती कानेटकरांकडे होती गिरीशांची मुंज होईपर्यंत ती दौलत टिकली. नंतर रहिमतपुरातल्या आमच्या वाड्यावर दोन दरोडे पडले. त्यात घरातली पै न् पै लुटली गेली. पैशांचा रातोरात खडखडाट पडला. गिरीश गरीब झाले. नोकरी करून शिकले. ते प्राधापक झाले ते फारच उशिरा. अगदी शेवटी शेवटी. कारण एम. ए. होईपर्यंतच त्यांची चाळीशी उलटली. त्या अगोदरचं सारं आयुष्य मास्तरकी करण्यात त्यांनी घालवलं. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते शिक्षक होते. त्यानंतर अहिल्यादेवी शाळेचे ते मुख्याध्यापक झाले. फलटणच्या शाळेतही ते शिक्षक होते. चाळीस साली सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये ते मराठीचे प्राध्यापक म्हणून गेले. तिथे पंधरा वर्षे काम करून चोपन्न साली ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर दोन-चार वर्षं ते पुन्हा फलटणला शिक्षक म्हणून गेले. आज त्यांचं वय एक्याऐंशी आहे, पुण्यालाच पुतण्याकडे रहातात. माझ्याकडे वर्षाकाठी एखादा मुक्काम करतात. पण सध्या त्यांना प्रकृतीचं स्वास्थ्य नाही. पक्षघात झाला. त्यातून सावरले. हृदयविकाराचा झटका आला, त्यातूनही वचावले. आता अधूनमधून वयोमानपरत्वे विस्मरण वगैरे होऊ लागलंय. लेखनकार्य संपलेलंच आहे. मुळचंच हाडपेर भक्कम असल्यामुळे ते इतपत मुकाबला करू शकले आहेत. गिरीश

आणि माई, दोघंही कृतार्थ आहेत. त्यांचा रास्त अभिमान आम्ही वाहातो आहोत.

लेखक म्हणून पुढे येण्याच्या दृष्टीने गिरीशांचा तुम्हाला कितपत फायदा झाला ?

वशिला ह्या अर्थाने आमच्या वडिलांचा फायदा मला अजिबात झाला नाही. प ण माझा वाङ्मयीन पिंड घडवला जाण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मी चार व र्षांचा असताना, म्हणजे सव्वीस साली पुण्याला रविकिरण मंडळ स्थापन झालं. श्री. बा. रानडे, माधव ज्युलियन, यशवंत, गिरीश वगैरे कविमंडळींनी त्याचा पाळणा जोजवला फुटक्या बुरुजाजवळ '४६१ शनिवार' हा जो रविकिरण मंडळाचा पत्ता होता, तेच आमचं घर. आमच्या घरी अष्टौप्रहर लेखकांचा आणि कवींचा राबता असायचा. सतत कवितावाचनाचे कार्यक्रम चालायचे. चर्चा सतत वाङ्मयाबद्दल चालत. यशवत, नाना रानडे हे नेहमी कविता वाचून दाखवायला घरी यायचे. त्यामुळे माझ्या कानावर सतत चांगलं वाङ्मयच पडत राहिलं. रवि-किरणमंडळाचे कवी टोळी करून एकत्र, एकोप्याने वावरले म्हणून त्यांच्या काव्य-गुणांचा इतका बोलबाला झाला. ते जर वेगवेगळ्या ठिकाणी अलग अलग राहून काव्यनिर्मिती करत राहिले असते तर त्यांचा इतका प्रकाश पडला नसता. पण ते असो. आमच्या घरी त्यावेळी सतत वाङ्मयीन वातावरण होतं हेच खरं. अजाणता माझ्या मनोघडणीवर त्याचा परिणाम झाला असणार. त्या कवितांचं मर्म किंवा त्या चर्चांचं सारं मला आकलन होत होतं असं नाही. पण कविता करणं, वाङ्मया-बद्दल बोलणं, ह्यांना काही अर्थ आहे, हे मला जाणवायला लागलं. शनिवारातून आमचं बिऱ्हाड गायकवाडवाड्यात गेलं. तिथलेही दिवस चांगले आठवतात. आमच्या घरी माधव ज्युलियन यायचे, कविता ऐकायचे, वाचायचे, ते अगदी लख्ख आठवतं. गिरीशांची दुसरी शिकवण, की जी मला जन्मभर उपयोगी पडत आली आहे, ती म्हणजे त्यांनी मला नाट्यपूर्ण वाचनाची संथा दिली. विठ्ठलराव घाटयांच्या 'नाट्यरूप महाराष्ट्र'तले संवाद त्यांनी माझ्याकडून तोंडपाठ करून घेतले होते. ते नाट्यानुकूल अविर्भावात कसे बोलायचे हे त्यांनीच माझ्याकडून घोटून घेतलं. सदतीस साली कॅप्टन रानडे वक्तृत्व स्पर्धेत मला उत्तम भाषण केल्याबद्दल अडीचशे रुपयांचं पहिलं पारितोषिक मिळालं होतं; ती तयारी गिरीशांनीच करून घेतली होती. ह्या साऱ्या लहान लहान घटना संस्कारांच्याच बाबी ठरल्या.

तुमच्या ह्या संस्कारांच्या काळात प्रमुख अशा घटना कोणत्या घडल्या, की ज्यांचा जाणता-अजाणता परिणाम तुमचं व्यक्तिमत्व साकार होण्यात झाला ?

गिरीश कविता करायचे. माई ऐकायच्या. गिरीश काव्यागायन करायचे. ह्यातून आपणही काव्यगायन करावं असं वाटायला लागलं. माझा आवाज गोड होता.

त्यामुळे गिरीशांची " खुळा पाऊस " ही कविता मी चालीवर गाऊ लागलो. एच. एम. व्ही. ने नंतर माझी त्या काव्यगायनाची पस्तीस साली एक ध्वनिमुद्रिका काढली. त्यामुळे आकांक्षा उत्पन्न झाली. काव्यगायनाची मी लागोपाठ तीन वर्षं पहिली पारितोषिकं मिळवली. मला पहिलीला, मॅट्रिकला आणि बी. ए. ला, अशा तिन्ही मोक्याच्या वेळी गिरीशच शिक्षक म्हणून लाभले हा फायदाच झाला. मी कॉलेजमध्ये नाटकात कामं करू लागलो. भालबा केळकरांनी आणि मी नाटकात स्त्रीभूमिका केलेल्या आहेत. बाबुराव गोखलेही त्यावेळी नाटकात आमच्याबरोबर कामं करायचे. उमाकांत ठोमरेही आमच्याबरोबरच नाटकात भूमिका करायचे. नंतर मी आकाशवाणीसाठी श्रुतिका लिहू लागलो 'काय करू मी आता?' ही माझी पहिली श्रुतिका एकूणचाळीस साली आकाशवाणीवर मोहन नगरकरांनी सादर केली. ते एक नवं क्षेत्र सापडलं. किर्लोस्कर, यशवंत, मनोहर, सत्यकथा वगैरे मासिकांमधून मी कथालेखन सुरू केलं. गोष्टी तर चिक्कार लिहिल्या. मी इंटरमध्ये असताना माझी पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली. 'मनोहर' मध्ये मी भराभर गोष्टी लिहून किर्लोस्करकडे पाठवायचो नि ते त्या तितक्याच उत्साहाने साभार परत करायचे. दहा कथा पाठवाव्यात, तर एखादीचीच वर्णी लागे. पण मी नाऊमेद झालो नाही. ह्या साऱ्या गोष्टींचा माझ्यातला नाटककार तयार होण्याकडे निश्चितच उपयोग होत होता. त्यावेळचं ते लेखन अर्थातच सामान्य असेल, पण माझ्या हाताला लिहिण्याचं वळण खचितच लागत होतं. मी सेहेचाळीस साली नाशिकला प्राध्यापक म्हणून आलो. तरीही माझी उमेदवारी सुटेना. नाशकातली पहिली पाच सहा वर्षंसुद्धा माझी उमेदवाराच्या वृत्तीने सटरफटर लेखन करण्यातच गेली. प्राध्यापक झाल्यानंतर सेहेचाळीस ते पन्नास ह्या पाच वर्षांत मी किरकोळ असं खूप हॅक रायटिंग केलं. पन्नास तरी कथा लिहिल्या असतील. ह्याचा फायदा एवढाच झाला, की आपला पिंड लघुकथा लेखकाचा नाही. हे माझ्या पुरतं ध्यानात आलं. मी पन्नास सालानंतर, म्हणजे तिशीच्या घरात आल्यावर कथालेखन सोडलं ते सोडलंच.

कथालेखनानंतर तुम्ही कुठल्या वाङ्मयप्रकाराकडे वळलात?

कथालेखनाचं नाव टाकल्यानंतर मी माझा मोर्चा कादंबरीलेखनाकडे वळवला. 'घर' ही कादंबरी सुरुवातीला मी कथा म्हणून लिहायला घेतली, पण ती पसरत जाऊन तिला कादंबरीचा घाट आला. ती पन्नास साली प्रसिद्ध झाली. तिला प्रस्तावना प्रि. गोकाकांची आहे. बावन्न साली 'पंख' प्रसिद्ध झाली. ही मात्र योजकतापूर्वक कादंबरी म्हणूनच मी लिहायला घेतली होती. तिचं हस्तलिखित तुमच्या देवीदास बागूलनं तयार केलं. त्यावेळी तो नाशिकला आमच्या कॉलेज-

पृष्ठ ५२ वर

# निवडणूक निकालांचा अर्थ

वा. दा. रानडे

लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुका काँग्रेसने प्रचंड बहुमताने जिंकल्या. इंदिरा विजयाच्या पुरात एकही अखिल भारतीय विरोधी पक्ष तग धरू शकला नाही. डावे व उजवे सर्वांचीच वाताहात झाली. सोळा राज्ये व दोन केंद्र-प्रदेशांपैकी मेघालय आणि मणिपूर ही राज्ये व गोवा हा केंद्रप्रदेश सोडून बाकी सर्वत्र काँग्रेसने दणदणीत विजय मिळविला. काँग्रेसच्या या प्रचंड विजयाचे विवेचन करण्यापूर्वी जेथे इंदिरा गांधींचा प्रभाव पडला नाही त्या मणिपूर, मेघालय व गोवा येथील निवडणुकांचा विचार प्रथम करू या.

या तीन प्रदेशांत गोवा महाराष्ट्राला अधिक जवळचा. भाषिक दृष्ट्या तसाच सांस्कृतिक दृष्ट्या. गोवा महाराष्ट्रात विलीन झाला पाहिजे अशी गोमंतकीय महाराष्ट्रीयांची अनेक वर्षांची मागणी आहे. गोवा, बेळगाव कारवारशिवाय संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र पुरे होत नाही. मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने तेथे हुकमी बहुमत मिळवून गोमंतकीय जनता महाराष्ट्रवादी पक्षाच्याच बाजूला आहे हे पुन्हा एकदा सिद्ध केले. हिंद-पाक युद्धातील विजयाच्या लाटेवर स्वार होऊन गोवा आपण सहज जिंकू असा काँग्रेस नेत्यांचा आडाखा होता. त्यामुळेच बांदोडकरांची सहकार्याची विनंती झिडकारून काँग्रेसने १९ जागा लढविल्या, पण त्यांपैकी फक्त एक जागा जिंकली तीही गोव्याची नव्हे तर दमणची. काँग्रेस उमेदवारांपैकी सातजणांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. अनामत रक्कम जप्त होणारात म. गो. पक्षातून फुटून काँग्रेसला मिळालेले विधान सभापती गोपाळ अप्पा कामत व माजी शिक्षणमंत्री मयेकर आहेत.

विशेषत: गोवा स्वातंत्र्यसैनिक तेलू मॅस्कारेन्हास यांची अनामत रक्कम जप्त व्हावी हे विशेष जाणवते. याचा अर्थ मॅस्कारेन्हास यांच्याबद्दल गोव्यातील जनतेला आदर नाही असे नव्हे पण त्यांनी धरलेली कॉंग्रेसची संगत त्यांना नापसंत होती. गोव्यातील दौऱ्यात पंतप्रधान श्रीमती गांधींनी बांदोडकरांवर जी टीका केली त्याची उलटीच प्रतिक्रिया होऊन जनतेने बांदोडकरांच्या पक्षाला निर्णायक बहुमताने निवडून दिले. कॉंग्रेसच्या धोरणाशी आमचे मूलत: मतभेद नाहीत, आमचा पक्ष निवडणुका न लढविता कॉंग्रेसला बिनशर्त पाठिंबा देण्यास तयार आहे, पण सध्याची गोवा कॉंग्रेस बरखास्त करून अस्थायी समिती नेमा अशी सूचना बांदोडकरांनी कॉंग्रेस श्रेष्ठींकडे केली होती, पण इंदिरा गांधी व कॉंग्रेसश्रेष्ठी काकोडकरांच्या बदसल्ल्याने चालले व त्यांनी निवडणूक गमावली.

म. गो. पक्षातून फुटून एका गटाने नवमहाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष काढला होता. पण या फुटिरांना गोव्यात काही स्थान नाही हे जनतेने दाखवून दिले. या पक्षाने चौदा उमेदवार उभे केले होते. त्यांपैकी निवडून एकही आला नाही. उलट बारा जणांच्या अनामत रकमा जप्त झाल्या.

युनायटेड गोवन्स हा महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचा मुख्य प्रतिस्पर्धी पक्ष. पणजी व कुडचडे या त्या पक्षाच्या जागा जिंकून म. गो. पक्षाने आपले बळ वाढविले. यु. गो. पक्षाला फक्त १० जागा मिळाल्या. एक अपक्ष उमेदवार विजयी झाला. त्याचा पाठिंबा बांदोडकरांच्या पक्षास आहे. म्हणजे एकूण ३० सभासदांत १९



इंदिरा-झंझावातात पराजय तर सोडाच पण प्रचंड विजय

सभासदांचा पाठिंबा असल्याने बांदोडकर स्थिर सरकार स्थापन करू शकतील. काँग्रेसला गोव्यात पाठींबा मिळवायचा असेल तर महाराष्ट्रवादी लोकमताला डावलून चालणार नाही हाच कौल या निवडणुकीत गोव्यातील जनतेने निर्णायकपणे दिला आहे.

मेघालयात काँग्रेसचे वजन नसल्याने काँग्रेसने बहुमताचा प्रयत्नही केला नाही. पहाडी नेते परिषदेशी समझोता करून काँग्रेसने फक्त १३ जागा लढविल्या व त्यापैकी ९ जिकल्या. मेघालयाला पूर्ण राज्याचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर तेथे प्रथमच निवडणुका झाल्या. पहाडी नेते परिषदेने सतत चळवळ करून पूर्ण राज्याची आपली मागणी मिळविली तेव्हा तेथील जनता तिलाच मोठ्या बहुमताने निवडून देणार हे उघड होते.

मणिपूरचा निकाल मात्र काँग्रेसच्या दृष्टीने अनपेक्षितच होता. तेथे १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसने ३० पैकी १६ जागा जिंकून निर्णायक बहुमत मिळविले होते. त्यानंतर आणखी चार सभासद काँग्रेसला मिळाले होते. पण यावेळी तेथे काँग्रेसला ६० पैकी फक्त १७ जागा मिळाल्या. म्हणजे जागाची संख्या दुप्पट वाढूनही काँग्रेसला १९६७ पेक्षा फक्त एक जागा अधिक मिळाली. दुसऱ्या कोणत्याही पक्षाला निर्णायक बहुमत मिळालेले नाही. मणिपूर पीपल्स पार्टीला १५ जागा मिळाल्या. त्यामुळे आघाड्या स्थापून सरकार स्थापण्याचे प्रयत्न होतील. आयाराम-गयारामांना संधी मिळेल, त्यातून राज्यात अस्थिरता निर्माण होण्याचाच संभव दिसत आहे.

बाकीच्या राज्यांत काँग्रेसने केवळ साधे बहुमत नव्हे, तर दोन तृतियांश जागा मिळविल्या आहेत, त्यात सर्वात अनपेक्षित निकाल पश्चिम बंगालचा आहे. काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळणे कठीण आहे. पण मिळाले तरी अल्प बहुमत मिळेल असे अंदाज होते. मार्क्सवाद्यांची एवढ्या मोठ्या प्रमाणात वाताहात होईल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. काँग्रेसने २१६ म्हणजे शेकडा ७७ जागा जिंकल्या. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसच्या यशाचा हा विक्रम आहे. यापूर्वी सर्वात जास्त ६३·०२ टक्के जागा काँग्रेसने १९५२ च्या निवडणुकीत मिळविल्या होत्या. कांग्रेसच्या विजयाइतकीच मार्क्सवाद्यांच्या वाताहातही लक्षात घेण्यासारखी आहे. १९६७ मध्ये ४३, १९६९ मध्ये ८०, १९७१ मध्ये १११ याप्रमाणे मार्क्सवाद्यांचे बळ सतत वाढत गेले होते. पण यावेळी ते १४ पर्यंत खाली आले. मार्क्सवाद्यांच्या अनेक जागा काँग्रेसने जिंकल्या. त्यांचे नेते ज्योती बसू ३९ हजार मतांनी पराभूत झाले. काँग्रेसच्या विजयाचे मुख्य कारण म्हणजे निर्वासितांचा प्रश्न काँग्रेसने यशस्वीपणे सोडविला. निर्वासितांचा भार मुख्यत: पश्चिम बंगाललाच पेलावा लागला होता. पण सर्व निर्वासित निवडणुकीपूर्वीच परत गेले. काँग्रेस सरकार आपले इतर प्रश्नही सोडवील अशी आशा त्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झाली. याउलट मार्क्सवाद्यांनी जनतेची

निराशा केली. १९६७ व १९६९ अशा दोन निवडणुकांत जनतेने डाव्या पक्षांना संधी दिली. पण त्यांनी ती गमावली. जनतेच्या हितांचे प्रश्न सोडविण्यापेक्षा त्यांना आपसातील संघर्ष अधिक महत्त्वाचे वाटले. मार्क्सवाद्यांनी इतर पक्षांवर आपली भूमिका व कार्यक्रम लादण्याचा प्रयत्न केला त्यामुळे आघाडी दुभंगली. पश्चिम बंगालमध्ये अस्थिरता निर्माण झाली. १९७१ च्या निवडणुकीनेही ही अस्थिरता दूर झाली नाही. पण जनमत काँग्रेसकडे झुकू लागले आहे हे त्या निवडणुकीने दाखवून दिले. १९६९ च्या निवडणुकीत काँग्रेसला फक्त ५५ जागा मिळाल्या होत्या. ही संख्या १९७१ मध्ये १०६ पर्यंत वाढली. व १९७२ मध्ये आणखी दुपटीपेक्षा अधिक वाढून काँग्रेसने घवघवीत बहुमत मिळविले.

काँग्रेसला एवढे मोठे यश मिळण्याचे दुसरे कारण म्हणजे तिने कम्युनिस्टांशी केलेली युती. या युतीचा फायदा दोन्ही पक्षांना मिळाला. काँग्रेसला तर मोठे यश मिळालेच पण कम्युनिस्टांच्याही जागा वाढल्या. कम्युनिस्टांनी ४१ जागा लढविल्या. त्यांपैकी ३५ जिंकल्या. १९७१ च्या निवडणुकीत अशी युती नसताना कम्युनिस्टांना फक्त १३ जागा मिळाल्या होत्या.

## पुनरावृत्ती होऊ शकेल

निवडणुकीत मार्क्सवाद्यांचा मोठा पराभव झाला असला, तरी मार्क्सवादी संपले असा त्याचा अर्थ करणे चुकीचे होईल. मार्क्सवाद्यांच्या यावेळच्या पराभवाची तुलना केरळमधील १९६० च्या निवडणुकीतील कम्युनिस्ट पराभवाशी करता येईल. काँग्रेस, प्रजासमाजवादी आणि मुस्लीम लीग यांनी कम्युनिस्टांविरुद्ध आघाडी केली होती. त्यावेळीं केरळमध्ये कम्युनिस्टांचा असाच मोठा पराभव झाला होता. पण त्यातून सावरून १९६७ मध्ये कम्युनिस्ट पुन्हा अधिकारावर आले. जनतेने दिलेल्या संधीचा फायदा घेऊन काँग्रेसने चांगला कारभार दाखवला नाही तर जनमताचा कल पुन्हा मार्क्सवाद्यांकडे झुकण्याचा संभव आहे.

आपला पराभव डोळ्याना दिसू लागताच निवडणुकीत बनवाबनवीचे, दडपणाचे, दहशतीचे प्रकार झाले अशी ओरड मार्क्सवाद्यांनी सुरू केली. त्यांनी आपला पराभव खुलेपणाने मान्य करून आपल्या चुका सुधाराव्यात हे उत्तम.

पश्चिम बंगाल एवढे मोठे नसले, तरी स्थिर सरकार स्थापण्याइतके बहुमत काँग्रेसने बिहारमध्ये मिळविले आहे. एकूण ३१८ जागांपैकी काँग्रेसला १६७ मिळाल्या. १९६७ पासून सुरू झालेली घसरगुंडी काँग्रेसने सावरली असली, तरी १९६२ एवढे यश काँग्रेसला मिळालेले नाही. काँग्रेसने १९६२ मध्ये १८५ जागा जिंकल्या होत्या. बंगालप्रमाणेच बिहारमध्येही काँग्रेसने कम्युनिस्टांशी युती केली होती. तिचा फायदा दोन्ही पक्षांना मिळाला. काँग्रेसला हुकमी बहुमत मिळाले तर कम्युनिस्टांच्या जागा वाढून काँग्रेस खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचे स्थान त्या पक्षाने मिळविले. १९५७ पासूनच्या पाच निवडणुकांत बिहारमध्ये कम्युनिस्टांचे बळ ७, १२, २४, २५, ३५, ३५ असे वाढत गेले आहे. संयुक्त समाजवादी व प्रजा-

समाजवादी पक्षाच्या एकीकरणाने समाजवाद्यांचे बळ वाढेल अशी अपेक्षा होती. पण उलट त्यांचे बळ घटले. या दोन पक्षांना मिळून ११६७ मध्ये ८४, १९६७ मध्ये ७० व यावेळी फक्त ३४ जागा मिळाल्या. दुसऱ्या क्रमाकांचे स्थान पक्षाने गमावले. जनसंघ आपले बळ वाढवू शकला नाही. त्याला १९६७ एवढयाच २६ जागा मिळाल्या. १९६९ च्या निवडणुकीत त्याने ८ जागा जास्त जिकल्या होत्या पण त्या यावेळी गमावल्या. ११६७ नंतरची अस्थिरता संपून बिहारमध्ये स्थिर सरकार स्थापन होण्याची शक्यता यावेळी बरीच दिसत आहे.

## बालेकिल्ले सर केले

गुजरात व म्हैसूर हे संघटना काँग्रेसचे बालेकिल्ले काँग्रेसने मोठ्या बहुमताने सर केले. गुजरातेत १६८ पैकी १३९ जागा काँग्रेसने जिंकल्या. १९६७ पेक्षा ४६ जागा अधिक मिळवून काँग्रेसने आपली बाजू चांगलीच बळकट केली. संघटना काँग्रेसला फक्त १६ जागा मिळाल्या. स्वतंत्र पक्षाने १९६७ मध्ये ६४ जागा जिकून दुसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविले होते पण यावेळी त्याला एकही जागा मिळाली नाही. जनसंघाने आपले बळ १ वरून ३ पर्यंत वाढविले. कम्युनिस्टांनी गुजरातेत प्रथमच एक जागा मिळविली. पण काँग्रेसच्या तुलनेने सर्वच विरोधी पक्ष फार दुबळे आहेत.

म्हैसूरमध्ये काँग्रेसने एकूण २१६ जागांपैकी १६५ जिंकल्या आणि १९५७ पासूनच्या चार निवडणुकात नवा विक्रम केला. १९५७ साली ७२ टक्के जागा मिळाल्या होत्या. यावेळी ७६ टक्के मिळाल्या. संघटना काँग्रेसला फक्त २४ जागा मिळाल्या. इतर पक्षांपैकी एकाही पक्षाला ५ पेक्षा अधिक जागा मिळालेल्या नाहीत.

मध्यप्रदेशात यावेळी आपण बहुमत मिळवू अशी आशा जनसंघाच्या नेत्यांना वाटत होती. पण निवडणूक निकालांनी त्यांना धक्का दिला. एकूण २९६ जागांपैकी जनसंघाला ४८ म्हणजे एक चतुर्थांशापेक्षाही कमी जागा मिळाल्या. १९६७ साली या पक्षाने ७८ जागा जिंकल्या होत्या. म्हणजे त्याचे बळ वाढण्याऐवजी ३० जागांनी घटले. काँग्रेसने २२० म्हणजे ७६ टक्के जागा जिंकल्या. हे प्रमाण १९६२ व १९६७ पेक्षा जास्त असले तरी १९५७ चे स्थान काँग्रेसला गाठता आलेले नाही. त्यावर्षी काँग्रेसला २८८ पैकी २३२ म्हणजे ८०.५५ टक्के जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसने तीन चतुर्थांशपेक्षा अधिक जागा यावेळी मिळवल्या असल्याने अस्थिर सरकारची आता भीती नाही.

राजस्थानात काँग्रेसने यावेळी १८८ पैकी १४५ म्हणजे ७८ टक्के जागा जिंकून पाच निवडणुकांत विक्रम केला. यापूर्वी १९५७ मध्ये काँग्रेसला ६७ टक्के जागा मिळाल्या होत्या. १९६७ व १९७२ या दोन निवडणुकांत स्वतंत्रपक्षाचे बळ ४९ वरून ११ पर्यंत व जनसंघाचे २२ वरून ८ पर्यंत खाली आले. काँग्रेसने कम्युनिस्टां-

पृष्ठ ४९ वर

अय्यो ! मदरास्स !!

नलिनी अंबाडे

# म्हातारी गेल्याचं दुःख नाही, पण....

तुमच्या मराठीत अशी काही तरी म्हण आहे ना ? आमच्याकडे अशी काही म्हण नाही अन् म्हणूनच की काय काळ फार सोकावला आहे इकडे. तो दरवेळी 'जातीय दंगलीचे' स्वरूपात दिसतो आम्हाला. केरळमधील जानेवारी महिना दंगलींनी गाजला हे 'माणूस'नेच तुम्हाला 'स्वामीये शरणमय्यप्पा'त सांगितलेच आहे. आठवतं ना ? डिसेंबरच्या ३१ तारखेस 'तेलिचेरी'चे भिवंडी झाल्याचं आठवतं ना ? मग फेब्रुवारीने काय म्हणून शांत रहावं ?

तेलिचेरी दंगलीत झालेल्या हानीची अधिकृत आकडेवारी, परवा गृहमंत्री श्री. के. करुणाकरन् यांनी सभागृहात सादर केली. बघायचीय ? २०४ घरे, २३२ दुकाने, ८२ प्रार्थनास्थाने किंवा पूजास्थाने, १२ सार्वजनिक स्थाने दंगलीत सापडली — म्हणजेच लुटालूट, जाळपोळ किंवा दोन्ही. सरकारतर्फे नुकसानीचा आकडा २० लाखांचा अंदाजला. (मद्रासच्या भारदस्त व विश्वासार्ह अशा 'हिंदू' पत्राचा अंदाज आहे ५० लाखांचा) मंत्रीमहाशयांनी सांगितले, की ६०३ केसेस नोंदविल्या असून, ४४७जणांना अटक केली आहे. संबंधित डी. एस्. पी., इन्स्पेक्टर व सब इन्स्पेक्टर तिघांनाही सस्पेंड केलेले आहे. चौकशीसाठी एकसदस्य कमिशन नेमलेले असून, साक्षीदारांस पूर्ण संरक्षण देण्यात येईल. एवढ्यात कुणीतरी सभासदाने विचारले, 'दंगलीनंतर आता अधिक प्रमाणात 'काही जातीय पक्ष' शस्त्रास्त्रांची जमवाजमव, नेमबाजीचे शिक्षण वगैरे करीत आहेत, त्याची सरकारला कल्पना आहे काय ?' त्यावर मंत्रीमहाशय वदले, 'होय, त्यांच्यावर सरकारचे बारीक लक्ष आहे. लौकरच खाजगी शस्त्रांच्या शिक्षणावर सरकार बंदी घालणार आहे' — प्रश्नकर्त्याचे समाधान झाले, की अशा बंदीस पंचांगात शुभमुहूर्त शोधण्यास वेळ हवाच !

तेलिचेरी दंगलीत जळालेल्या 'प्रार्थनास्थानांचे' नव्याने बांधकाम करण्याकरिता, केरळ सरकारने दहा लाख रुपये मंजूर केले — सात लाख नंतर मिळणार आहेत. ह्या सतरा लाखांच्या मंजुरीवर हरकत घेणारा दावा ए. रघूनाथ नामक एका सद्गृहस्थांनी, एक करदाता ह्या नात्याने हायकोर्टात दाखल केला. त्यांचे म्हणणे पडले, 'एकीकडे केरळ बजेटात ५॥ कोटींची नवी करवाढ करूनही, अकरा कोटींची तूट शिल्लक आहेच. म्हणजे पूर्ण घाटा होतो साडेसोळा कोटी ! अशावेळी

हे सतरा लाख ' प्रार्थनास्थानांवर ' खर्च करण्यात, घटनेच्या २७ व्या कलमाचा भंग होत आहे. '— कोचीनच्या हायकोर्टाने दावा फेटाळून लावला. कारण ? सरकारतर्फे सांगण्यात आले की, " नवीन ' प्रार्थनास्थाने 'बांधणार नाहीच मुळी, दंगलीत अल्पसंख्याकांची झालेली हानी भरून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे."

तेलिचेरीचे भिवंडी होते न होते तोंच ' पूवार 'चे तेलिचेरी झाले. पूवार नामक छोटीशी नदी, अरबी समुद्रास त्रिवेंद्रमपासून ९ मैलांवर मिळते. तो मुखाचा प्रदेश म्हणजेच दलदल, झाडी, उथळ पाणी आणि मुख्य शहराच्या पोलीसांच्या कक्षेबाहेर, असा प्रदेश चोरट्या व्यापारास किती सोईस्कर बरं ! तसा चोरट्या व्यापारास संपूर्ण केरळचाच किनारा आज वापरला जातो. मुंबईच्या बाजूचे पोलीस भारी वाईट ! कसातरी त्यांना सुगावा लागतो आणि मग धाड ठरलेलीच. त्यामानाने इकडे दूरवर ती भीती फार कमी. त्यामुळे केरळचा किनारा ह्या धंद्यास छान. आपल्याकडे जसे नियमितपणे पंढरीची वारी करणारे आहेत, तसेच तिकडे ' दुबईवारी 'करणारे आहेत. चोरट्या सोन्याप्रमाणेच मग कापडचोपड, तांदूळ, शस्त्रे, काडतुसे, पेने, घड्याळे, बिनपासपोर्टवाले यांची जा ये हे ओघानेच आले. पुढे कटकटीही आल्या. पूवार भागाला दंगली, गोळीबार हे काही नवीन नाही. कालच्या १९ फेब्रुवारीस तिथे निमित्त काय झाले ? कुणा ख्रिश्चन कोळ्याने म्हणे, दारूपिऊन एका गोषातल्या बाईची छेड काढली. ती तक्रार नोंदविण्यास एक मार्क्सवादी एम. एल. ए. सत्यनेसन गेले. तो सब-इन्स्पेक्टर शेतकीमंत्र्यांचा मेव्हणा आहे व त्याने तक्रारीची दखल घेतलीच नाही असा उघड आरोप सभागृहात नंतर सत्यनेसन यांनी केला. वास्तविक तो दारुडा कोळी केव्हाच किनाऱ्यावरच्या दलदलीच्या झाडाझुडपात दडून लपला होता. त्याला पोलीस कुठवर शोधणार...? २३ फेब्रुवारीस दुपारी इन्स्पेक्टरने समझोता करण्यास दोन्ही जमातींची सभा बोलावली. पण सभेला लोक सशस्त्र आले. तेथेच वातावरण तापले ... इतके तापले, इतके तापले की त्या उष्णतेने १६ घरे भस्मसात झाली.

दुसऱ्या दिवशी विधानसभेत त्रिवेंद्रमला मार्क्सिस्टवाद्यांनी तहकुबीची सूचना आणली. केरळच्या सध्याच्या कडबोळ्याच्या सरकारात हे लोक नाहीत ना ! कालचा प्रसंग गौरीबाईंनी सांगितला व चर्चेची मागणी केली. सभापती श्री. मोहिद्दिन कुटी हाजी यांनी ती नाकारताच सर्व विरोधी पक्षांनी ' वॉक-औट ' केला. तरीही सभागृहाचे कामकाज चालूच राहिले. ते पहाताच पाचच मिनिटांत ' वॉक-औट ' वाल्यांनी आपण होऊनच ' वॉक-इन् ' केला. आत येऊन टेबलांवर पेपरवेटांचा एवढा गोंधळ घातला, की खरोखरच सभा बंद पडली. अर्थात नंतर पूवार येथे खास रिझर्व्ड पोलिसांची चौकी बसली—तीवर ७६ जणांची ड्यूटी लागली. शिवाय पूवारच्या मोठ्या पोलीस स्टेशनचा बंदोबस्तही वाढला.

सात मार्चला दुपारी गस्त घालताना पोलिसांना, ख्रिचन वस्तीमधील दोन घरे

जळताना दिसताच त्यांनी 'वॉकीटॉकी 'वरून मुख्य पोलीस स्टेशनला वर्दी दिली. तिकडून पोलिसांचे पथक येईपर्यंत दोन्ही सैन्ये समोरासमोर उभीही राहिलेली होती. पोलिसांची पार्टी पहाताच लढाईस तोंड लागले. आता ख्रिचनांची संख्या खूप तर होतीच पण सव हालचाली कुणीतरी पद्धतशीरपणे कंट्रोल करीत होता. पहिल्या सलामीतच तीन पोलीस खाली पडताच, पोलीस मागे हटले. मग त्या लोकांनी पूर्व-नियोजितपणे, २३ च्या दंगलीत ज्यांनी पराक्रम दाखविले होते, त्या एकेकाचा अशा खरपूस समाचार घेतला, की एकेकाला पळता भूई थोडी झाली. पूवार भागातील मुस्लीम वर्ग हा श्रीमंत वर्गात मोडणारा–कारण व्यापारी, हॉटेल्स ह्या व्यवसायातील ते. जे आधीच पळून गेले ते बचावले आणि कुलुपे लावलेल्यांची घरे मात्र लुटली गेली. सात मार्चला तीस घरे व आठ दुकाने लुटली गेली, थोडीफार जाळपोळ झाली...बघता बघता गाव ओसाड झाले! ८ मार्चला विधानसभेत तोच प्रकार. येरे माझ्या मागल्या. सभापतींचा तहकुबीस नकार आणि विरोधी मार्क्सवाद्यांचा वॉक-आऊट्! गृहमंत्री म्हणाले, 'खास बंदोबस्त असूनही १५ दिवसांत दुसऱ्यादा हे घडते ही शरमेची गोष्ट आहे.'

जातीय दंगली–मग त्या कुणीही घडवून आणलेल्या असोत–ह्या राज्याला सदैव वाईटच. अशा दंगली करणाऱ्यांचा जोवर खंबीरपणे कायमचा बंदोबस्त होणार नाही. तोवर कधी ना कधी, नव्या नव्या स्वरूपात ही खरुज उठणारच! पण प्रत्येक वेळी पकडलेल्यांना सोडण्याठी सरकारवर नानाप्रकारे दडपण येतेच. ह्या पार्श्वभूमीवर मला, १५ फेब्रुवारीस लागलेला एक निकाल फार महत्त्वाचा वाटतो. मद्रास-बंगलोर मार्गावरील वेलोर हे जिल्ह्याचे ठिकाण. गावाच्या मध्यभागी किल्ला –चोहोबाजूंनी टेकड्या–तेथील सीएमसी हॉस्पिटलसाठी वेलोर प्रसिद्ध. तेथे गेल्या २४ जूनला अशीच दोन 'जमातीत' जातीय दंगल झाली. कारण काय? एका हिंदू मुलीस पळवून नेले होते म्हणे. अर्थातच दंगा–जाळपोळ–लुटालूट–पोलिसांचे आगमन–लाठी–अश्रूधूर–व शवटी गोळीबार हे सर्व सोपस्कर येथेही झाले. आता तरी गप्प बसावं की नाही...? पण तसं कुठलं व्हायला? दोन दिवसांनी जयवेलू आणि सेंतामरे कन्नन् ह्या दोघांचे खून पडले. अक्षरशः तुकडे केले! डिस्ट्रिक्ट सेशन कोर्ट वेलोरलाच. केसचा निकाल १५ फेब्रुवारी ७२ ला लागला. न्यायाधीश श्री. एस. ए. सुंदरेसन यांनी अशा समाजकंटकांवर–मग ते कुणीही असोत–दया दाखवू नये असे तर म्हटलेच, पण पाचही आरोपींना काय शिक्षा दिली ठाऊक आहे? फाशी! वास्तविक त्या पाचांपैकी कुणीही म्हातारा नाहीये. नबाव, अहमद बाशा, निझार, जमील आणि फाझलखान सारे जवान. त्यांच्या शिक्षेबद्दल वाईट वाटले तरीही कुणीही विचारी 'माणूस' मन घट्ट करून हेच मान्य करील... म्हातारी मेल्याचं दुःख नाही, पण काळ सोकावतो!

□ □ □

# चाकावरचे विचार

**श्री. मा. भावे**

## केवलम् जन्महेतवः

परवाच्या निवडणुकांत झालेल्या प्रचारसभांत विचारार्ह भाषणे क्वचितच झाली. याचे एक कारण असे असेल, की प्रचाराच्या भाषणांनी लोकांची मते बदलत नाहीत असा अनुभव आल्याने वक्ते तयारीने बोलत नसतील. तथापि श्री. चव्हाण यांनी चाकण येथील एका भाषणात एक चांगला मुद्दा मांडला. ते म्हणाले, की जनतेच्या पोषणाची सर्व जबाबदारी सरकारने अंगावर घेतली असल्याने लोकांनी आपल्या मुलांसाठी संपत्ती जमा करणे सोडून दिले पाहिजे.

काही 'प्रतिगामी' मंडळींना श्री. चव्हाण यांच्या या विचाराचा राग आलेला दिसतो. भारतीय कुटुंबसंस्थेच्या मुळावरच हा घाव आहे, असे त्यांना वाटते. पण श्री. चव्हाण यांचे वरील म्हणणे भारतीय संस्कृतीशी पूर्ण सुसंगत असेच आहे. कालिदासाने रघूच्या राज्याचे वर्णन करताना म्हटले आहे.

प्रजानाम् विनयादानात रक्षणात् भरणादपि ।
स पिता पितरस्तासाम् केवलम् जन्महेतवः ।।

म्हणजे प्रजेला नीतिनियम घालून देणे, तिचे रक्षण व पोषण करणे या सर्वांमुळे तो (राजा रघू) प्रजेचा पिताच होता. खरे आईवडील केवळ जन्म देण्यापुरते.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसची 'रामराज्या'ची घोषणा होती. सध्या वचनपूर्तीचे राजकारण चालू आहे. तेव्हा रामराज्य अवतरले असणारच. चव्हाण–धारिया–खाडिलकर इत्यादी रघु-अज-दशरथांच्या या युगात आपले पैसे सरकारच्या स्वाधीन करून जनतेने केवळ 'जन्महेतु' म्हणून रहावे हे योग्य! कुटुंबनियोजन कार्यक्रमाच्या जोरकस अंमलबजावणीनंतर लोकांवरील ही जबाबदारीदेखील कमी होत जाईल.

## निष्काम कर्म

आई-वडिलांनी मुलांसाठी पैसे साठविण्याची गरज नाही हे सांगताना आपण वस्तुस्थितीला सोडून बोलत आहो याची जाणीव श्री. चव्हाण यांना असणारच.

पहिले असे, की फारच थोड लोक मुलांसाठी पैसे अगर मालमत्ता ठेवू शकतात. अशांना वरील सल्ल्याची जरूरच नाही. दुसरे म्हणजे जे लोक मुलांची सोय होण्यासाठी पैसे साठवतात त्यांना हे माहीत असते, की सरकारने आपल्या मुलांच्या पोषणाचा भार तत्त्वत: जरी कदाचित् स्वीकारला तरी प्रत्यक्षात ती सोय मुलांपर्यंत पोचण्यास ४–५ वर्षे तरी लागणार. आपण उतरवलेल्या विम्याचे पैसे सरकारी विमा-महामंडळाकडून मिळण्यास जर २–३ वर्षे लागतात तर सहकारी दातृत्व अनाथ मुलांपर्यंत पोचण्यास किती वर्षे लागतील हे सहज अंदाजता येईल. तेव्हा श्री. चव्हाण हे दूरच्या भविष्याबाबत बोलत असावेत, असेच मानले पाहिजे.

मुलांच्या संगोपनाची सर्व तरतूद सरकार समर्थपणे करीत आहे अशी स्थिती झाली तरी श्री. चव्हाण यांचा हेतू साध्य होईल असे मात्र नाही. तो हेतू म्हणजे लोकांचे पैसे सरकारी कामासाठी अधिक मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हावेत हा. लोकांनी आपले पैसे स्वत:जवळ न ठेवता अगर खर्च न करता सरकारला वापरण्यास देणे याचा खरा अर्थ असा, की आपले बरेचसे काम लोकांनी विना-मोबदला करणे. श्री. चव्हाण यांचे म्हणणे असे, की जनतेच्या सर्व गरजा सरकारने भागविल्या, मुलांच्या शिक्षणाची व संवर्धनाची सोय सरकारने केली तर लोकांनीही काम वेतनाशिवाय किंवा अल्पवेतनावर करण्यास काय हरकत आहे ?

याचे उत्तर अगदी साधे आहे. आणि ते असे, की सर्व लोक एकाच प्रकारचे काम करतात असें नाही. त्यांची कामे निरनिराळ्या प्रकारची असतात, इतकेच नव्हे तर प्रत्येक कामाची समाजाला असणारी जरूरही कमी-अधिक तीव्र असते. ज्या कामाची गरज अधिक ते काम करणाऱ्या माणसाला आपण अधिक जरुरीचे काम करतो एवढ्यावरच समाधान वाटत नाही, तर आपल्या कामाची समाजाला वाटणारी निकड अन्य रूपाने व्यक्त व्हावी असे त्याला वाटते. ज्या समाजात उपभोग्य वस्तू मिळविण्यासाठी चढाओढ आहे त्या समाजात ही निकड त्या व्यक्तीला उपभोग्य वस्तूंचा अधिक प्रमाणात पुरवठा करण्यातून व्यक्त होते.

तेव्हा लोकांचे पैसे आपल्याला वापरावयाला मिळावेत असे सरकारला वाटत असेल तर सरकारने लोकांना हे पटवून दिले पाहिजे, की एखाद्या व्यक्तीने केलेले काम कितीही महत्त्वाचे असले तरी ते महत्त्वं त्या व्यक्तीला वापरण्यास मिळणाऱ्या वस्तूतूनच दिसून आले पाहिजे हा आग्रह चुकीचा आहे. हे पटवून देणे याचाच अर्थ असा, की उपभोग्य वस्तू मिळवण्यासाठी चाललेली चढाओढ थांबविणे

ही स्पर्धा थांबविण्याचे दोन उपाय सरकारच्या कक्षेत आहेत. पहिला म्हणजे उपभोग्य वस्तू निर्माणच होऊ न देणे. जी वस्तू अस्तित्वातच नाही किंवा जी मिळण्याची कधी शक्यताच नाही तिच्यासाठी स्पर्धा होऊ शकत नाही. पण हा उपाय अमलात आणण्याची वेळ आता गेली आहे. कारण आपल्याकडे उपभोग्य वस्तूंचे उत्पादन होत आहे आणि त्यांची चटक लोकांना लागली आहे. लोकशाही

राज्यव्यवस्थेत आता उलटे जाता येणार नाही. दुसरा उपाय असा, की उपभोग्य वस्तूंचे उत्पादन इतक्या मोठ्या प्रमाणात वाढवावयाचे की त्यांच्यासाठी चाललेल्या स्पर्धेत लोकांना रसच वाटू नये. पण हे कष्टसाध्य आहे. किंबहुना सरकारला लोकांचा पैसा हवा आहे तो उत्पादनवाढीसाठीच. तेव्हा सरकारी कक्षेतील हे दोन्ही उपाय सध्याच्या परिस्थितीत उपयोगाचे नाहीत.

सरकारच्या क्षेत्रात येणारे दोन्ही उपाय सरकार सध्या वापरू शकत नाही हे वर पाहिलेच. पण उपभोग्य वस्तूंची वाढती आसक्ती काबूत ठेवण्यासाठी काही केले पाहिजे याची जाणीव सरकारला आहे असेही दिसत नाही. याचे एक साधे उदाहरण म्हणजे राज्य व केंद्र सरकारातर्फे पुस्तकांना मिळणारी बक्षिसे. वास्तविक उत्कृष्ट पुस्तक लिहिल्याचा आनंद हाच लेखनाचा मोबदला असे साहित्यिक वारंवार सांगत असतात. त्यांना पैशाच्या रूपाने पारितोषिक देणे योग्य नव्हे, याचा अर्थ साहित्यिकांचा गौरव करू नये असा नाही. पण हा गौरव त्या साहित्यिकाच्या नावाने एखाद्या शाळेचे ग्रंथालय बांधूनही करता येईल.

शासकीय स्तरावरील कारवाईची निष्फलता लक्षात घेता उपभोग्यवस्तूंविषयींची आसक्ती कमी करण्यासाठी सामाजिक व राजकीय पातळीवरूनच प्रयत्न केले पाहिजेत. याचा अर्थ असा, की समाजधुरिणांनी व राजकीय नेत्यांनी मित उपभोगाचे, साध्या राहणीचे व कार्य करण्यातच त्या कार्याचे फळ सामावलेले आहे अशा विचारांचे एक वातावरण तयार केले पाहिजे. एक प्रकारच्या निष्काम कर्मयोगाचीच शिकवण नव्याने दिली गेली पाहिजे.

कारण काय असेल ते असो, पण निष्काम कर्मयोग टिळकांच्या प्रकृतीला शोभून दिसला, अनासक्ती योग गांधीजींच्या राजकारणाशी एकरूप झाला तसा मित उपभोगाचा विचार श्रीमती गांधी अगर चव्हाण यांच्या राजकीय प्रतिमेशी सुसंगत वाटत नाही. कदाचित यामुळेच श्रीमती गांधींनी निष्काम कर्मयोगाचा नव्याने प्रचार केला तरी तो परिणामशून्य ठरेल.

## नगरशत्रू वसंतराव नाईक

अखेर साखर-सरदारांचे सुभेदार, द्राक्षाधीशांचे सम्राट, पुसदपुराचे देशमुख श्री. वसंतराव नाईक महाराष्ट्र राज्याचे आणखी पाच वर्षे मुख्यमंत्री रहाणार! श्री. यशवंतराव चव्हाण यांना अर्पण केलेली आपली निष्ठा श्री. द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्या मध्यस्थीने याह्यासुरमर्दिनीला वाहून श्री. नाईक यांनी त्या आधिदेवतेची कृपा संपादन केलीच होती. श्री. रघुनाथराव खाडिलकरांसारखे दिल्लीकर वातकुक्कुट वारा श्री. नाईक यांना अनुकूल असाच वहात आहे, हे दाखवतच होते. मराठवाडी भालदारचोपदारांचे मन वळविण्याचाच काय तो प्रश्न होता. पण

नवसाचे फूल मराठवाड्याच्या दिशेने न पडता विदर्भाच्या दिशेने पडल्याचे पाहताच त्यांचाही विरोध मावळला आणि वसंतरावांच्या नावाची दवंडी पिटली गेली.

निवडणुकीचा प्रचार करताना श्रीमती गांधींनी अनेक वेळी हे स्पष्ट केले होते की, काँग्रेसने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी केंद्रसरकारशी शंभर टक्के सहकार्य करणारी राज्यसरकारे असणे आवश्यक आहे. या दृष्टीने श्री. नाईक यांचे पूर्ववृत्त (Record) पूर्णपणे निराशा करणारे आहे. श्री. छगला यांनी शिक्षणमंत्री असताना शिक्षण हा विषय राज्य व केंद्रसरकारच्या सामायिक यादीत घ्यावा असे धोरण ठरविले होते. त्याला नाईक सरकारनेच विरोध केला होता. श्री. सुब्रह्मण्यम यांच्या अन्नविषयक धोरणास नाईकांनी केलेला विरोध प्रसिद्धच आहे. त्याबाबत जाहीर वादही मुंबईच्या एका सभेत झाला होता. शेतीवरील आयकर आणि जमीन धारणा या दोन्ही बाबतीतील केंद्रसरकारच्या धोरणात या ना त्या मार्गाने अडथळे आणण्यात नाईकांचाच पुढाकार होता व आहे हे सर्वज्ञात आहे.

आपण शहरवासियांनी श्री. नाईक यांच्या मुख्यमंत्रित्वाला विरोध करणे अत्यंत आवश्यक आहे कारण शहरी जनतेच्या अडचणींची अक्षम्य उपेक्षा श्री. नाईक यांनी केली आहे. त्यांच्या कारकीर्दीची सुरुवातच पुण्यातील विजेचे दर वाढवून झाली. त्यानंतर यवत येथील आपल्या शेताला पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून पुणे शहरास मिळणारे पाणी त्यांनी कमी केले आणि शहरी जनतेला पाणी मिळण्यापेक्षा शेतीचे उत्पन्न वाढले पाहिजे अशी वर भलावण केली.

मुंबई शहराची जी लूट श्री. नाईक यांच्या कारकीर्दीत झाली त्याचे संशोधन होणे जरुरीचे आहे. श्री. बोमन बेहराम यांनी ' Decline of Bombay 'या नावाचे एक बारके पुस्तकच यासंबंधी लिहिले आहे. पण इंग्रजी पुस्तक म्हणून मराठी पत्रांनी आणि भारतीय माणसाने लिहिलेले म्हणून इंग्रजी वृत्तपत्रांनी या पुस्तकाची उपेक्षा केली. श्री. बेहराम हे भांडवलदारांचे हस्तक असे मानून मुंबईकर समाजवादी पुढाऱ्यांनीही या पुस्तकाची दखल घेतली नाही. या पुस्तकात श्री. बेहराम यांनी असे म्हटले आहे, की मुंबई-पुणे या औद्योगिक क्षेत्रातून महाराष्ट्र सरकारला ६५% उत्पन्न मिळते पण त्यावर खर्च मात्र १०% हूनही कमी केला जातो.


आकडेवारी जरी बाजूला ठेवली, तरी इतर अनेक गोष्टींतून श्री. नाईक यांच्या मनात असलेले नगरशत्रुत्व वेळोवेळी व्यक्त झाले आहे. श्री. नाईक यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याची प्रतिज्ञा केली होती. पण मुंबईचा धान्यपुरवठा केंद्र सरकारनेच केला पाहिजे असे स्पष्ट केले होते. याचा अर्थ श्री नाईक यांच्या लेखी मुंबई महाराष्ट्रात नाही असा होतो. मुंबईतील रिक्लेम्ड जमीन दर चौरस फुटास एक हजार रुपये दराने विकून महाराष्ट्र सरकार अमाप नफा कमावीत असते, पण मुंबई विद्यापीठास विकासासाठी जमीन मिळवून देण्या-

बाबत मात्र सरकार असमर्थ ठरले. भीमा योजना महाराष्ट्रशासन स्वतःच्या पैशाने पुरी करते पण भातसई योजनामात्र जागतिक बँकेच्या कर्जासाठी अडून रहाते.

ही यादी आणखीही लांबविता येईल. पण त्याची जरुरी नाही. खुद्द नाईक मंत्रिमंडळातील नगरविकासमंत्री श्री. पु. ग. खेर यांनीही हे मत आडवळणाने अनेकदा व्यक्त केले आहे.

शहरी आमदारांची संख्या अतिशय कमी आहे. त्यांच्या मतांचा प्रभाव पडेल अशी शक्यता फार कमी. तेव्हा या पुसदकर पुरारीचे निवारण करण्यासाठी सर्व नागरजनतेने त्या दिल्लीनिवासिनीची करुणा भाकली पाहिजे व महाराष्ट्र-सरकारच्या नेतृत्वात योग्य तो बदल घडवून आणला पाहिजे.

◻ ◻ ◻

# जेलसी, दाय नेम...!



चंद्रकांत अंबाडे

आर्टस् ॲण्ड हॅण्डिक्राफ्टस्चे प्रदर्शन... मराठीत कसं सांगू बरं...हस्तकला कौशल्याचे प्रदर्शन....रविवारची सायंकाळ. दाराशी लांबलचक क्यू...त्यात बायकाच अधिक ... जणू बाहेरही दुसरं प्रदर्शन

मांडलंय...बेल-बॉटमचं नि गुरूशर्टचिं, चित्रविचित्र लुंग्यांचे...क्यूत रेटारेटी चाललीय. सर्वांना आत जाण्याची घाई, पाहाण्याची उत्सुकता...सौ. माझा हात धरून सरळ प्रवेशद्वाराशी घेऊन गेली मला. तेथील स्वयंसेवकाला पर्स उघडून दाखवताच तो एकदम बाजूला झाला अन् तिला आत जाण्यास रस्ता करून दिला. सौ. जाईपर्यंत सारे तिच्याकडे पहात होतें. मी विनाकारणच कॉलर ताठ करून तिच्यामागे सटकलो. थोडं पुढे जाताच विचारलं मी.

" काय दाखवलंस गं दारावरती ?"

" स्पेशल-पास "–सौ. हसू दाबीत म्हणाली.

" तुला कसला आलाय पास इथं ? बघू मला. "

तिने पर्स उघडून माझ्यासमोर धरली. त्या डोअरकीपर प्रमाणेच मीही पाहू लागलो. एका वितभर कार्डावर मोठ्या जाड अक्षरात लिहिलेलं होतं. 'सौ नलिनी अंबाडे,१ले बक्षीस " माझी मुद्रा प्रश्नार्थक झाली. लोकांची गर्दी येतच होती. आम्हा दोघांसही धक्के देत गर्दी पुढे सरकत होती. थोडं बाजूला सरकत ती मला सांगू लागली, 'अरे, सकाळी इकडे येतानाच, घरून ही तीनही लेबलं करून आणली होती मी. इथे आल्यावर कळलं, की मला दुसरं बक्षीस आहे. मग ते लेबल तिकडे रांगोळीवर लावलं. उरलेलं लेबल पर्समधेच होतं. तें दाखवलं आता. "!

" म्हणजे, बक्षिसाची तुला खात्री होती तर !" माझ्या प्रश्नाने ती खुलली. मी पुढे विचारलं, " अन् दरवाजावरचे तुला कसं ओळखतात ?"

" अरे, प्रदर्शनातली मी पार्टिसिपंट अन् बक्षीस मिळालेली. मग काय रांगेत उभी राहू की काय ?"

" यडाच आहेस !" तिच्या आवाजाची नक्कल करीत मी तिचं वाक्य पूर्ण केलं– जणू प्लेबॅकच दिला तिला.

" कसं मनातलं बोललास." हसत हसत ती म्हणाली. मी डोळे मोठ्ठे करून पाहू लागलो. तोवर ती पाठ फिरवून चालायलाही लागली होती. माडीवरच्या हॉलमध्ये भरतकाम, विणकामाचे प्रदर्शन होते. टुणटुण उड्या मारीत ती जिना चढली. काहीही म्हणा, ती आज दहा वर्षांनी लहान झाली होती. हॉलमध्ये भिंतीच्या कडेकडेने रांगोळ्या काढलेल्या होत्या. रंगीबेरंगी कठड्यांवरून वाकून वाकून प्रेक्षक पाहात होते. एकेका रांगोळीसमोर रेंगाळत होते. पहिल्या बक्षिसाच्या रांगोळीसमोर मी रेंगाळताच तिने मला ओढीत सांगितलं–

" आधी माझी रांगोळी दाखवते तुला !"

मोठ्या उत्साहाने ती मला दाखवू लागली. सरोवराच्या काठी झाडीत एक दुमजली घर...पाण्याच्या काठी एक छोटीशी मुलगी पाण्यात होडी सोडतेय कागदाची...उगवता सूर्य...पाने झाडे, फुले, पक्षी इ. इ. मालमसाला. तेथे जमलेल्या प्रेक्षकांना बाजूला करून तिने मला पुढे ढकलले अन् सांगू लागली, " अरे, शेवटी

तर काळा रंगच संपला अन् शेडिंग व्हायचं राह्यलं होतं...वेळही संपत आली होती. मग मी काय केलं सांगू ?..." मी मनाशी विचार करीत होतो. मद्याची नशा चढते म्हणे, स्पीडची चढते म्हणे. तशीच विजयाची नशा चढते ती हीच काय ? त्याच आवेशाने ती मला शेजारच्या चित्रकला फोटोग्राफीच्या हॉलमध्ये घेउन गेली. पहिल्या बक्षिसाच्या चित्रासमोर गर्दी होती. दोघंही तेथे थबकलो. खरोखरच चित्रकाराने कमालच केली होती. माडीवरच्या बाल्कनीतून खालचा दिसणारा लांबच लांब रस्ता...मोटारसायकलवर एक जोडपे...तिचे केस भुरभुरणारे...पदर वाऱ्यावर उडणारा...तिचा एक हात त्याच्या खांद्यावर व दुसरा हात टाटा करणारा...बाल्कनीतील छोटी मुले त्यांना टाटा करताहेत...अन् त्यांच्याकडे पाठ करून आडोशाला एक युवती उभी आहे...हात बंद मुठी वळलेले...डोळ्यांतून जणू काही निखारे पडत होते. तिच्या.. खालच्या ओठांवर दात रोवलेला अन् कपाळावरील शीर...जितकी ही रागावलेली तितकीच ती मोटारसायकलवरची हसरी...आणि अशा त्या चित्राला नाव दिलेलं होतं, " जेलसी, दाय नेम इज् वूमन !"

हे वाक्य उगीचच पूर्ण केलं त्यांनी. नाही ? आणि ती 'दाय्' काय भानगड आहे ?" सौ. मला विचारीत होती. चित्राकडेच पाहात मी सांगू लागलो, " जुन्या इंग्लिशमध्ये 'यू' ऐवजी 'दौऊ' वापरीत. पण त्याला व्याकरणाचं फार मोठ्ठं जंजाळ असे. 'यू' मुळे फार सोपं झालं. आमच्या वेळेला तर 'यू' च शिकवलं जात होतं...तू तर अलीकडची मॅट्रिक..."

पण माझं रटाळ विवेचन ऐकायला ती तिथे असेल तर ना? बायकांच्या लोंढ्यात वहात वहात ती पुढे गेली होती पुष्कळ. मी तिथच पहिल्या बक्षिसाचं चित्र पाहात उभा होतो. कितीतरी वेळ ! भानावर येऊन सभोवार पाह्यलं, सौ. कुठेच दिसत नव्हती. नाहीतरी आज तिचे पाय जमिनीवर नव्हतेच. हवेत तरंगत होती जणू. मी गर्दीत घुटमळलो...लोकांचे धक्के खात...बाहेर जाण्यासाठी मी वळलो तो समोर 'ती' म्हणजे आत्ताची सौ. नीला...'कु' असतानाची माझी ऑफिसातील सहकारी अन् ऑफिसबाहेरही ! मी आजउद्या आजउद्या प्रपोज करीपर्यंत तिचे ठरले अन् ढुमढुम वाजलेदेखील ! पुढे तिने नौकरीच सोडली. माझंही लग्न झालं. अन् बरोब्बर दोन वर्षांनी आत्ता समोर ती उभी राह्यली होती. एकटीच नव्हे, तर एका गोंडस छकुल्यासह !

" मामाला नमस्ते कर संजू. "

" ओहो, नी तू ? किती फुगलीस ग ? नवऱ्याला उपाशीच पाठवून देत असशील वाटतं. " ती खळखळून हसली. मी टक लावून पहात होतो तिच्याकडे. खरंच, लग्न मानवलं होतं तिला. पूर्वी किती सडपातळ होती, पण डोळे मात्र पूर्वीचेच, काळेशार अन् मोठ्ठे मोठ्ठे ! मुलगी तर आईपेक्षा गोरी पण नकटी !

"मामाला म्हणावं. असं बघू नाई." तिने संजूला सांगून मला सावध केलं! आता हंसण्याची पाळी माझी. मी उगीचचं विचारलं–

"संजूचे पप्पा दिसत नाहीत ते"

"मुंबईला गेलेत ड्यूटीवर...प्रमोशन मिळालं नि काम वाढलं. अन् कायरे तुझ्या मिसेसला बक्षीस मिळालंय रांगोळीत, मी पाह्यली, छाऽनच आलीय बरंका. काँग्रॅच्युलेशन्स सांग माझ्यातर्फे"

"तू समक्षच सांग. ती आलीय ना. इथेच गर्दीत पुढे गेली."

"इथेच असते सध्या वैनी?"

"हो"

"मग आमच्याकड यायला काय झालं? टाळाटाळ समजते बरं का मला! माझ्या मिस्टरांनीही बोलावलंय समक्ष, मला सांगितलं. ह्या गुढीपाडव्याला या. जेवायलाच या दोघं. संजूचा वाढदिवस पहिला!" हेच बोलता बोलता तिने संजूला माझ्याकडे दिलं अन् बजावलं, "हेच आमंत्रण हं! निराळं सांगणार नाही. बरं, मी आलेच हं" अन् समोरच्या गर्दीत ती मिसळली देखील. मी बाजूला होऊन गर्दी न्याहाळू लागलो. सौ. ला नजरेने शोधू लागलो. कुठं गेली बरं? संजू चुळबूळ करू लागली. तिला फक्त एकच शब्द येत होता जगू. गर्दीकडे पाहात होती टकामका. मी उगीचच तिला हवेत उंच केले न् खाली आणले, तशी बेटी हसू लागली. नकळत एक पापा घेतला...मग दुसरा...अन् तिसरा घेणार तोंच...थांबलो! कारण, सौ. समोर येऊन उभी राहिली होती...मख्ख चेहरा...कपाळावर आठचा!

"ओळख, कुणाची पोरगी?" मी तिला विचारलं

"........"

"अग, आपल्या नीलाची?" मीच उत्तर दिलं व विचारलं तिला,

"आपण पाह्यलं तेव्हा चार दिवसांची होती. आठवतं?"

"........." सौ. एक नाही नी दोन नाही.

"कुठं गेली होतीस ग? मी किती शोधीत..."

तिनें अशा काही नजरेनं माझ्याकडं पाह्यलं की माझे शब्द तोंडातल्या तोंडातच विरले. काय बोलावं हे मला समजेना. उगीचच काहीतरी म्हणायचं म्हणून मी म्हणालो–

"संजू, मावशीकडे जातेस?"

"मी नाही मावशी बिवशी कुणाची" सौ. फिस्कारली!

"चिक्कार गर्दी आहे नाही?" मी संवाद चालू ठेवला.

"मी जाते घरी, तू ये सावकाश" ती जाऊ लागली.

"का ग?"...मी थांबविलं तिला.

"डोकं दुखतंय"

" चल कॉफी घेऊंया, डोकं थांबेल मग "

' मला नको कॉफीबिफी "

" पण मला हवीय ना ! "

" मग कुणी अडवलंय ? "

" पण ही पोरगी पिऊ देईल का मला ? "

" कशाला लोकांची कार्टी पोर्टी गोळा करावीत ? "

इतक्यात समोरच्या ' टॉयलेट 'मधून नीला बाहेर पडली व सरळ आम्हा दोघांकडे आली. नीला बडबडी नंबर एक ! सौ. चा हात पकडून पाठीवर थोपटीत ती म्हणाली–

" काँग्रॅच्यूलेशन्स वैनी, मी पाह्यली तुमची रांगोळी. फारच सुरेख आलीय हं. गेल्या वर्षीपण बक्षीस ह्या वर्षीपण. कमालच ! "

" तू का नाही भाग घेतलास ? ठेवायची काही कलाकृती ! "...मी.

" ही काय आमची कलाकृती ! पहिलं बक्षीस ! " माझ्याकडून संजूला घेत ती म्हणाली व आम्ही हसू लागलो. अर्थात् सौ. गप्पच !

" तू कॉफी घेणार का ? " मी नीलाला विचारलं.

" वैनीला हवी असेल. मग गाड्याबरोबर नळयाची यात्रा म्हणून मला "

" नाही गं, पण तिचं डोकं दुखतंय ना म्हणून ! "...मी

" खरंच ? माझ्या पर्समध्ये अॅनासिन आहे वाटतं " नीला पर्स शोधू लागली. समोरच्या नॅस्कॅफे स्टॉलवरून मी त्या दोघींकडे पाहात होतो. नीला बडबडत होती हंसत खिदळत होती एकटीच ! मी तीन कप घेऊन आलो. तशी सौ. म्हणाली

" मला नको "

" अहो, ही घ्या गोळी. बरं वाटेल. स्टेजवर जायचंच ना आता बक्षीस घ्यायला ? " नीला सांगू लागली. सौ. ने कप हातात घेतला. जरा ओठाला

---


जग बदलू पाहाणाऱ्या शक्तींशी जवळीक साधू पाहाणारे

नवे तरुण मासिक

**मा गो वा**

वार्षिक वर्गणी १० रु. । सुटा अंक १ रु.

१२५९।२ जं. म. रस्ता, पुणे ४


---

लावल्याप्रमाणे केलं व नीलाचं लक्ष नाही असं पाहून फेकून दिला. अगदी कॉफी-सहीत अन् अॅनासिन सहित. मी नीलीला वाटेला लावलं. तरी जाता जाता म्हणालीच ती–

" वैनी, यायचं बरंका दोघांनी जेवायला. गुढी पाढव्याला."


संजू टाटा करीत होती. तिला हात उंचावून प्रत्युत्तर देण्याचं मला धाडस झालं नाही. ती दिसेनाशी होताच मी वळलो. शेजारी सौ. नव्हती. गॅलरीच्या कठडयावरून खाली पाहात होती. अस्सा राग आला मला तिचा! जवळ जाऊन दरडावलं. तिने मान वर केली नाही. तोंड फिरवून डोळे पुसले. मी विचारले–

" काय ? झालंय तरी काय तुला ? मघापास्न थोबाड वाकडं ? आत्ता स्टेजवर अशीच जाणार का ? खेटरासारखं तोंड करून ?"

चरफडत मीच गप्प बसलो. दुसरीकडे पाहू लागलो. प्रदर्शन पाहून गर्दी स्टेज-कडे चालली होती. कितीतरी ओळखीचे चेहरे. तेवढयात कुणीतरी मला हात उंचावून ओळख दिली. मी घाबरलो. लक्ष नाही दाखवून सौ. ला म्हणालो

' घरी जायचं परत ?"

तिने मान हलविली व माझ्या आधी झरझर जिना उतरू लागली. तिच्या मागे जावं की न जावं ? घरी जाऊन जरा कान उघाडणी करायला हवी आहे जरूर ! क्षणभर मी थांबलो ! रडक्या तोंडापेक्षा घरी गेललंच बरं. मी पाऊल उचलून जिना उतरणार तोंच समोरच्या हॉलमधील चित्राकडे नकळतच माझं लक्ष गेलं मोटारसायकलवरचं ते जोडपं, आडोशाला ती एक तरुणी, तिचे ते डोळे अन् चित्राखाली मोठ्या अक्षरात नाव लिहिलेलं " जेलसी, दाय नेम ईज़ वूमन "



# सोन्याच्या लगडींचे युद्ध !

दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण छायेतही चर्चिलने कॅनडातून लढवलेले हे वेगळेच युद्ध....

जिप्सी मधुकांत

पॅरिसचा पाडाव झाल्यानंतर १७ दिवसांनी, २ जुलै १९४० ला संध्याकाळी ५ वाजता मॉंट्रिअल, क्विबेक, मधल्या बोनाव्हेंचर स्टेशनवर एका खास आगगाडीची प्रतीक्षा करण्यात येत होती. बँक ऑफ कॅनडाचा ॲक्टिंग सेक्रेटरी डेव्हिड मॅन्सर, फॉरिन एक्स्चेंज बोर्डाचा सिडने पर्किन्स प्रतीक्षेत चूर होते. 'मासळी–फिश' या संकेताने त्या गाडीतून येणाऱ्या 'माला' विषयी त्यांना कल्पना होती. पण फक्त मॅन्सरलाच अंधुकशी कल्पना होती, की त्यांना एका जगड्व्याळ धनसंरक्षणाच्या जंजाळात गुरफटायचे आहे !

## 'मासळी' भरपूर आणली आहे !

स्टेशनात गाडी थांबताक्षणीच सशस्त्र सैनिकांनी खाली उतरून सभोवारच्या भागात कडे केले. मॅन्सर आणि पर्किन्स यांना कडेकोट पहाऱ्यात एका डब्यात नेण्यात आले. तेथे बँक ऑफ इंग्लंडचा एक सर्वोच्च अधिकारी अलेक्झांडर क्रेग होता. सोबत क्रेगचे मदतनीस होते.

"आमच्या अशा अनपेक्षित 'टपकण्या'ने तुम्हाला तकलीफ होणार नाही, अशी आशा आहे." क्रेगने लाघवीपणे म्हटले., "पण आम्ही 'मासळी' चांगली भरपूर आणलेली आहे." तो बुटकासा, चष्मा लावलेला बँकेचा अधिकारी बोलता बोलता थोडासा थबकला आणि लगेच पुढे म्हणाला, "खरं पाहता, ही 'मासळी' म्हणजे ब्रिटनच्या जलसाठ्यातील एक प्रचंड भाग आहे. आम्ही भावी हल्ल्याला तोंड देण्यासाठी जरा सुरक्षित साफसफाई चालवली आहे; तुम्ही जाणताच हे सगळे. लवकरच उरलेला भागही आम्ही आणू."

सिडने पर्किन्सच्या गोंधळलेल्या मनात त्या शब्दांचे सांकेतिक अर्थ उमटू लागले. जलसाठा, उरलेला भाग इ. इ.चं सार एकच होतं. डॉलरमध्ये जे जे परिवर्तित होण्यासारखे असेल, असे इंग्लंडजवळ असलेले अक्षरश: सारे काही बँक ऑफ कॅनडाच्या अखत्यारीत सोपवण्यात येणार होते ! 'मासळी'चे भक्कम पार्सल ! ते किती भक्कम होते, हे त्याला लवकरच कळणार होते.

दोन आठवड्यांपूर्वी फ्रान्सच्या पतनाच्या कृष्णक्षणाने आणि हिटलरच्या स्वारीच्या दाट धोक्याने विन्स्टन चर्चिलने मंत्रिमंडळाची अत्यंत गुप्त बैठक बोलावली होती. अठराशे मिलियन पौंडांइतक्या रकमेचा ऐवज, सोनेनाणे इ. कॅनडाच्या स्वाधीन करण्याचा, सुरक्षित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

उत्तर अटलांटिकमध्ये शत्रूच्या पाणबुड्यांचा सुळसुळाट होता. त्यातून हा 'माल' लादलेली जहाजे न्यायचे मोठे खडतर दिव्य होते. पण एकदा का कॅनडात तो ऐवज सुरक्षित पोचला म्हणजे युद्ध खर्चाची तोंडमिळवणी तेथून करणं इंग्लंडला शक्य होणार होते. (देवघेवीचा करार होण्यापूर्वीची ही घटना. त्या पूर्वी अमेरिकेशी सारा नगद कारभार होता.) आणि या 'सोन्याच्या लगडीच्या युद्धा'वरच तोल सांभाळण्याची इंग्लंडला शक्यता होती. हा निर्णय म्हणजे फार महत्त्वाची घटना होती. केवळ 'किनाऱ्यावचे युद्ध' न लढता आणखीही अनेक धागे जोडण्याचे चर्चिलचे यात हेतू होते. जर जर्मनांचे हल्ले यशस्वी झाले असते, तर कॅनडाच्या भूमीवरून हे युद्ध लढवायचे असे चर्चिलने जाहीर केले होते. हा खजिना हलवण्यामागे अशाप्रकारे दोन पातळ्यांवरची आणि अखेरच्या खंदकातल्या सुरक्षिततेसाठीची बेगमी होती.

## नैतिक जोखीम

या प्रकरणातील पहिली मुख्य गोष्ट कडेकोट गुप्ततेची. नाझींना या कटाचा केवळ वास लागणे म्हणजे फार मोठी जोखीम होती वाहतुकीत. पण इंग्लंडच्या 'मोराल'चा नैतिक आधाराचाही मोठा नाजूक प्रश्न होता. इंग्लंडचा लढाऊ जोश अद्यापही उसळता आणि अफाट जोमदार होता. सरकारच जर अशा हल्ल्यापासून सुरक्षितता शोधू पाहते, हे लोकांना कळते तर नैतिक शक्तीला तडा गेला असता. म्हणून सोन्याच्या लगडींचे हे युद्ध संपूर्ण गुप्ततेत लढवायचे. या कानाचे त्या कानाला कळता उपयोगाचे नाही. कुठल्याही प्रकारचे अधिकृत हुकूम फुटता कामा नयेत, प्रत्यक्ष युद्धभूमीवरच्या गोळाबारीपेक्षाही ही जबाबदारी बिकट होती.

पण या बाबतीतला एक दूरदृष्टीचा उपाय मोक्याच्या वेळी कामी आला. परदेशी असलेली सर्व संपत्ती इंग्लंडच्या नागरिकांनी सरकारात नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले. खजिन्यातला हा अंश चर्चिल आणि त्याच्या कॅबिनेटने लष्करी उपयोगासाठी ताब्यात घ्यायचे ठरवले. यापूर्वी असे कधी घडले नव्हते. पण पॅरिसच्या पाडावाने चर्चिलच्या सरकारने हा व्यूह खेळायचे ठरवले.

" दहा दिवसाच्या आतच, इंग्लंडमधल्या झाडून सगळ्या बँकातून ऐवज गाळून हजारो पेटचांतून तो बंदिस्त करण्यात आला. आणि निरनिराळ्या विभागातल्या केंद्रांकडे गोळा करण्यात आला." असे वर्णन या मोहिमेत भाग घेतलेल्या एका अधिकाऱ्याने केले आहे.

इग्लंडच्या पिढ्यान् पिढ्यांनी केलेल्या जागतिक व्यापाराचा तो सारा नफा होता. आणि इंग्लंड्च्या राखीव साठ्यातल्या टनावारी सोन्याबरोबर तो सारा समुद्रपार रवाना होणार होता. त्या जून महिन्यात साडे तीन लक्ष टनांवरची दोस्तांची आणि तटस्थ राष्ट्रांची मिळून सत्तावन जहाजे एकट्या उत्तर अटलांटिक-मध्ये नाझीच्या बाँबफेकीने रसातळाला गेली !

## ' एमरल्ड ' निघाले !

शाही नौदलातली ' एमरल्ड ' ही कॅ. फ्रॅन्सिस सिरील्ड फ्लीनच्या ताब्यातली युद्धनौका या मोहिमेसाठी निवडण्यात आली. पहिला हप्ता या युद्धनौकेतून रवाना करायचे ठरले. ग्रीनॉक बंदरातून २४ जूनला प्रयाण होते. इग्लंडच्या चार बँकांचे रत्नपारखी विशेषज्ञ अलेक्झांडर क्रेगच्या नेतृत्वाखाली ग्लासगोला २३ जूनला संध्याकाळी उतरले. त्यांच्यापाशी केवळ हलकीशी सूटकेस तेवढी होती. ग्रीनॉक बंदरावर अत्यंत गुप्तपण सशस्त्र सैनिकांच्या कडेकोट पहाऱ्यात गाड्या भरभरून ऐवज आणण्याचे काम यापूर्वीच सुरू झाले होते ' एमरल्ड 'वर हा सारा जोखमीचा मामला चढवण्यात आला आणि रात्री बऱ्याच उशीरा नौकेने नांगर उचलला. धुक्यातून लगोलगच ' कोसॅक ही शस्त्रसज्ज विनाशिका पहाऱ्यासाठी एमरल्ड-बरोबर निघाली. ' एमरल्ड'वर एकूण २२२९ पेटचा चढवण्यात आल्या. प्रचंड वजनाच्या त्या भारांनी कप्पे वाकले होते. प्रत्येक पेटीत ४ सोन्याच्या विटा होत्या. एकेका विटेचे वजन २७ पौंड ६ औंसाचे.

त्याशिवाय इतरत्र असलेल्या ४८८ पेटचांतून १०० मिलियन पौंडाचे जड-जवाहीर होते.

त्या दिवशी रात्री नौका निघाल्या तेव्हा पुढे हवामान वाईट असण्याची सूचना मिळाली होती. दुसऱ्या दिवशी आयलंडच्या उत्तर टोकाला वळसा घालू जाताना हे भविष्य खरे ठरले. सागर खवळला होता. अटलांटिकमध्ये पोचल्या वर तुफान अधिकच जोराचे. शिवाय बर्फवृष्टी. या महाभूतांच्या तांडवात विनाशिका ' कोसॅक ' व ' एमरल्ड ' मधील अंतर कमी होऊ लागले. तेव्हा ' कोसॅक 'ने ' एमरल्ड 'ला सुचवले, की तिने नागमोडी चालीने यावे. ' एमरल्ड 'चा वेग २२ नॉटवर आणण्यात आला. त्या तीनच दिवसांत खलाशी पार मेटाकुटीला आले. चौथ्या दिवशी हवा सुधारली. १ जुलैला पहाटे पाच वाजता नोव्हा स्कोटियाचा किनारा अंधुक दिसू लागला. शांत समुद्रात आल्यावर हॅलिफॅक्सच्या दिशेने २८ नॉट वेग घेण्यात आला. दोन तासात सर्वांना हायसे वाटले बोट

सुरक्षित किनाऱ्याला लागली.

बंदरात खास आगगाडी उभीच होती. बँक ऑफ कॅनडा आणि कॅनेडियन नॅशनल एक्स्प्रेस बँकेचे सर्वोच्च अधिकारीही हजर होते. धक्क्यावर कमालीची सुरक्षितता राखली होती. 'एमरल्ड' वरून उतरवताना व गाडीत ठेवताना प्रत्येक पेटीची अत्यंत कसून तपासणी करण्यात आली.

## सिक्युरिटी डिपॉझिट

संध्याकाळी ७ वाजता ह्या सोन्याच्या गाडीने धक्का सोडला. याच गाडीतून डेव्हिड मॅन्सर आणि सिडने पर्किन्स मॉंट्रिअलला भेटले. तो सारा खजिना आता त्यांच्या पुढ्यात होता.

तो प्रचंड खजिना लपवायचा कुठे ? मोठेच प्रश्नचिन्ह होते.

पण डेव्हिड मॅन्सरला स्थळ सापडले ! द सन लाईफ इन्शुरन्स कंपनीची २४ मजली उत्तुंग ग्रानाईटची भक्कम इमारत होती. तिला तीन भूमिगत विवरे होती. त्यातल्या सर्वांत तळच्या भागात इंग्लंडचे त 'सिक्युरिटी डिपॉझिट' ठेवण्यात आले !

मॉन्ट्रिअलचे रस्ते रात्री शांत झाल्यावर आणि वाहतूक थंडावल्यावर कार्यभागास सुरुवात झाली. रात्री १ वाजल्यानंतर कडेकोट सुरक्षेत सोन्याच्या लगडींनी भरलेल्या मोटारी सशस्त्र दलांसह त्या तळघरात यायला सुरुवात झाली. त्या पेट्या तळघरात नेताना शिकारी कुत्र्यासारखे कॅनेडियन पोलीस सोबत जात येत होते. शेवटची पेटी तपासून तळघरात पोचल्यावर बँक ऑफ इंग्लंडच्या डिपॉझिट मॅनेजरने-क्रेगने-डेव्हिड मॅन्सरला बँक ऑफ कॅनडा तर्फे सही करायला पावती समोर केली.

या मौल्यवान साठ्याला एकदा पावसाच्या जबरदस्त माऱ्यामुळे धोका पोचत होता. मॉंट्रिअलला पावसाने झोडपले. जिकडे तिकडे पाणीज पाणी झाले. तळघरातही पाणी झिरपले. सुदैवाने तो सारा ऐवज जमिनीपासून दोन फूट वर रॅक्समध्ये होता आणि ऐनवेळी लक्षात आले तेव्हा तातडीने इमर्जन्सी पंप चालू करून पाणी उपसण्यात आले. नाहीतर कागदपत्रांचा लगदा झाला असता. दरोडेखोरांपासून अधिक सुरक्षितता यावी म्हणून पोलादी व्हॉल्ट्स तळघरात बनवायचे ठरवले. पण साठ फूट लांब आणि अकरा फूट उंच असा एकेक पोलादी व्हॉल्ट बनवायला त्या युद्धकाळात पोलाद कुठले मिळणार ? कुणाला तरी एक कल्पना सुचली. वापरात नसलेल्या दोन मैल रेल्वेच्या लोहमार्गाची आठवण झाली ! त्यापासून तीन फूट जाडीचे भिंतीला संरक्षण देण्यात आले. तसेच भिंतीत अनेक ठिकाणी धोक्याचा इशारा देणारी सूक्ष्म यंत्रे बसवण्यात आली. व्हॉल्टचे दरवाजे उघडण्यासाठी गुप्त संकेताच्या निरनिराळ्या युक्त्या होत्या. दोघा अधिकाऱ्यांना एक संकेत दिला होता आणि दुसऱ्या दोघांना वेगळा दिला होता. आणि व्हाल्ट उघडायच्या वेळेला ते दोन्ही संकेत जुळवावे लागत होते.

नंतरच्या तीन महिन्यात आणखी आगगाड्या भरभरुन शेअर्स, सर्टिफिकेट्स इ. मौल्यवान कागदपत्रे आले. आणखीं ९०० फडताळांची गरज भासू लागली. सनलाईफ बिल्डिंगमध्ये कॅनेडियन मौन्टीजचे २४ सशस्त्र सैनिक तेथेच रात्रंदिवस पहारा देऊ लागले. त्यांची खाण्यापिण्याची, राहण्याझोपण्याची सर्व तैनात त्याच इमारतीत करण्यात आली.

'एमरल्ड'नंतर ८ जुलैला आणखी ५ नौका भरून खजिना रवाना झाला. रीव्हेंज, बोनाव्हेंचर, मोनॉर्क ऑफ बेर्मुडा, सोबिन्को, बॅटरी या नौकांनी ही कामगिरी बजावली. चार विनाशिका त्यांच्या रक्षणाला होत्या. ॲडमिरल सर अर्न्स्ट आर्चर यांच्या नेतृत्वाखाली १९२ मिलियन पौंडाच्या सोन्याच्या लगडी, तसेच २९९ पेटचा भरून मौल्यवान कागदपत्रे या फेरीत रवाना होत होती. जर्मन पाणबुड्या त्यांची कुरापत काढीत. त्या काळात आणखी अठ्ठावीस नौका बॉबहल्ले करून बुडवण्यात आल्या! पण पहिल्या फेरीप्रमाणेच या वेळीही चर्चिलचे दैव बलवत्तर होते. २०० मैल त्यांच्या संरक्षणाची सोबत दिल्यानंतर नौकांना मोकळे करण्यात आले. पण हा सारा ताफा तसाच पूर्ण विश्वासाने पुढे निघाला. त्यांच्यातले अंतर अखेरपर्यंत वादळाच्या हेलकाव्यातही कायम होते. रात्री ही जहाजे दिवे वगैरे न लावता पूर्ण अंधारात अधिक जवळ येत. पण कधीही टक्कर झाली नाही. पाऊण टप्पा गाठून झाला तेव्हा 'बॅटरी'च्या एका एंजिनात काही दोष अचानक उद्भवला. इतर नौकांनी रेंगाळण्याचा धोका न पत्करता त्या तशाच वेगाने हॅलिफॅक्सच्या दिशेने निघाल्या. 'बोनाव्हेंचर'ला 'बॅटरी'च्या दिमतीस दिले आणि सेंट जॉन या नजीकच्या बंदराकडे त्यांना रवाना केले.

पण या दोन बोटींपुढे मोठे संकट वाढून ठेवले होते. प्रचंड धुके आणि समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगते हिमखंड यांच्याशी सामना द्यावा लागला. सुमारे बारा तास या दोन्ही बोटींची चाल निसर्गाने रोखून धरली. त्या दोहोंवर मिळून ६० मिलियन पौंडाच्या सोन्याच्या लगडी होत्या. कसेबसे सेंट जॉनला पोचून आवश्यक त्या दुरुस्तीनंतर त्यांनी झपाट्याने हॅलिफॅक्सकडे कूच केले.

'रिव्हेंज'वरच्या पंधरा इंची आठ तोफा आणि सहा इंची बारा तोफा सतत सज्ज होत्या. त्यांचे गोलंदाज अष्टौप्रहर तेथेच ठाण मांडून होते.

१३ जुलैला पहिल्या तीन नौका हॅलिफॅक्सला सुखरूप पोचल्या. बोनाव्हेंचर आणि बॅटरी सुद्धा थोड्या अवधीने येऊन ठेपल्या. ॲडमिरल आर्चरचा जीव भांड्यात पडला.

## स्कॉच व्हिस्कीखाली सोन्याच्या पेटचा

विनधोक झालेला प्रवास आणि सारे काहीं सुखरूप पार पडलेले यामुळे नकळत थोडीशी ढिलाई एकूण कामगिरीत नंतर निर्माण झाली. रीव्हेंजवरच्या पेटचा उतरवणे चालू होते. एका फुटक्या पेटीतली एक सोन्याची वीट खालच्या डेकवरील

खलाशाच्या डोक्यावर आदळली ! दुसरा खलाशी अतिशय अचंब्याने पाहू लागला अबब, केवढी मोठी सोन्याची वीट ! हे खरेच सोने आहे का ? पण पहिल्या खलाश्याने त्याला दाटले, सोन्याची त्याला फिकीर नव्हती. त्याचे डोके रक्तबंबाळ झाले होते ! एकदा काही नाणी ओघळली होती. नौकेवरच्या दुय्यम अधिकाऱ्यांनी ती गोळा केली. तेव्हा पेटीचे वजन मूळच्याइतके तंतोतंत भरले. बँक ऑफ कॅनडाच्या सिडने पर्किन्सला तर इतके सारे सोने मालधक्क्यावर आहे हे जाणून धडकीच भरायची. हॅलिफॅक्ससारख्या अवाढव्य बंदरात कितीही बंदोबस्त केला तरी ही बातमी फुटायची धास्ती होती. ' रीव्हेंज 'वरील शेवटची पेटी उतरवण्यात आली तेव्हा सर्वांना हायसे वाटले. पण एकूण पेटचांचा हिशेब केला त्यावेळी तीन पेटचांची गल्लत आढळून आली. पुन्हा मग सारे हवालदिल झाले. प्रत्येक पेटी कोठे ठेवली होती, हे तपासण्यात आले. पण निघायच्या घाईत माल भरताना याची नोंद केली नव्हती की अमूक पेटी विवक्षित ठिकाणीच ठेवली आहे म्हणून. कुठल्याही क्षणी टॉर्पेडोचा धोका होता निघायच्या वेळी. अधिकाऱ्यांच्या चर्चेचा धागा मेसमधल्या वाढप्याने टिपला. तो म्हणाला, ' आम्ही क्लाईड बंदर सोडले तेव्हापासून ' हे काहीतरी ' आमच्या कोठारात नवीनच आलेले पहातोय. कदाचित तुम्हाला हव्या असलेल्या पेटचा त्या असतील. ' इंग्लंडच्या ' लिक्विड अँसेट 'च्या त्या तीन पेटचा स्कॉच व्हिस्कीच्या पेटाऱ्यांच्याखाली दबून होत्या !

या काफिल्यातील ऐवज वाहून नेण्यासाठी ५ स्पेशल आगगाडचांची व्यवस्था करण्यात आली. तोच कडेकोट पहारा. या सर्व अफाट मालमत्तेचा विमा मात्र उतरवलेला नव्हता ! युद्धाच्या धामधुमीत जगड्व्याळ संपत्तीचा विमा काढणारी कंपनीही कशी धजेल ? कॅनेडियन रेल्वेने एक मिलियन डॉलरपेक्षा अधिक भाडे लावले मात्र वाहतुकीचे !

ओटाव्यातील वेलिंग्टन स्ट्रीटवरील बँकेत हा दुसरा हप्ता उतरवण्यात आला. पाच मजल्यांची ही इमारत जर्मनांच्या शत्रूचे सर्वांत प्रबळ महत्त्वाचे ठाणे असेल, ह्याची कुणालाही कल्पना येणार नव्हती ! तीन रात्री माल उतरवण्या-भरण्याचे-सोन्याचा पूर गोठवण्याचे काम चालू होते. व्हॉल्ट अपुरे पडले तेव्हा सोन्याच्या विटांची भिंतच उभी करण्यात आली ! याशिवाय ५० हजार पोती भरून नाणीही होती. त्यात प्रसिद्ध फ्रेंचांची ' नेपोलिअन्स ' होती, १४ ते १६ व्या लुईंच्या शिक्क्यांची नाणी. तसेच पाचवा जॉर्ज, एलिझाबेथ, व्हिक्टोरिया, यांच्या काळातली आणि युरोपातल्या प्रसिद्ध राजघराण्यांची सोन्याची नाणीही अगणित होती.

मॉन्ट्रिअल येथे एक ' डिपॉझिट ऑफिस ' सन लाईफ बिल्डिंगमध्ये मॅन्सरने उघडले होते. बँक, शेअर बाजार, कंपनी सेक्रेटरी इ. अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रातील नाणावलेल्या मुरब्बी १२० तज्ज्ञांची भरती केली. त्यांना पूर्ण गुप्ततेच्या शपथा देऊन त्या मौल्यवान कागदपत्रांचा हिशेब-ठिशेब लावण्याचे काम सुरू केले. त्या

शेअर्स, रोखे, दस्तऐवज, देणे घेणे इ. कागदपत्रांची नोंद करणे खूप किचकट होत.

ह्या ऑफिसची सुरक्षा व्यवस्था अतिशय नमुनेदार होती. तीनही तळघरांत एकच लिफ्ट होती. प्रत्येक कर्मचाऱ्याला एक पास दिलेला होता. दर महिन्याला तो पास बदलला जाई. प्रवेशद्वारावर, तसेच तळघरात जाताना त्यावर रक्षकांसमोर सही करावी लागे. रक्षकाच्या टेबलापाशीच गुप्त घंटा होती. तिचा संबंध मॉंट्रि-अलच्या पोलीस हेडक्वार्टरशी आणि विद्युत सुरक्षा यंत्रणेशी होता. एकदा चुकून त्या बटनावर रक्षकाचा हात गेला, तेव्हा रायफलीच्या चापावर बोटे ठेवलेल्या सशस्त्र पोलिसांनी तीन मिनिटांच्या आत इमारतीला वेढा घातला.

अलेक्झांडर क्रेगने 'डॉलर मिळवून देण्याजोग्या' प्रत्येक शेअर्सची शहानिशा चालवली होती. हजारो कूपन्स, याद्या तयार करण्यात आल्या. एक मोठा ताफा केवळ कूपन्स कापण्यातच गुंतला होता. हजारो लोकांनी आपल्या शेअर्सची अनेक वर्षात दखल घेतलेली नव्हती. पण हे सगळे तपासण्याची, नूतनीकरण करण्याची घाई होती. चर्चिलने आपल्या आठवणींच्या खंडात या सोन्याच्या लगडींच्या युद्धाच्या संदर्भात त्रोटक पण अर्थपूर्ण असा उल्लेख केला आहे – 'Upto November 1940, we had already sold 335 million dollars worth of American shares, requisitioned for sterling from private owners in Britan.'

## सर्व हिशेब पूर्ण झाले

ह्या शेअर्सच्या विक्रीच्या रूपाने अतिरिक्त डॉलरचा साठा युद्धखर्चासाठी इंग्लंडला करता आला. शेअरधारकांना-इंग्लंडच्या नागरिकांना मात्र ती रक्कम पौंडातच स्वीकारायची होती. सप्टेंबरच्या अखेरीपर्यंत क्रेगच्या डिपॉझिट ऑफिसने सर्व कागदपत्रांची तपासणी पुरी केली. एकही कागद तपासायचा किंवा हिशेब करायचा राहिला नव्हता, इतका पूर्ण विश्वास क्रेगने व्यक्त केला. हा सर्व उरक विलक्षणच होता. जवळपास २ हजार पेट्या भरून ह्या कागदांचा पसारा होता. प्रत्येक कागदाचे फाईलिंग, नंबरिंग, कूपन्स असा अफाट व्याप होता. आणि संपूर्ण गुप्तता पाळून हे काम चालवले होते. या प्रकरणात गुंतलेल्या अधिकृत व्यक्तींचा अंदाज, १२५० दशलक्ष पौंडाचा तो शेअर्स इ. चा. व्यवहार असावा असा आहे.

सोन्याच्या विटांचीही आवक चालूच होती.

जून, जुलै आणि ऑगस्टमध्ये ६३७ द. लक्ष पौंड किंमतीचे सोने आणण्यात आले.

या सर्व कारवाईत एक विलक्षण घटना म्हणजे, नाझींनी उत्तर अटलांटिकमध्ये या काळात एकूण १३४ जहाजांवर बॉंबफेक करून जलसमाधी दिली पण एकाही 'सोन्याच्या' जहाजाला तसूभरही धक्का पोचला नाही, हे केवढे नवल !

पृष्ठ ५१ वर



# ड्रग्ज! ड्रग्ज! ड्रग्ज!

ड्रग्ज् म्हणजे औषधे एवढा अर्थ सामान्यपणे आपल्याला माहिती असतो. दुसऱ्या एका अर्थानेही हा शब्द वापरला जातो. त्या ' ड्रग्ज् 'चे व ती घेणाऱ्यांचे एक वेगळे विश्व आहे. त्या विश्वात जाण्यासाठी ' ड्रग्ज् 'च्या माध्यमाचा आधार घ्यावा लागतो आणि मग ती घेणारी व्यक्ती मुक्तपणे त्या दुनियेत संचार करीत असते, अगदी साऱ्यांना विसरून. ही ड्रग्ज् म्हणजे अमली पदार्थ.

मुंबईतील सुमारे ५० टक्के युवक-युवतींना या ड्रग्ज्ची चव काय असते ते माहिती आहे. म्हणजेच त्यांनी त्याची चव घेतलेली आहे. त्यापैकी दोन टक्के तरुण तरुणी तर अगदी व्यसनाधीन होऊन त्या ' ड्रग्ज् 'च्या आहारी गेली आहेत. आज हे फॅड पैसेवाल्यांचे आहे. पण ते पसरायला कितीसा वेळ लागणार ! नव्हे ते पसरू लागलेच आहे. कुलाबा, पेडर रोड, मलबार हिल वांद्रे आदी श्रीमंत वस्त्यांतील अनेक मुले-मुली सध्या त्यांचा 'आस्वाद' घेत आहेत. पण हे लोण दादर गिरगावच्या मध्यमवर्गीयांत शिरायला फारसा कालावधी लागणार नाही. कारण उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करून कॉलेजात दाखल होताच फॅशन म्हणून धूम्रपान करणे ही आता वस्तुस्थिती झाली आहे. धूम्रपान न करणारा अडाणी ठरवला जातो. पारशी व पैसेवाल्या समाजातील मुलीही धूम्रपान करतात म्हणून आपल्यालाही ते करायला काय हरकत आहे असा विचार अनेक मध्यमवर्गीय समाजातील मुलींच्या मनात

'व्हिएतनामपेक्षाही अमेरिकेचा एक नंबरचा शत्रू आहे, ड्रग्ज.'

प्रेसिडेंट निक्सन यांच्या या विधानातील अतिशयोक्ती सोडली तरी 'ड्रग्ज' हा अमेरिकेतील विचारवंतांना चक्रावून टाकणारा एक प्रश्न झाला आहे.

आणि आता तर ही पश्चिमी लाट झपाट्याने आपल्याकडे सरकू लागली आहे....

## विजय वैद्य

येऊन मुंबईतील काही कॉलेजांतील मध्यमवर्गीय मुली चोरून-मारून केव्हातरी धूम्रपान करताना दिसतात. मदिरापानाचे व्यसनही तरुणांत फॅशन म्हणून वाढते आहे.

मुंबईच्या फोर्ट विभागात अशी दोन आलिशान उपहारगृहे आहेत, की जी या 'ड्रग्ज्' घेणाऱ्यांचा स्वर्ग आहेत स्वर्ग. हा लेख लिहायचा होता म्हणून मी त्या उपहारगृहांना भेटी देऊन आलो. काय दृश्ये दिसतात तेथे. दिव्यांचा मंद प्रकाश. म्हणजे जवळजवळ काळोखच. काहीतरी वेगळेपणा हवा म्हणून विचित्र प्रकारचे फर्निचर व आतील सजावट, पॉप म्यूझिकचा कर्कश आवाज आणि या वातावरणात अमली पदार्थांचे सेवन करणारे, बेल बॉट्स् किंवा ड्रेन पाईप पॅन्ट्स् वा तसाच काहीतरी अत्याधुनिक फॅशनचा पेहराव केलेले. डोळ्यांवर उन्हाचे चष्मे लावलेले तरुण व तरुणी दिसतात. एकमेकांच्या गळ्यात गळा घालून धुंदपणे कुठेतरी पडलेल्या वा नाचणाऱ्या त्यांच्या जोड्या किंवा आकृत्या म्हणू या, हे तेथील रोजचेच दृश्य. कॉलेजसाठी म्हणून घरून निघायचे आणि हजेरी मात्र या आलिशान उपहारगृहात लावायची असा सारा कारभार. त्यांच्यापैकी अनेकांच्या पालकांची झोप उडाली आहे. यातून अनेक गुंतागुंती निर्माण होऊ लागल्या आहेत. ज्यांनी गेल्या जुलै, ऑगस्टच्या सुमारास 'मेट्रो' या चित्रपटगृहात लागलेला 'पीपल

नेक्स्ट डोअर' हा याच विषयावरील समस्याप्रधान चित्रपट पाहिला असे किंवा परदेशी मासिके वा पुस्तके यातून येणारा याविषयीचा मजकूर वाचला असेल त्यांना या गंभीर होत असलेल्या समस्येचे स्वरूप कळून येईल. भारतात हा प्रश्न मुंबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता आदी बड्या शहरांपुरताच व तोही श्रीमंत समाजापुरताच सध्या मर्यादित आहे. पण वेळीच दखल न घेतली गेल्यास येथेही पाश्चिमात्य राष्ट्रांप्रमाणे ही समस्या उग्र स्वरूप धारण करील यात शंकाच नाही.

या विषयावर काही लिहावे असे मनात होते. काही दिवसांपूर्वी डॉ. जे. सी. मारफतिया या प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञांचे एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठात याच विषयावर व्याख्यान झाले होते. वाढत्या ज्ञानलालसेला बौद्धिक खाद्य पुरविण्याच्या उद्देशाने या विद्यापीठाच्या रजिस्टार सौ. कमलिनी भंसाळी व इतर यांनी पुढाकार घेऊन 'प्रोग्रॅम ऑफ कंटिन्युइंग एज्युकेशन' हा कार्यक्रम हाती घेऊन त्यात काही महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने, परिसंवाद, छोटा कोर्स आदींची योजना केली. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून डॉ. मारफतिया 'ड्रग्ज् ॲडिक्शन' या विषयावर बोलले. डॉ. मारफतिया यांच्या मुलाखतीवर आधारित हा लेख तयार केला आहे.

या मुलाखतीत मिळालेली माहिती उद्‌बोधक वाटावी अशीच आहे. डॉक्टर साहेबांनी मुळात सुरुवात केली ती ड्रग्ज (नुसतेच अमली पदार्थ नव्हेत तर आपल्या नेहमीच्या वापरात येणाऱ्या ॲस्पिरिन, नोव्हालजिन आदींच्याही) सेवनाने होणाऱ्या समाजावरील परिणामापासूनच. यांच्या अतिरिक्त सेवनामुळेसुद्धा ती घेणं ही व्यसन होऊन बसते व त्याचे भयानक परिणाम होतात.

ड्रग्जचे सहा गट आहेत. त्यांपैकी पहिल्या गटात ॲस्पिरिन, नोव्हालजिन, वॅगनिन, अफू, मारफिया, पेथेडिन व हेरॉइन ही औषधे दुःख दबाव (पेन किलर्स) या नावाने ओळली जातात. ॲस्पिरिनसारख्या औषधांचे सेवन हे व्यसनात कसे बदलते याचा पत्ताही लागत नाही. ॲस्पिरिन सेवनाचे परिणाम मूत्रपिंडावर होत असल्याचे अलीकडेच काही मेडिकल जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहे. पेथेडिन हे मारफियापासून बनवले जाते आणि हृदयविकाराचा झटका आल्यानंतर होणाऱ्या असह्य वेदना थांबविण्यासाठी दिले जाते. पण यातूनच अनेक हृदरोग्यांना पेथेडिन घेण्याचे व्यसन लागते.

## मनःशांती देतात

झोपेची (झोप आणणारी) औषधे दुसऱ्या गटात मोडतात. यातही दोन उपगट पडतात. त्यातील 'इलिझिरब्रोमो–वॅलरियम'सारखी, रात्री झोप येण्यासाठी देण्यात येणारी औषधे अलीकडे क्वचितच दिली जातात, तर 'सोनेरिल', 'सोडियम सेकोनल' सारखी औषधे वापरात आहेत. परदेशात या औषधांना 'डॉल्स' असे म्हणतात.

मनावरील ताण कमी करण्यासाठिही काही औषधे असतात आणि ती घेणारेही

भरपूर आहेत. काही काळ- तरी ही औषधे मनःशांती देतात, ताण दूर करतात. पण ही घेण्याची एकदा का सवय लागली, की दुर्दैवाने त्याचेही रूपांतर व्यसनात होते. इक्वानिल व लिब्रियम या नावाने ती ओळखली जातात. खरं म्हणजे ही औषधे वैद्यकीय देखरेखीखालीच घ्यायची असतात पण काही मानसोपचार तज्ज्ञ यासंबंधी योग्य त्या सूचना न देताच ती घेण्यासाठी नेमून देतात त्यामुळे अनेकांच्या बाबतीत ती व्यसने म्हणून होण्यास बऱ्याच प्रमाणात मानसोपचार तज्ज्ञच जबाब- असतात.

चौथा गट फारच महत्वाचा आहे कारण याच गटात अमली पदार्थ मोडतात आणि त्यासंबंधीच येथे विस्ताराने लिहायचे आहे. यातील दोन उपगटांपैकी एका गटातील 'औषधे'– ड्रग्ज – (अमली पदार्थ) परदेशात विपुल प्रमाणात वापरली जातात तर दुसऱ्या गटातील आपल्या देशात. परदेशात ती 'सायकोटोमिमॅटिक' किंवा 'हायल्युमिनोजिन्स' या नावाने प्रख्यात आहेत. 'हायल्युमिनोजिन्स', 'हायल्युसिनेशन' निर्माण करतात. पण 'हायल्युसिनेशन म्हणजे तरी काय? आभास. ही अमली पदार्थयुक्त 'औषधे' घेणारा माणूस आभासमय जगात वावरत असतो. उदा. समजा असा एखादा माणूस आपल्या जवळपास असला तर आपल्याला जे दिसत नाही ते तो पाहू शकतो. त्याला भुते दिसतात. हवेत तरंगल्यासारखे वाटते. तुम्हा आम्हाला ऐकू न येणारे आवाज तो ऐकतो. त्याला वाघसिंहादि श्वापदे जवळपास असल्याचे दिसते वगैरे वगैरे.

पुढील गट मनोरंजक पण तितकाच भयानक आहे. या गटातील औषधे ही मेंदूला उत्तेजित करणारी असतात. अत्यंत औदासिन्य आले असताच ती दिली जातात. सर्वांत अधिक प्रमाणात घेतले जाणारे औषध डेक्सेड्रिन हे आहे. आपला बांधा सडपातळ रहावा यासाठी जपणाऱ्या स्त्रिया हे औषध मोठ्या प्रमाणात घेतात. याने भूक मारली जाते. शेवटच्या क्षणी अभ्यास पूर्ण करण्याची किमया करू पहाणारे विद्यार्थी झोप न येण्यासाठी, त्याचप्रमाणे कमी रक्तदाब असणारे या औषधाने दाब वाढतो म्हणून व सभाधीटपणा येण्यासाठीही हे औषध घतले जाते. याचेही वाईट परिणाम होत असतात. शेवटच्या गटातील औषधे ही एकमेकां-विरुद्ध घेतली जातात व व्यसनं बनतात. उदा. यातील उत्तेजित करणारे औषध घेतल्यामुळे झोप नाहिशी झालेली व्यक्ती झोप येण्याठी असेच दुसरे औषध घेते आणि त्यामुळे दोन्ही औषधांच्या व्यसनाधीन होते.

माणूस त्यांचा व्यसनाधीन कसा बनतो? ती घेण्याची दाट इच्छा वा आवश्य-कता निर्माण झालेली असते. ती घेण्याची सवय जशी होते तसा त्याचा परिणाम कमी वाटू लागतो आणि मग त्यांचा अमल रहाण्यासाठी व आवश्यक तो परिणाम साधण्यासाठी त्यांचे प्रमाण वाढवावे लागते. कालांतराने माणूस मानसिक व शारीरिकदृष्ट्या त्यावर अवलंबून राहू लागतो. ती मिळाली नाहीत तर बेचैन

होतो. आणि शेवटी ही औषधे व्यक्ती आणि समाज यांच्यावर ताबा गाजवू लागतात. यामुळेच व्यसनासक्ती वाढत जाते.

आपल्या देशात भांग, चरस, गांजा या आमली पदार्थांचे सर्रास सेवन केले जाते. समाजात काही थरात त्याचे सेवन करणे म्हणजे काही वाईट असे आहे मानले जात नसले तरी मध्यमवर्ग मात्र हे वाईटच मानतो.

एल. एस. डी.सारखे अमली पदार्थ आपल्या देशात सेवन केले जात नाहीत. गांजाला परदेशात (विशेषत: हिप्पी जगतात) मरिज्युआना (किंवा 'पॉट')म्हटले जाते. त्याचे सेवन वा धुम्रपान केले जाते. थोड्याफार प्रमाणात मज्जासंस्थेत बिघाड झालेल्या किंवा मानसिक विकृती असलेल्या व्यक्ती जास्त प्रमाणात त्यांच्या व्यसनाधीन होतात.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे म्हणणे आहे, की ड्रग्जचा प्रश्न हा व्हिएतनामपेक्षा गंभीर असून, तो देशाचा प्रथम क्रमांकांचा शत्रू आहे. अमेरिकेतील कोलोराडो सारख्या शहरात झालेल्या पाहणीअभ्यासात असे आढळले, की प्रत्येक तीनापैकी एक महाविद्यालयीन विद्यार्थी बेकायदेशीररीत्या या अमली पदार्थांचे सेवन करतो. एकट्या सॅनफ्रान्सिस्को शहरात 'मेथेड्रिन' नावाचे औषध नियमितपणे शरीरात टोचून घेणारे ४ हजार लोक आहेत.

हे असे का केले जाते ? प्रौढांच्या भोंदूपणाचा वीट येत चालल्याने त्याचा निषेध करण्याचा एक नवा मार्ग म्हणून. परीक्षेच्या तयारीसाठी झोपेपासून दूर रहाण्यासाठीही हा उपाय केला जातो. हा उपाय किती जालीम आहे याची चांगलीच कल्पना पुढील माहितीवरून येईल.

मेथेड्रिन या अमली पदार्थाचा ठराविक डोस घेतल्यास सतत १२ दिवस माणूस जागा राहू शकतो. याचा माणसाच्या मनावर व शरीरावर काय परिणाम होत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

नशा यावी म्हणून, स्वत:चे काही व्यक्तिगत प्रश्न काही काळ विसरून जाण्यासाठी आणि एखाद्या ठराविक मित्रमंडळीत रहायचे असेल तर त्यांच्याप्रमाणे वागण्याशिवाय गत्यंतरच नसते, नाहीतर तेथून हकालपट्टी व्हायची. यामुळे त्यांचे सेवन केले जाते.

अमली पदार्थांचे व्यसन जडवून घेणाऱ्यात साधारणपणे पालकांवर अवलंबून असणारी सधन समाजातील मुले प्रामुख्याने असतात. प्रमाणच पहायचे झाले तर दहापैकी आठ मुले या समाजातील असतात. याची मुख्य कारणे म्हणजे त्या मुलांना पालकांनी फाजिल प्रमाणात दिलेले स्वातंत्र्य आणि पालक-पाल्य यांच्यातील अयोग्य संबंध. सधनतेमुळे नोकरी करणे वा इतर प्रश्नांना सामोरे जाऊन त्यांच्याशी योग्य सामना देणे यापासून ते दूर असतात. मग हा सर्व फावला वेळ कसा कारणी लावायचा, त्याचे उत्तर अमली पदार्थसेवनामागे लागणे हेच असते.

काहीजण या व्यसनापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात. पण हे प्रमाण अत्यल्प असते. ते सोडण्याची काही कारणे अशी असतात. एल. एस. डी. च्या एखाद्या 'ट्रिप'चा वाईट अनुभव. (एल. एस. डी. घेतल्यावर धुंदीचा जो परिणाम होतो त्याला 'ट्रिप' असे म्हणतात. हा शब्द हिप्पी जगतातील आहे.) मानसिक व शारीरिकदृष्ट्या आपल्यावर काही परिणाम होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला असल्याची जाणीव झाल्याने त्या भितीपोटी, एखादी व्यक्ती, एल. एस. डी. वर बरीच अवलंबून राहू लागली, की त्यातून बाहेर पडले पाहिजे नाहीतर निभाव लागणार नाही असे वाटू लागल्यामुळे आणि बराच परिणाम झाल्यामुळे रुग्णालयात खूप काळ पडून रहावे लागल्यामुळे आपण आपले स्वातंत्र्य गमावले आहे ते परत मिळविले पाहिजे या भावनेमुळेच ती सोडली जातात.

## एल. एस. डी.

डॉ. अल्बर्ट हाफमन यांनी एल. एस. डी. (लायसर्गिक ॲसिड डायथेलॅमाइड)चा शोध लावला. १६एप्रिल ४३ रोजी एक गंमतीदार प्रकार घडला. प्रयोग शाळेत प्रयोगमग्न असलेल्या एका व्यक्तीला आपल्याला काहीतरी होत आहे असे वाटू लागले. भोवळ येऊ लागली. झिंगल्यासारखे वाटू लागले पण ते सारं सुखद होतं. कॅलिडोस्कोप (शोभादर्शक यंत्र) मधील बांगड्यांचे काचेचे तुकडे ज्याप्रमाणे रंगीबेरंगी व सुंदर आकृत्या दर्शवितात तसेच काहीसे सुंदर रंग व त्यांच्या आकृत्या त्याच्याभोवती फिरू लागल्या- तब्बल दोन तास ही अवस्था टिकली. एल. एस. डी. च्या आभासाचा (हायलुसिनेशनचा) हा पहिला आविष्कार होता.

एल. एस. डी. घेणाऱ्या हिप्पींनी त्याला वेगवेगळी मजेदार नावे दिली आहेत. 'क्युबज्' 'ॲसिड हेडस्' 'स्ट्रॉबेरी फील्डस्', 'व्हाइट लाईट्स', 'परपल हेज्' व इतर बऱ्याच नावाने ते ओळखले जाते. एल. एस. डी. ची 'ट्रिप' दोन तीन तासांपासून आठ तासांपर्यंत असू शकते. जास्तीत जास्त मात्र ती १२ तासपर्यंत असते.

याचे परिणाम भयानक होतात- एल. एस. डी. व्यसनाधीन माणसाची निरनिराळ्या घटनांची संगती लावण्याची शक्ती क्षीण होते. आठवण धड रहात नाही. आपले विचार योग्य प्रकारे मांडणे त्यांना जड जाऊ लागते. बोलताना अडखळायला होते. समोर असलेल्या व्यक्तीचा चेहरा मेणाप्रमाणे वितळतो आहे असे वाटू लागते. यापेक्षा भयंकर अवस्था म्हणजे 'बम ट्रिप.' यात एल. एस. डी. घेणाऱ्याला भुतांच्या पावलांचे आवाज ऐकू येतात व ती आपल्यावर आता हल्ला करणार असे वाटू लागते. एल. एस. डी घेतलेल्या एका स्त्रीची व पुरुषांची गंमत पहा. शत्रूच्या विमानांनी आपल्याला घेरले असल्याचे भास तिला होत होते तर मोटार चालविणाऱ्या त्या पुरुषाला समोरून भर वेगाने लॉरी येत असल्याचा भास झाला म्हणून त्याने अपघात टाळण्यासाठी ब्रेक दाबले, परिणामी मागून येणारी मोटार

त्याच्या मोटारीवर आदळून तो व मागील मोटारीतील माणूस जबर जखमी झाले. एल. एस. डी. घेतलेल्यांना असेच वेगवेगळे व विचित्र अनुभव येतात आपल्या देशात एल. एस. डी. चे उत्पादन होत नाही हे खरे पण परदेशातून येणारे अनेक तरुण तरुणी व विशेषत: हिप्पीज् ते चोरून या देशात आणतात. वेळप्रसंगी पैसा मिळविण्यासाठी त्यांच्याकडील साठा विकतात. त्यामुळे येथील काही तरुणानाही एल. एस. डी. ची चव लागली आहे.

एल. एस. डी. पेक्षाही भयानक असलेला अमली पदार्थ म्हणजे एस. टी. पी. यांच्या सेवनाने 'बम ट्रिप्स' येतात. यामुळे काहीं मृत्यू झाल्याच्या नोंदी आहेत. एल. एस. डी. मुळेही मृत्यू ओढवू शकतो. मात्र हे प्रमाण तसे फार थोडे आहे. एस. टी. पी. (सायंटिफिकली ट्रीटेड पेट्रोलियम) याला डी. ओ. एम्. असेही नाव आहे. अशुद्ध खनिज तेलावर शास्त्रीय प्रक्रिया करून तयार केलेला हा अमली पदार्थ घातक नसेल तरच नवल. त्याच्या व्यसनाधीन झालेले खऱ्या अर्थाने वेडे होतात. तर काहीजण गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. एका विवाहित महिलेचे एका पुरुषावर प्रेम होते. काही काही काळ त्यांचे प्रेमसंबंध चालले. पण ती विवाहित असल्याने आपण असे करणे बरोबर नाही असे वाटू लागल्याने तो पुरुष तिला टाळण्याचे प्रयत्न करू लागला. पण तिने त्याला तसे करू दिले नाही. शिवाय त्याला अंकित करून घेण्यासाठी धीर प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य यावे म्हणून 'डेक्सेड्रिन'चे व्यसन तिने लावून घेतले. यातूनच तिला मानसिक विकृती जडली व तिने त्याला भोसकून ठार केलें.

भांग, चरस व गांजा हे भारतीय अमली पदार्थ. एकाच रोपट्यापासून ते मिळतात. भांग म्हणजे त्या रोपट्याची पानें व फुले. त्यांचा काढा काढला जातो. शिवरात्रीच्या दिवशी भांग प्राशन करण्याची आपल्या देशात प्रथाच आहे. थोडी भांग घेतल्यास त्याचे वाईट परिणाम होत नाहीत. चरस व गांजाचे परिणाम तसे जालीम नसतात पण त्यांचे सतत सेवन केल्यास ते दीर्घकाळ टिकणारे असतात व त्यामुळे हळूहळू कार्यक्षमता कमी होत जाते.

व्यसनाधीन माणसे ही स्वत:हून शक्यतो औषधोपचार करून घ्यायला राजी नसतात. अनेकदा त्यांना हे सारे असह्य होऊन आत्महत्येचे विचार त्यांच्या मनात डोकावू लागतात. तेव्हा त्यांच्यावर योग्य वेळीच नर्सिंग होममध्ये उपचार होणे आवश्यक असते. व्यसनमुक्त होणाऱ्या व्यक्तीचे योग्य प्रकारे पुनर्वसन होणेही अत्यावश्यक असते, पण हेच अत्यंत कठीण असते.

कायदे करून हा प्रश्न सुटू शकेल का? संपूर्ण सुटू शकला नाही तरी कायदे परिणामकारक ठरू शकतात. वेळ हातातून निघून जाण्यापूर्वी याबाबत साऱ्यांनीच काहीतरी केले पाहिजे नाहीतर पश्चिमी राष्ट्रांसारखी अवस्था येथे निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

□ □ □

पृष्ठ २० वरून

साठी ५ जागा सोडल्या होत्या. त्यापैकी ४ त्यांनी जिंकल्या. काँग्रेसच्या मानाने इतर पक्षांचे बळ फारच कमी आहे.

पंजाबात १०४ पैकी ६५ जागा जिंकून काँग्रेसने स्थिर सरकार स्थापण्याएवढे बहुमत मिळविले आहे. काँग्रेला १९६७ मध्ये ४८ व ११६९ मध्ये अवघ्या ३८ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेस-कम्युनिस्ट युती दोन्ही पक्षांच्या फायद्याची पडली. काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळाले. तर कम्युनिस्टांना १० म्हणजे १९६७ च्या दुप्पट जागा मिळाल्या. काँग्रेसचा मुख्य प्रतिस्पर्धी अकालीदल. त्याला २४ जागा मिळाल्या. १९६९ पेक्षा त्याचे बळ १९ ने घटले. जनसंघाला तसेच समाजवादी; संघटना काँग्रेस, स्वतंत्र पक्ष यांना एकही जागा मिळाली नाही.

इतर राज्यांच्या मानाने हरियानात मात्र काँग्रेसला फारसे मोठे यश मिळाले नाही. एकूण ८१ जागापैकी ५२. म्हणजे काँग्रेसने १९६७ व १९६८ पेक्षा फक्त ४ जागा अधिक मिळविल्या. विसर्जित विधानसभेत काँग्रेसचे सभासद ५५ होते म्हणजे निवडणुका घेऊन ते वाढण्याऐवजी कमीच झाले.

हिमाचल प्रदेशाला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाल्यानंतर तेथील या पहिल्याच निवडणुका. काँग्रेसला प्रभावी विरोधी तेथे कधीच नव्हता. काँग्रेसने ६७ पैकी ५१ जागा जिंकल्या. इतर एकाही पक्षाला पाचपेक्षा अधिक जागा नाहीत.

महाराष्ट्र, आंध्र, काश्मीर आणि आसाम ही काँग्रेसच्या दृष्टीने अगदी बिनधोक राज्ये. तेथे काँग्रेसने आपले बळ पूर्वीपेक्षा वाढविले आहे. महाराष्ट्रात काँग्रेसने २७० पैकी २२२ जागा जिंकल्या. पक्षातील फुटी तर विसर्जित विधानसभेत काँग्रेसच्या १८५ जागा होत्या. त्यापेक्षा ३७ जागा तिने अधिक मिळविल्या. जनसंघाने एक जागा अधिक मिळविली, पण बाकी सर्वच पक्षांचे बळ रोडावले. सातपेक्षा अधिक जागा एकाही पक्षास मिळाल्या नाहीत. काँग्रेस बंडखोरांनी १४ जागा मिळविल्या. पण त्या वैयक्तिक बळावर. त्यांचा काही संघटित गट नव्हता. या निवडणुकीत दोन चमत्कार घडले. दिल्लीस शेवटच्या क्षणी जाऊन तिकीट मिळवून आलेले तिरपुडे पडले आणि निवडणुकीतून निवृत्त झालेले भास्कर निवडून आले.

आंध्रमध्ये काँग्रेसने २८७ पैकी २१९ जागा जिंकल्या. ही संख्या १९५७ मध्ये मिळालेल्या जागांपेक्षाही जास्त आहे. अपक्ष सभासद ५३ निवडून आले. त्यात ४० काँग्रेस बंडखोर आहेत. इतर पक्षांमध्ये ७ पेक्षा अधिक जागा एकाही पक्षाला मिळालेल्या नाहीत.

काश्मीरमध्ये काँग्रेसने ७५ पैकी ५७ जागा जिंकल्या. नॅशनल कॉन्फरन्सने यावेळी

काँग्रेसला पाठिंबा जाहीर केला होता. सार्वमत आघाडीने निवडणुकीत भाग घेतला नव्हता. त्यामुळे काँग्रेसला विरोधी असा प्रभावी पक्षच नव्हता. जनसंघ आपले बळ वाढवू शकला नाही पण ते कमीही झाले नाही. १९६२-१९६७ व १९७२ या तिन्ही निवडणुकात जनसंघाला तीनच जागा मिळाल्या. डाव्या गटांच्या पक्षांना काश्मीरमध्ये एकही जागा मिळाली नाही.

आसाममध्ये काँग्रेसने ११४ जागांपैकी ९५ जागा जिंकल्या हा तेथील विक्रम आहे. यापूर्वी सर्वांत जास्त ७९ जागा काँग्रेसने १९६२ च्या निवडणुकीत मिळविल्या होत्या. आसाममध्ये प्रभावी विरोधी पक्ष एकही नाही. एकाही पक्षास ४ पेक्षा अधिक जागा मिळाल्या नाहीत.

त्रिपुरामध्ये काँग्रेसने ६० पैकी ४१ जागा जिंकल्या. मार्क्सवाद्यांना फक्त सोळा जागा मिळाल्या. गेल्या वर्षी लोकसभेच्या दोन्ही जागा मार्क्सवाद्यांनी जिंकल्या होत्या. पण इंदिरा लाटेपुढे यावेळी त्याचा काही प्रभाव पडला नाही.

दिल्लीचे मेट्रॉपालिटन कौन्सिल (महानगरपरिषद) हा जनसंघाचा बालेकिल्ला तोही काँग्रेसने यावेळी सर केला. एकूण ५६ जागांपैकी काँग्रेसने ४४ जिंकल्या. जनसंघाला फक्त ५ जागा मिळाल्या. कम्युनिस्टांनी काँग्रेसशी युती करून तीन जागा जिंकल्या.

## जागरूक मतदार

असे हे विधानसभा निवडणुकांचे राज्यवार चित्र आहे. आधीच दुबळे असलेले विरोधी पक्ष फारच रोडावले आहेत. प्रचंड बहुत काँग्रेसच्या मागे असल्याने देशात एकपक्षीय हुकूमशाही आणि अखेर एका व्यक्तीची हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका कितपत आहे? मुख्यमंत्र्याची निवड करणे हा वास्तविक बहुमतवाल्या पक्षाला हक्क, पण त्यांच्या हाती हा हक्क आता नाममात्रच राहिला आहे. पंतप्रधान सांगतील तो नेता त्यांना निमूटपणे मान्य करावा लागत आहे ही प्रवृत्ती निकोप लोकशाहीच्या विकासास पोषक नाही. काँग्रेसला मिळालेला प्रचंड विजय ही एक लाट आहे. इंदिरा गांधींनी मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या असून जनतेने त्यांना दिलेली ती एक संधी आहे. पण आपला मतदार जागरूक आहे. याच मतदाराने पाच वर्षांपूर्वी काँग्रेसला आठ राज्यात सत्तेवरून खाली ओढले होते हे विसरून चालणार नाही. काँग्रेसने चांगला कारभार केला नाही तर हाच मतदार पाच वर्षांनी पुन्हा काँग्रेसविरूद्ध उलटल्याशिवाय रहाणार नाही. तेव्हा पराभवामुळे विरोधी पक्षांनी निराश होण्याचे कारण नाही. सारेच विरोधीपक्ष दुबळे असता संयुक्त आघाड्यांची गरज संपलेली नाही. संयुक्त आघाड्यांच्या कार्यपद्धतीतील दोष दूर करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. विधिमंडळ हे जनसेवेचे फक्त एक क्षेत्र आहे. विधिमंडळाबाहेर जनसेवेच्या अनेक क्षेत्रात कार्य करून, जनतेवरील अन्याय दूर करण्यासाठी शांततापूर्ण आंदोलने करून विरोधी पक्षांना आपले बळ

वाढविता येईल. तसेच विधिमंडळातील संख्याबळाची उणीव त्यांची गुणवत्तेने भरून काढली पाहिजे. विधिमंडळात अभ्यासपूर्ण वक्तृत्व व सरकारला निरुत्तर करणाऱ्या युक्तिवादाने त्यांनी छाप पाडली तर या पक्षाच्या प्रतिनिधींना आपण पुढच्यावेळी निवडून दिले पाहिजे असे जनतेला वाटू लागेल. त्यातूनच विरोधी पक्षांचे बळ वाढत जाईल. झटपट सत्ता हाती मिळविण्यासाठी संधीसाधूंना जवळ करण्याचा व तत्त्वशून्य आघाडया उभारण्याचा मार्ग १९६७ च्या निवडणुकीनंतर त्यांनी अवलंबला. त्यामुळे विरोधी पक्ष जनतेत अप्रिय झाले हे ओळखून असे मार्ग या पक्षांनी कटाक्षाने टाळले पाहिजेत.

प्रचंड बहुमतामुळे सत्तारूढ पक्षात गाफिलपणा, बेशिस्त, आपण करू ती पूर्व-दिशा ही प्रवृत्ती वाढण्याचा धोका आहे. सर्वांनाच सत्तास्थाने न मिळाल्याने गटबाजीही बोकाळेल. म्हणजेच काँग्रेसचे सूत्र आपण बदलल्याचा आभास इंदिरा गांधींनी आज निर्माण केला असला, तरी नेहरूंच्या काळातलेच दोष पुन्हा बळावण्याचा धोका आहे.

□ □ □

---

## सोन्याच्या लगडींचे युद्ध....

पृष्ठ ४१ वरून

इंग्लंडमध्ये एक पारंपारिक रूढी युद्धकाळातल्या खजिन्याच्या वाहतुकीबद्दल मान्य होती. अशा प्रकारच्या खजिना यशस्वीपणे सुरक्षित स्थळी पोचवल्याबद्दल जहाजाच्या अधिकाऱ्यांना आणि खलाशांना एकूण ऐवजाच्या एक टक्क्याचा दहावा हिस्सा 'बक्षीस' म्हणून देण्यात येई. पण दुसऱ्या महायुद्धाच्या काही काळ अगोदरच हा अलिखित कायदा रद्द करण्यात आला होता !

विन्स्टन चर्चिलच्या नेतृत्वाखाली त्याच्या युद्धमंत्रीमंडळाने आणि दोस्तांच्या सैन्याने दुसऱ्या महायुद्धाचा अपेक्षित निकाल लावला. प्रचंड, जबरदस्त विजिगिषेने सारे सामर्थ्यपणाला लावण्यात आले. अनेकदा डाव उलटले. त्या रणभीषण युद्धाच्या गदारोळातही हे 'सोन्याच्या लगडींचे युद्ध' रचण्यात आले ! आणि ह्या यंत्रणेत सहाशेहून अधिक माणसे गुंतली होती तरी गुप्तता पाळण्यात, हेतू साध्य करण्यात यश मिळाले. याशिवाय वाहतुक करणारे मजूर, खलाशी वेगळे. जास्तीत जास्त गुप्त ठेवण्यात आलेले आणि यशस्वी सिद्ध झालेले हे सोन्याच्या लगडींचे युद्ध इंग्लंडने महायुद्धाच्या छायेत लढवले !

□ □ □

पृष्ठ १५ वरून

मध्ये होता. छपन्नसाली 'पोरका' प्रसिद्ध झाली. अशा मी एकूण तीन कादंबऱ्या लिहिल्या.

कादंबरी लेखनानंतर तुम्ही कुठल्या वाङ्मयप्रकाराकडे वळलात ?

त्यानंतर मी पूर्णपणे नाट्यलेखनाकडे वळलो. "वेड्याचं घर उन्हात" हे माझं पहिलं सामाजिक नाटक. भालबा केळकर आणि मी कॉलेजपासूनचे स्नेही. म्हणून मी ते केळकरांकडेच दिलं. त्यांनीही ते डॉ. लागूंसारखा उदय होत असलेला जबरदस्त नट घेऊन उत्तम बसवलं. ही गोष्ट सत्तावन सालची आहे. मी पुढेमागे कुणी नाटककार होणार आहे हे त्यावेळी स्वप्नातसुद्धा नव्हतं. भालबा हौशी होते, त्यांची संस्था हौशी होती, डॉ. लागू आणि इतर साथीदार हौशी होते आणि मीही हौशी होतो. नाटकाचा प्रयोगही फार देखणा झाला. श्यामकांत गोखले नाटक पाहून म्हणाले, "नाटक फार सुंदर आहे, पण मनीऑर्डरी आणून देणारं नाही." त्या नाटकाचा लौकिक झाल्यामुळे त्याचे पंचेळीस प्रयोग झाले. त्याकाळी ती एक नवलाईच होती. कारण तेव्हा हौशी नाटकवाले एकाच नाटकाचे पंचवीस प्रयोग करीत नसत. तेवढं यश त्याकाळात मिळतच नसे. तो सत्तावन-अठ्ठावनचा काळही लक्षात घ्या. रांगणेकरांचं रंगभूमीवरलं पर्व संपुष्टात आलेलं होतं व्यावसायिक अशा फक्त दोनच मंडळ्या होत्या. एक बाबूराव गोखल्यांची नि दुसरी पेंढारकरांची "ललितकलादर्श" बाकी सारे हौशी होते. म्हणून मला हौशी नाटकवाल्यांचीच कास धरावी लागली. "वेड्याचं घर उन्हात" ने मला धीर आला. म्हणून अठ्ठावनसाली मी 'देवाचं मनोराज्य' लिहिलं. साठ साली 'प्रेमा तुझा रंग कसा ?' ही हलकी फुलकी विनोदी कॉमेडी लिहिली. ती अतिशय लोकप्रिय झाली. माझी ही पहिली तिन्ही नाटकं भालबा केळकरांनीच पी. डी. ए.तर्फे बसवली. ह्या नाट्यप्रयोगांचं चीज होण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे ह्यात संशय नाही. नाट्यसंस्था, नटवर्ग, आणि प्रेक्षक, हे नाटककाराला यश मिळवून देणारे तीन घटक आहेत. हे तिन्ही चांगल्या पातळीवरचे भेटणे हा एक भाग्यकारक योग आहे. माझ्या कुंडलीत तो लिहिलेला होता. नाटककार म्हणून मला नकाशावर स्थान मिळालं ते पूर्णत: हौशी मंडळींच्या समवेत. साठ सालानंतर मात्र मी संपूर्ण हौशी नाट्यसंस्थेकडून निमव्यावसायिक–निमहौशी अशा 'गोवा हिंदू असोशिएशन'च्या नाट्यशाखेकडे वळलो.

गोवेकरांकडे तुम्ही कसे वळलात ?

तो एक मोठा संस्मरणीय योग आहे. मी रियासतकार सरदेसायांचं 'राजा

शिवाजी ' हे पुस्तक वाचीत होतो. त्यात ' भयंकर उद्वेग ' ह्या मथळ्याखाली एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्यात शिवाजी–संभाजीमधला मानसिक संघर्ष सूचित केलेला आहे ते वाचीत असताना माझ्यातला नाटककार एकदम जागृत झाला. सरदेसायांचा मजकूर मग डोळ्यांसमोरून दूर झाला. आणि त्या महान पितापुत्रांचे काल्पनिक खटके मी मनांतल्या मनात रंगवू लागलो. तो एक माझा चाळाच झाला. ह्याच सुमाराला ' गोवा हिंदू 'चे भिकू पै-आंगले देवळालीच्या बार्न्स हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले होते. ते शेजारीच. ते म्हणाले, आमच्या संस्थेला एक नाटक द्या. मी त्यांना दोनचार कथानकं ऐकवली. त्यातलं हे शिवाजीच्या जीवनातलं शोकनाट्य त्यांना फार आवडलं. ते म्हणाले, हेच नाटक पुरं करून द्या. मग मी त्या सिद्धतेला लागलो. त्यासाठी प्रथम रायगडाला जायचं ठरवलं. कारण जिथे ते नाटक घडणार ते स्थळ पाहायलाच हवं. रायगडावर भटकताना मला भूपाळी सुचली. ती लिहून ठेवली. मग नाटकातले तपशील सुचत गेले. त्यानंतर परतल्यावर मी कॉलेजला बखरच शिकवायला घेतली. त्यामुळे पुन्हा ऐतिहासिक काळातल्या शब्दप्रयोगांचा वारकावा मला अभ्यासता आला. घरात मग ' रायगडा 'चं वातावरण तयार झालं. येऊन-जाऊन तोच एक चर्चेचा विषय झाला. ' रायगड 'ची पहिली दहा पानं लिहिली त्याचा विलक्षण आनंद झाला. मग मी त्याच धुंदीत बुडून गेलो. भिकू पै आंगलेही त्या धुंदीत सामील झाले. जळी, स्थळी फक्त रायगडच दिसू लागला. संवाद सुचू लागले. माझ्यापुरती तरी गोष्ट सांगूनच ती नीट घाट घेत जाते. भिकू पै-आंगलेंशी सतत चर्चा करताना नाटकाचा घाट आकार घेत राहिला. गोवा हिंदूवालेही सहकार्याचा हात घेऊन पुढे आले. त्यांनी खर्च बराच केला आणि मोठ्या इतमानाने ' रायगडाला जेव्हा जाग येते ' हे माझं पहिलं ऐतिहासिक नाटक रंगभूमीवर आलं. एक दर्जेदार नाटककार म्हणून माझं खातं ह्या नाटकाचा श्रीकार रंगभूमीवर टाकल्यापासून सुरू झालं. ' रायगडा 'ने मला सर्व मानसन्मान मिळवून दिले. संस्थेचाही लौकिक वाढला. म्हणून ' रायगड ' हे माझ्या आयुष्यातील एक पताकास्थानच आहे. '

रायगड लिहिताना तुम्ही डोळ्यांसमोर एखादा नट ठेवलेला होता काय ?

नाट्यलेखन करताना अगदी पक्कं असं नाही, पण कुणीतरी नजरेसमोर असतं. रायगडच्या वेळी डॉ. लागू डोळ्यांसमोर होते. तुम्हाला कुठला नट मिळतो ह्यावरही नाटककाराचं यश अवलंबून असतं. शिवाजीची भूमिका पेलू शकणारे दत्ताराम बापू रायगडला मिळाले, त्यामुळे रायगडच्या यशात भर पडली. तेच, ' तुझा तू वाढवी राजा 'मध्ये कोवळ्या तारुण्यात मानसिक प्रौढत्व आलेला सोळा वर्षांचा शिवाजी दाखवायला लायक नट मिळाला नाही म्हणून ते नाटक पडलं. शिवाजी हा एक चमत्कार आहे. तो बाळपणापासून एकदम प्रौढपणात झेप घेणारा

माणूस आहे. मधली युवावस्था त्याच्याबाबतीत नाहीच. बाळपणातून बाहेर पडताच तो तडक स्वराज्यस्थापनेच्या कामाला लागला. तेव्हा, वयाने युवक पण बुद्धीने प्रौढ, मुत्सद्दी असा शिवाजी रंगवायला आपल्याकडे एक तरी माणूस आहे काय? माझ्या 'मीरा–मधुरा'च्या अपयशाची निराश कारणमीमांसाही अशीच आहे. मीरेची धुंदी आणि माधुर्य दाखवायला योग्य अशी नटी मिळालीच नाही. मीरा कृष्ण भक्तियोग हा तत्त्वज्ञानाला भव्य विषय आहे. तो रंगभूमीवर आणणं हे विजया मेहेतांसारख्यांचं काम आहे. पण संस्थेच्या, नटनटींच्या, दिग्दर्शकांच्या म्हणून काही अडचणी आणि मर्यादा असतात. त्यांचाही विचार करणं भाग पडतं. आणि मोठ्या उमेदीने लिहिलेलं नाटकही कोसळतं. बरं, एकदा का नाटक कोसळलं की कोसळलंच म्हणून समजा! कोसळलेली नाटकं मग मैलाचे दगड होऊन बसतात. म्हणून चांगला अनुरूप नटवर्ग, नाट्यप्रयोग सादर करणारी चांगली संस्था आणि चांगला सुजाण प्रेक्षकवर्ग, ह्या तीन गोष्टी एकत्र लाभल्या तरच नाटकाचं भाग्य उदयाला येतं. ह्यातली एक जरी गोष्ट घसरली, तरी नाटक कोसळतं. कधी कधी नाट्यलेखनात कच्चेपण राहिलं तरीही नाट्यप्रयोग घसरतो 'मोहिनी'चा पहिला अंक छान आहे. पण अखेरचा अंक आणि शेवट घसरला. म्हणून नाटक पडलं. कधी कधी प्रेक्षकांच्या भावना दुखवल्या जातात म्हणूनही नाटक साफ कोसळतं. 'मास्तर एके मास्तर'मध्ये शिक्षकवर्गाची मी टिंगल केली असा माझ्यावर बिनबुडाचा आरोप झाला. वस्तुतः सध्या शाळेतलं जे भ्रष्ट जीवन डोळ्यांना दिसतं तेच मी आहे तसं मांडलं होतं. पण लोकांना सत्यदर्शन पचलं नाही. शिवाय, नाट्यनिर्मात्या संस्थेने त्या नाटकाचे हाल केले ते वेगळेच. मी लिहिल्याप्रमाणे नाटक रंगभूमीवर आलंच नाही. बाबुराव गोखल्यांनी त्यात आमुलाग्र बदल केले. मी न लिहिलेली पात्रं ढकलली आणि वाक्यागणिक संवादात दुरुस्त्या स्वतःच्या अखत्यारीत करून टाकल्या. आज परिस्थिती अशी आहे की 'मास्तर एके मास्तर' हे माझंच नाटक आहे असं मी छातीठोकपणे म्हणू शकत नाही. सुदैवाने त्याचं हस्तलिखितही उपलब्ध नाही, त्यामुळे ते प्रसिद्धही होऊ शकत नाही.

अशावेळी लेखक म्हणून तुम्ही हस्तक्षेप करू शकत नाही?

तत्त्वतः करू शकतो. पण आपण सारी माणसंच असतो आणि आपल्याला व्यवहार सुटत नाही. काय करणार अशा परिस्थितीत? बाबुराव गोखले नि मी शाळासोबती. आम्ही एकाच रंगभूमीवर रंग फासटून कामं केलेली आहेत. मित्र म्हणून त्यांनी मला दाद न लागू देता मजकुरात फिरवाफिरव केली तर मी त्यांचं काय करू शकणार होतो?

तुमच्या संवादांना रचनेचं इतकं महत्त्व आहे?

अर्थात. माझ्या संवादलेखन शैलीत संगीताचा भाग आहे. माझी शब्दरचना लयबद्ध असते. त्यात फिरवा फिरव केली तर वाक्यांची लय बिघडेल. म्हणून मी toning ला फार महत्त्व देतो. माझे संवाद मी वाचतो तसेच लयबद्ध आरोह–अवरोहांसहित उच्चारले गेले. तरच ते परिणामकारक ठरतात. एरव्ही त्यांच्यातला musical effect नाहीसा होतो. त्यातल्या त्यात प्रभाकर पणशीकरांनी माझं toning उचललं आहे. रायगडमधल्या काही वाक्यांची दत्तारामबापू करीत असलेली शब्दांची फेक चुकीचा परिणाम घडवून आणीत असे. मी त्यांना त्या शब्दांच्या उच्चाराची पद्धत सांगितली आणि त्यांनी toning बदलल्याबरोबर मला अभिप्रेत असलेला अर्थ शिवाजीच्या शब्दांमधून लोकांपर्यंत विनासायास पोचू शकला. ही toning ची कला मी खुपशी केशवराव दातेंकडून उचललेली आहे. महाराष्ट्र कलोपासकमध्ये केशवरावांनी मला नाट्यानुकूल शब्दोच्चाराची संथा दिलेली आहे. माझं नाटचवाचन प्रभावी असतं ह्याचं प्रत्यंतर मला गेल्या वर्षी हैद्राबादला आलं. मी हैद्राबादला माझ्या नाटचप्रवेशांचं जाहीर वाचन केलं. दोन हजार श्रोते केवळ माझ्या toning ने मी अडीच तास खिळवून ठेऊ शकलो. श्रोत्यांमध्ये सी. डी. देशमुखही होते. तिथे मी माझ्या 'हिमालयाची सावली'चा संपूर्ण पहिला अंक वाचून दाखवला.

सध्या तुम्ही कुठलं नाटक लिहिताहात ?

मी एकाच वेळी अनेक नाटकं लिहीत असतो. अनेक विषयांवर आणि कथानकांवर माझं silent brooding, म्हणजे संथ चिंतन चालू असतं. नवं कथानक नवे संवाद सुचले की मी ते ताबडतोब टिपून ठेवतो. संवाद लिहून काढतो. म्हणजे ते स्मरणातून निसटत नाहीत. त्यानंतर मी नाटकाचं कथानक इष्टमित्रांना तोंडी सांगतो. अशा वेळी कथानक घोटीव होत जातं आणि कथानकाचे पर्याय लक्षात येऊ लागतात. तसंच, एखाद्या कथानकावरील माझं संथ चिंतन वर्षोन्‌वर्ष चालू असतं. हिमालयाची सावलीचं कथानक मला चौसष्ट साली सुचलं. त्याचवेळी मी ते मोहन तोंडवळकरांना सांगितलं. ते त्यांनाच द्यायचा करार झाला. मात्र ते प्रत्यक्ष कागदावर उतरायला चक्क सात वर्षं जावी लागली. मत्स्यगंधाचं कथानक मला पचेचाळीस सालीच सुचलं होतं. त्यावेळी दूधविक्रीचा धंदा करणाऱ्या मामा पेंडशांना मी ते सांगितलंही होतं. त्या कथानकावर माझं वीस बावीस वर्षं संथ चिंतन चालू होतं. चौसष्टसाली ते रंगभूमीवर साकार झालं. माझं नाटचलेखन हे इतकं थंडपणे चाललेलं असतं. जबरदस्त ताकदीचं व्यक्तिमत्त्व असलेला पं. नेहरूंसारखा बाप आपल्या मुलीच्या मनोघडणीवर कसा प्रभाव टाकतो आणि बापाच्या तेजाने दिपून गेलेल्या त्याच्या मुलीला इतर जग कसं अळणी लागतं, ह्या कथानकावर 'सुसरीनं धरला पाय' हे नाटक लिहायचं माझ्या मनात पासष्ट सालापासून घोळतंय. त्याची मुक्तछंदातली वीस पानं तयार आहेत. उस्ताद रहिमतखाँ आणि सर्कसवाले छत्रे यांच्यावर 'सर्कस'

हे संगीतप्रधान नाटक गेली अनेक वर्षं माझ्या डोक्यात घोळत आहे. आपल्या देशातल्या बजबजपुरीला आणि निःश्रेयसतेला कंटाळून बुद्धिमान आणि महत्त्वाकांक्षी तरुण देश सोडून परदेशात वास्तव्य करायला जात आहेत. ब्रेन ड्रेन सुरू आहे. तो आहे त्या परिस्थितीत अटळही आहे. हरिभाऊ मोटघांचा अत्यंत तल्लख बुद्धीचा तडफदार यंत्रविशारद मुलगाही असाच अमेरिकेत गेला आहे. असे आणखी हजारो आहेत आणि हजारो जाणार आहेत. ह्या सर्व प्रश्नावर 'फक्त एकच कारण' हे नाटक डोक्यात आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि त्यांच्यावर जीव जडलेली हिराबाई पेडणेकर ह्यांच्यावरही 'कस्तुरीमृग' हे नाटक मी लिहिणार आहे. कथानक तयार आहे. नलदमयंती आख्यानावर 'औषध नलगे मजला' हं संगीतमय नाटकही लिहायचं आहे. महारोगी सेवक डॉक्टर बाबासाहेब आमटे ह्यांच्यावर 'स्पर्श होता परिसाचा' हे कथानक तयार आहे. फक्त कागदावर उतरायचंच काय ते बाकी आहे. शेक्सपियरवर मी नाटक लिहिणार आहे. त्यात शेक्सपियरच्याच धर्तीवर स्वगतं येणार आहेत. हॅम्लेट, लियर, ऑथेल्लो, मॅकबेथ, ह्या त्याच्या महान व्यक्तिरेखांचे अवशेष त्याच्याच जीवनात कसे कसे दिसतात, हे मी दाखवणार आहे. सध्या मी 'बेईमान' हे संघर्षप्रधान नाटक मन एकाग्र करून लिहीत आहे. निष्ठा कुणाला वहायची हा त्यातला विषय आहे. पुढे-मागे मला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर 'सागरा, प्राण तळमळला' हे नाटक लिहायचं आहे. बालकवींच्या जीवनावर नाटक लिहायचं आहे. डॉ. केतकरांची 'ब्राह्मणकन्या', आणि हरिभाऊ आपटघांची 'वज्राघात' ह्या दोन्ही कादंबऱ्यांना मला नाटचरूप द्यायचं आहे. तसंच मर्ढेकरांचं 'नटश्रेष्ठ' हे नाटकही मला त्याचं पुनर्लेखन करून रंगभूमीवर आणायचं आहे. हे सारे संकल्प आहेत. मी आणि कुसुमाग्रज असे दोघे मिळून एक नाटक लिहिणार आहोत. तो एक अभिनव प्रयोग होईल.

हे इतके संकल्प पुरे कसे होणार ?

ते सारे संकल्प पुरे करायचे म्हणजे मला भरपूर मोकळा वेळ हवा. तो मिळावा म्हणून मी आता महिन्याभरात आमच्या कॉलेजमधून सेवानिवृत्त होणार आहे. कॉलेजचं रुटीन सुटलं की मी सर्ववेळ नाटककार होईन. शिवाय, माझे इतर काही संकल्प आहेत उदाहरणार्थ, मला एखादं नाटक दिग्दर्शित करायचं आहे. महाराष्ट्राच्या बाहेरची निमंत्रणं स्वीकारून फिरायचं आहे. ह्या सर्व गोष्टींना सवड पाहिजे. यापुढे Public performance देण्याची कल्पना डोक्यात आहे. डोक्यातले हे प्रत्यक्षात उतरवायला वेळ हवा. भरपूर वेळ हवा. म्हणून इतक्या लवकर सेवानिवृत्त होण्याचं मी पक्कं केलं आहे.

कानेटकर, तुमची ही एकूण यशयात्रा ऐकताना मला मनापासून बरं वाटतंय. पण काय हो, तुम्ही आज आहात तसे व्हायला, म्हणजेच तुमचं व्यक्तिमत्व घडवायला कुणा कुणाचा हातभार लागला ?

गिरीशकवी तर माझे वडीलच. त्याबद्दल आपण बोललोच आहोत. माझ्यावर फार मोठी छाप पडली, ती तीन जीवनवीरांची. ते तिघे म्हणजे भाऊसाहेब खांडेकर, प्रिन्सिपल गोकाक आणि कवि कुसुमाग्रज. मी कॉलेजमध्ये शिकत असताना खांडेकरांकडे कोल्हापूरला वरचेवर जायचा. खांडेकर सदैव वाङ्मय आणि समाजजीवन यांचं चिंतन करतात. त्यामुळे संवेदनाक्षम वयातले तरुण लेखक त्यांच्याकडे फार आकर्षिले जातात. भलाई जोडण आणि प्रकाश फुलवणं हेच त्यांचं जीवन आहे. त्यांनी माझ्याकडून इब्सेन नीट वाचून घेतला. ते नव्या लेखकांना सतत मार्गदर्शन करतात. प्रिन्सिपल गोकाक हे वाङ्मयात खरेखुरे रमलेले वाचनप्रेमी विद्वान साहित्यिक आहेत. त्यांनी शेक्सपियरचा आत्मा मला नीट समजावून दिला. शक्सपियर चांगल्या रीतीने शिकवला जाणं हे विद्यार्थ्याचं भाग्यच म्हटलं पाहिजे. ते भाग्य मला पुरेपूर मिळालं. वाङ्मयाच्या प्रेमापुढे सत्तेच्या संदर्भातल्या इतर सगळ्या गोष्टी फिक्क्या आहेत, हे गोकाकांकडूनच शिकावं. शिरवाडकर हे एक वेगळंच शांत, अलिप्त प्रकरण आहे. How to be basically good हे शिकावं तात्यासाहेबांपासूनच. त्यांना यत्किंचितही अहंकार नाही; गुणसंपन्न असूनही नाही. ते सच्चे कलावंत आहेत. पण कलावंतपणाचं ओझं त्यांच्यावर नाही. आपली कला आपल्या खांद्यावरलं ओझं कसं होऊं देऊ नये ते शिकावं शिरवाडकरांपासूनच.

मराठीशिवाय इतर भाषांच्या रंगभूमीवर तुमची नाटकं आलेली आहेत का ?

आहेत. हिंदी, गुजराती, कानडी, सिंधी वगैरे भाषांमधून माझी नाटकं भाषांतरित झालेली आहेत, गुजराती आणि कानडी रंगभूमीवर मी फारच लोकप्रिय ठरलो आहे. गुजराती दिग्दर्शक आणि नाटककार कांती मडीया इथे येतात नि मी लिहिलेल्या नाटकांच्या चोपड्यांची भराभर भाषांतरं करतात. ' अश्रूंची झाली फुले ' हे कानडीत इतकं लोकप्रिय झालं, की कानडी प्रेक्षकांनी माझा सत्कार केला.

का करणार नाहीत ? जरूर करणार. जो नाटककार आपल्या मातृभाषिक रंगमंचावर तरवार मारून वर आणखी इतर भाषेतल्या रंगभूमीवर यशस्वीरीत्या उभा राहातो, त्याचा मान-सन्मान हा होणारच. झालाही पाहिजे. कुसुमाग्रजच मागे म्हणाले होते, की वसंत कानेटकरांनी मराठी रंगभूमीवरलं वसंतपर्व सुरू केलं आहे. खरं आहे. बावीस साली जो जन्मला तो बहात्तर साली पन्नास वर्षांचा होणारच. पण बावीस साली अशा लाखो-लाखो लोकांचे पाळणे हलले. त्या सर्वांना हारतुरे कुठले करायचे ? कशासाठी करायचे ? मात्र, बावीस साली जन्मलेल्या लाखो-लाखो माणसांतून फक्त एक वसंत कानेटकर तेवढेच मराठी रंगभूमीला यशाचे दिवस दाखवीत आहेत. इतरांना ते जमलं नाही म्हणून कानेटकरांचं कौतुक.

◻ ◻ ◻

शरद गोखले

# रंगभूमी

## सहलीला आली सावली

स्पर्धेतील यशस्वी नाटचप्रयोग

राज्य नाटचस्पर्धेमध्ये यशस्वी ठरलेले दोन नाटचप्रयोग गेल्या आठवड्यामध्ये पहाण्याचा योग आला. नागरी स्पर्धेमध्ये दुसऱ्या क्रमांकाने यशस्वी झालेले सहलीला आली सावली हे शाम फडके यांचे नाटक अंतिम फेरीमध्ये दुसऱ्या क्रमांकाने यशस्वी झाले.

सहलीच्या निमित्ताने बाहेर पडलेली मंडळी एकमेकांच्या खाजगी आयुष्यामध्ये किती चवीने रस घेतात, याचे सुंदर दर्शन पहिल्या अंकामध्ये घडते. मानवी स्वभाव वैशिष्टचांचे सुरेख चित्रण, नाटचपूर्ण प्रसंग व्यवहारात वापरले जातील अशा पद्धतीचे बोली धाटणीचे साधे संवाद, यामुळे पहिला अंक छान जमून आला आहे. चोरटचा सोन्याच्या रहस्याचा भाग मूळ कलाकृतीस ठिगळासारखा जोडला आहे. एकांकिकेचा अवाका असलेला विषय लेखकाने रहस्याची जोड देऊन वाढवल्याने दुसरा अंक स्वाभाविकपणे घसरला आहे. पहिल्या अंकाची रंगत त्यामुळे स्वाभाविकपणे शेवटपर्यंत टिकत नाही. एकमेकांच्या उखाळचा-पाखाळचा काढण्यात झोंबऱ्या वैगुण्यावर बोट ठेवून त्यातून आनंद घेण्याच्या वृत्तीचे चित्रण तेंडूलकरांच्या शांततेमध्ये पहावयास मिळाले. शांततेमध्ये असलेले लोक सावलीमध्ये खचित नाही. परंतु लिखाणाच्या या भागावर 'शांतता कोर्ट चालू आहे!' चा प्रभाव आहे. असे म्हटल्यास श्री. फडके यांना ते वावगे वाटू नये. स्वतःच्या जिवावर बेतले, की मनुष्य दुसऱ्याच्या जिवावर किती सहज उठतो, याचेही चित्रण येथे आढळते, पति-पत्नींचा बाहेरून बरा वाटणारा, पण आतून पोखरलेला संसार, सौ. जोशी व श्री. जोशी या दांपत्यद्वारा नाटककाराने रेखाटला आहे. स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रेयसीच्या रक्षणासाठी धावणारा राजा नाटकाच्या एकंदर बैठकीमध्ये काहीसा अस्वाभाविक वाटला तरी, मानवी स्वभावाची एक वेगळी छटा खचित दाखवून जातो. स्पर्धेमध्ये ज्या पद्धतीची नाटके आवश्यक असतात, त्या पद्धतीचें हे नाटक गुरुदत्त मित्रमंडळ डोंबवली या संघाने समर्थपणे सादर केले. कलाकारांच्या वैय-क्तिक ताकदीपेक्षा सांघिक कौशल्याचा प्रभाव पडला. निर्मितीची बाजू व्यवस्थित

संभाळली होती. विशेषत: बापू लिमये यांचे नेपथ्य व अशोक साठे यांची प्रकाश-योजना, प्रयोगाची रंगत वाढवून गेले. प्रयोगाचे दिग्दर्शक राम मुंगी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचे पारितोषिक घेऊन गेले. निर्मिती आणि कलाकारांची हाताळणी यांचा सुरेख मेळ त्यांनी बसवला होता. रंगमंचावरील हालचालीतही अपेक्षित नेटकेपणा होता. ही सर्व वैशिष्टये राजा नातू यांनी बसवलेल्या कालाय तस्मै नमः मध्येही होती. अधिक समर्थ कलावंत त्यांच्या हाताशी होते. तथापि त्यांच्या कलाकृतीला जसे यश मिळाले तसे प्रथम कमांकाचे यश त्यांना दिग्दर्शनाच्या बाबतीत मिळू शकले नाही. चालायचेच जाता जाता सहज उल्लेख केला इतकेच. ◻

# मंदारमाला

संगीत नाटयस्पर्धा सुरू झाल्यापासून येथील भरत नाटयमंदिर या संस्थेने सतत पहिल्या क्रमांकाचे यश मिळवले आहे. स्वयंवर आणि वैरीण झाली सखी या नाटकांच्या पाठोपाठ चालू वर्षी संस्थेच्या 'मंदारमाला' या नाटकाने ही यशोमालिका कायम ठेवली. राज्यपातळीवरील स्पर्धेमध्ये सतत तीन वर्षे प्रथम श्रेणीचे यश मिळवणारी ही एकमेव संस्था. सौ. कुसुम शेंडे व प्रभाकर करंदीकर, या दोन गायक कलाकारांकडे या यशाचे श्रेय जाते. गायनाचे वैयक्तिक पारितोषिकही हे दोन्ही कलावंत सतत मिळवीत आहेत. संस्थेच्या मंदारमालेचा प्रयोग बाबूराव विजापुरे यांनी बंदिस्त बसवला होता. निर्मितीची बाजू लक्षपूर्वक संभाळली होती. सर्वसाधारणपणे संगीत नाटकांमध्ये या गोष्टी दुर्लक्षिल्या जातात, म्हणून त्याचा आवर्जून उल्लेख केला. दिग्दर्शनाचे पारितोषिक बाबूराव विजापुरे घेऊन गेले. गायनाबरोबरच अभिनय आणि निर्मितीकडे लक्ष पुरवल्यामुळेच संस्था सतत यशस्वी होत असल्याचे दिसून येते. संगीताची जबाबदारी स्वत: राम मराठे यांनी पेलली असल्याने त्यासंबंधी वेगळे लिहिण्याचे कारण नाही. निर्मितीची बाजू व्यवस्थित संभाळल्यामुळे मंदारमालेचा प्रयोग चांगला रंगतो. प्रभाकर करंदीकर, व सौ. कुसुम शेंडे या प्रमुख कलाकारांची गाणी छान रंगतात. आपल्याकडे गाणाऱ्या नटाजवळ अभिनयाचे सामर्थ्य नसते. काही बाबतीत या दोन्ही कलाकारांचे बाबतीत ती उणीव भासते. मेहनत करून जेवढे यश मिळवणे शक्य आहे तेवढे यश ही मंडळी खचित मिळवतात. अन्य कलाकारांची कामेही चांगली होत असल्याने एक सुविहीत प्रयोग पाहिल्याचे समाधान भरत नाटयमंदिराची मंदारमाला निश्चितपणे देऊन जाते.

◻ ◻ ◻

# दो राहा

## वयात आलेलं हिंदी चित्र

दो राहा – म्हणजे ज्या क्षणी व्यक्तीला दोहोंपैकी एका मार्गाची निश्चिती करावी लागते, असा क्षण. आता आमच्या फिल्म इन्स्टिटयूटचे जे तंत्रज्ञ कलाकार मुंबईमध्ये स्थिरावत आहेत, त्याच्या समोरही असा प्रश्न निर्माण झाला, आणि त्याचे उत्तर त्यांनी आपल्या दो राहा या चित्रपटामध्ये हम ना अिधरके, ना उधरके, – हम तो ठेहरे बिचवाले, अशा थाटामध्ये या चित्रपटाद्वारे दिले आहे.

रवींद्र भारती हा एक तरुण उमदा लेखक. महाविद्यालयाच्या रंगभूमीवर भारतीच्या नाटकामध्ये काम करणारी गीता नावाची तरुणी भारतीवर लुब्ध होते. त्याच्याशी ती परिचय करून घेते. परिचयाचे स्नेहामध्ये रुपांतर होते. आणि एका मोहाच्या क्षणी दोघांचे मीलन होते. आता गाडी लग्नापर्यंत आल्यावर बापू खडबडून जागा होतो. लग्नाला विरोध करतो. भारतीच्या गरिबीची कुचेष्टा करतो. संतापलेला रवींद्र पैसा हेच ध्येय मानून श्रीमान होण्याचे ठरवतो. ध्येयवादी रवींद्र भारती संपतो. घर सोडून त्याच्याशी विवाहबद्ध व्हायला आलेल्या गीताला हा फरक जाणवतो. ध्येयवादी रवींद्र वाचकांच्या मागणीप्रमाणे कादंबऱ्या पाडू लागतो. आणि त्याच्या बायकोवर नजर ठेवणारा प्रकाशक रवीच्या कादंबऱ्या खरेदी करून त्याच्यावर पैशाची बरसात करतो. प्रारंभी विरोध करणारी गीता नवऱ्याच्या सल्याप्रमाणे वागू लागते. दारू, क्लबज्, पार्ट्या, यांचा सराव होऊन जातो. आणि अशाच एका पार्टीच्या प्रसंगी रवींद्रचा प्रकाशक आपले ईप्सित पूर्ण करून घेतो. नशा उतरुन सत्य समजल्यावर गीता अस्वस्थ होते. छोटया छोकरीला वडिलांकडे सोडून येऊन सर्व हकीगत ती आपल्या पतीला सांगते. रवीला धक्का बसतो. प्रकाशकाचा सूड घेण्यासाठी तो बाहेर पडतो, आणि प्रकाशकाची स्वारी पुन्हा त्याच उद्देशाने घरात प्रवेश करते. जे सुख नशेत मिळाले, ते अत्याचार करून घेण्याचा प्रयत्न सुरू होतो. मग प्रखर विरोध –खून – कोर्टसीन्स, खटल्याला नाटयपूर्ण कलाटणी इत्यादी.

## उत्कृष्ट दिग्दर्शन

भारतीय संस्कृती आणि पाश्चिमात्य जीवन पद्धतीने प्रभावित झालेला जीवनमार्ग, यांच्या संघर्षातून उच्चभ्रू वर्गातील स्त्रीया, पैशाच्या मोहाने कशा लीलया खेळवल्या जातात, याचे नाटकी, भडक दर्शन घडवणारी ही कथा इन्स्टिटयूटचे नवोदित दिग्दर्शक फिरोझ चिनॉय यांनी समर्थपणे रुपेरी पडद्यावर आणली आहे. रवींद्र व गीता यांच्या उफळत्या प्रीतीतील वासनामय सहवासाचे चित्रण त्यांनी कल्पकतेने केले आहे. 'मेरी बगिया की कली तु सदा दी खिलना,' या 'गीता'च्या वेळी गीताच्या आयुष्यातील पूर्व प्रसंग तिच्या मनामध्ये गर्दी करत असल्याचे मोठ्या कौशल्याने सूचित केले आहे. दारूच्या नशेत प्रकाशकाकडून आपल्यावर अत्याचार झाल्याचे लक्षात आल्यावर आपण पापाच्या खोल गर्तेत बुडाल्याचे लिफ्ट शॉटस्‌नी कौशल्याने दाखवले आहे. गीता स्वतःला नाचणारीण कोठीवाली समजते, हेही कौशल्याने सुचीत केले आहे.

याउलट गीता वडिलांजवळ आपल्या विवाहपूर्व संबंधाची कबुली देते, त्यानंतरचा भाग किंवा दासीना आणि ठाकूरसाहेब यांच्यामधील संवाद, हा सर्वभाग एकदम जुनाट पद्धतीचा वाटतो. हे असले खानदान बुडने वाले संवाद १९५५ पासून आम्ही ऐकतच आहोत. चित्रपटाचे अखेरचे रहस्य तर एकदम 'बोगस' आहे. अिनस्टिटयूटचेच पदवीधर कॅमेरामन मोहिंदर बात्रा व प्रमोद मिटल, यांची कामगिरी उत्तम आहे.

सर्वच प्रमुख कलाकार—अनिल धवन (रवींद्र) गीता (राधा सलुजा) प्रकाशक (रुपेशकुमार) आपआपल्या भूमिका कसून करतात. नाविन्याचा हव्यास, धंद्याचे गणित, आणि तांत्रिक सफाईतील विदेशी चित्रपटांचे अनुकरण असे तिहेरी लेणे घेऊन आलेला हा "दो राहा" प्रशिक्षित पदवीधरांकडून भरपूर अपेक्षा ठेवण्यास निश्चित वाव देऊन जातो. मात्र त्याच बरोबर चित्रनिर्मितीमध्ये ही मंडळी कोणती वाट चोखाळतील याचेही दर्शन घडवून जातो.

चित्रपटाची एकंदर मांडणी पाहिल्यावर विशेषतः प्रीतिदृष्ये, बलत्कार दृष्ये, यांचे चवदार चित्रण पाहिल्यावर निदान शारीरिक वयाच्या बाबतीत तरी वयात आलेला हिंदी चित्रपट असा या दो राहाचा उल्लेख करावा लागेल.



 पृष्ठ ६ वरून

पायाखालची जमीन काढून घेतली आणि वर त्यांच्यावर वसंतदादांचा शह बसविला. आणि हे सव करीत असताना यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व कमी केले. असे या नेतृत्वाच्या राजकारणाचे स्वरूप आहे. दोन–चार वर्षांनंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आपल्याला हवा तो नेमका माणूस आणण्यास श्रीमती इंदिरा गांधी मोकळ्या झाल्या आहेत.

किमान जमीन धारणेच्या बाबतीत श्री. नाईक यांनी आपली मते ठामपणे मांडली होती. जमीनधारणेवर सरसकट मर्यादा आणता कामा नये. त्यासाठी शास्त्रशुद्ध पाया हवा असा आग्रह त्यांनीं धरला होता व या प्रश्नावर बरेच रान उठले होते. हाच आग्रह ते पुढे क़ायम धरतात, की श्रीमती गांधींच्या आदेशाप्रमाणे चालतात हे आता लवकरच स्पष्ट होईल. कारण जमीनधारणेवरील मर्यादा, संपत्तीवरील मर्यादा हे विषय श्रीमती गांधींच्या कार्यक्रमामध्ये अग्रक्रमाने असावयास हवेत अशी सर्वांचीच अपेक्षा आहे

मुख्यमंत्री नाईकांचे जे नवे मंत्रिमंडळ तयार झाले आहे त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या स्वरूपात काही फरक पडला अहे काय ? काही माणसे वगळली. काही. नवी आली. पक्षाची जुनी, सरंजामशाहीची प्रतिमा बदलून एक प्रागतिक क्रांतिकारी प्रतिमा निर्माण करण्याची इंदिरा गांधींची प्रतिज्ञा आहे. हेच त्यांना सर्व राज्य सरकारांच्या बाबतीतही करायचे आहे. परंतु मंत्रिमंडळाच्या एकंदर स्वरूपावरून तरी महाराष्ट्राच्या बाबतीत प्रधानमंत्री यशस्वी झाल्या आहेत असे दिसत नाही.

राज्याचे मुख्यमंत्रीच किमान जमीन धारणेला निष्ठेने विरोध करणारे एक बडे श्रीमंत बागायतदार आहेत. त्यांच्या एकवीस जणांच्या मंत्रिमंडळात १३ सभासद बडे जमीनदार–बागायतदार आहेत. उरलेल्यात चौघे बडे पैसेवाले आहेत. श्री. वसंतदादा पाटील, श्री. मधुकरराव चौधरी, श्री. नरेंद्र तिडके, श्री. यशवंतराव मोहिते, श्री. ह. गो. वर्तक, श्रीमती प्रतिभा पाटील, श्री. कल्याणराव पाटील, श्री. शंकरराव पाटील, श्री. सुंदरराव सोळंके, श्री. शरद पवार, श्री. आर. जे. देवतळे आणि श्री. गोविंदराव सरनायक यांपैकी सर्वच बडे जमीनदार किंवा बागायतदार आहेत. डॉ. एम्. बी. पोपट, डॉ. रफिक झकारिया आणि श्री. ए. आर. अंतुले हे बडे पैसेवाले नाहीत असे कोण म्हणेल ?

मग महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ कुणाचे आहे ? बागायतदारांचे आणि पैसेवाल्यांचे, की गरीबांचे किंवा मध्यमवर्गीयांचे प्रतिनिधीत्व ' करणाऱ्यांचे ? एका उच्च-पदस्थ काँग्रेस नेत्याला हा प्रश्न केला असताना तो म्हणाला, ' मंत्रिमंडळात निश्चितच बदल झाला आहे.'

प्रश्न : तो कसा काय ?"

उत्तर : माणसे बदलली आहेत, नवे चेहरे आले आहेत,

प्रश्न : परंतु स्वरूपात काय बदल झाला आहे ?

उत्तर : निश्चितच बदल झाला आहे. माणसे बदलल्यामुळे एक मानसिक बदल झाला आहे.

प्रश्न : पण तात्त्विक दृष्टिकोनातून काही बदल झाला का ?

उत्तर : तो वेगळा प्रश्न. मानसिक बदल झाला आहे हे निश्चित.

काँग्रेसच्या सोशलिस्ट फोरमचे एक बागायतदार नेते श्री. शरद पवार यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाल्यामुळे फोरमला फार हर्ष झाला म्हणे. होवो बापडा. पण फोरमला आपला एखादा भूमिहीन, किंवा मजूर नेता किंवा किमान गरीब शेतकरी मंत्रिमंडळात का म्हणून पाठविता आला नाही ? एक बडा बागायतदारच पाठविण्यात फोरम यशस्वी कसे झाले ? हा काही फार गुंतागुंतीचा प्रश्न नाही. उत्तर सरळ आहे.

एका राज्यमंत्र्यांची विधानसभेत पाठराखणी करताना एकदा विरोधी पक्षाकडे चेष्टेने बघून एक ज्येष्ठ मंत्री म्हणाले होते, ' अहो, ते काही तुमच्यासारखे पाच एकरवाले नाहीत–'

खरेच आहे. महाराष्ट्राचे राज्य पाच एकरवाल्यांसाठी अथवा त्याच्या खालच्या पातळीच्या माणसांसाठी नाहीच की काय ? बघू या. इंदिरा गांधींचा ज्या अर्थी या मंत्रिमंडळाला आशीर्वाद आहे त्याअर्थी निश्चितच हे सरकार गरीबांसाठी काही तरी करील अशी आशा इंदिराप्रेमी जनता बाळगून आहे. आता मंत्रिमंडळ बागायतदारांचे असले म्हणून काय झाले ? बागायतदारांनी गरीबांसाठी काहीच करू नये असे थोडेच आहे.

जाता जाता आणखी एक गोष्ट राहून जाता कामा नये. काँग्रेसचा निवडणुकीत एवढा प्रचंड विजय पाहून सालाबादप्रमाणे यंदाही शिवसेनेच्या बाळासाहेब ठाकऱ्यांनी शंका प्रदर्शित केली होती, की यात काही तरी काळेबेरे आहे. आता ' काळेबेरे ' असताना शिवसेनेचेच प्रमोद नवलकर गिरगावातून कसे निवडून येतील हा प्रश्न वेगळा. पण त्यांच्या या आरोपावर आमचा विश्वास बसू लागला आहे तो वेगळ्याच कारणाने.

एरवी भंडाऱ्याचे लोकप्रिय मंत्री व लाडके नेते श्री. नासिकराव तिरपुडे यांचा एवढा दणकेबाज पराभव झालाच नसता ! तिरपुड्यांची लोकप्रियता केवढी महान. त्यांच्यासाठी त्या जिल्ह्यातल्या सर्वच्या सर्व काँग्रेस उमेदवारांनी निवडणूक अर्जच

न भरण्याची धमकी घातली होती. विद्यार्थ्यांनी संप करण्याचा आणि दुकानदारांनी हरताळ पाळण्याचा इशारा दिला होता. म्हणून त्यांना तिकीट मिळाले. एवढे जनतेच्या हृदय-सिंहासनावर विराजमान झालेले तिरपुडे. पण निवडणुकीत त्यांनी सपशेल आपटी खावी ना! आणि तेही त्यांच्या जिल्ह्यातले इतर सारे काँग्रेस उमेदवार—ज्यांनी त्यांच्यासाठी निवडणूक अर्जच न भरण्याच्या धमक्या दिल्या होत्या—प्रचंड बहुमताने निवडून आले असताना! छे! छे! यात नक्कीच काही तरी काळेबेरे आहे. यात शंकाच नको. बाळ ठाकरे म्हणतात तेच खरे. 'इंदिरा लाट' वगैरे सगळं झूट. कुठेतरी पाणी मुरते आहे हे नक्की. आता ठाकरेसाहेब आणि तिरपुडेसाहेब यांनी एकत्र जमून या गोष्टीची चौकशी करायला हवी.

झाले ते झाले. तिरपुड्यांसारख्या लोकप्रिय लोकनेत्याला कुठल्यातरी दाराने मंत्रिमंडळात घेण्याचा मनाचा मोठेपणा दाखवून वसंतराव नाईकांनी भंडारा जिल्ह्यातील जनतेची बूज राखायला हवी होती. वसंतदादांना घेतलेच की मंत्रिमंडळात! या मंत्रिमंडळाचा विस्तार नाईक जेव्हा करतील तेव्हा तिरपुड्यांचा त्यात नक्कीच समावेश असेल, अशी एक वेडी आशा जिवाला चटका लावून आहे.

□ □ □

---


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०


---


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise Regd. No. MH 649




"....म्हणजे प्रत्येक बिगरतिकीटवाल्या पॅसेंजरमागं रेल्वेचं होणारं नुकसान दरवर्षी असं वाढवतात अन् जबाबदारी मात्र टाकतात आमच्यावर!"